
डंपरच्या अपघातांची ‘बंपर ऑफर’…!
P3

• पुणे, मंगळवार, १३ मे २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 164 • वर्ष ४ थे, अंक १६४ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News


१२ विराटची कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती

# दहशतवादाला माफी नाही

## टेरर आणि टॉक एकत्र चालणार नाहीत, पाणी आणि रक्तही एकत्र वाहणार नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दहशतवाद भारत सहन करणार नाही. पाकिस्तानचं सरकार दहशतवाद्यांना ज्या प्रकारे पोसतं आहे त्यावरुन हे दिसतं आहे की हे दहशतवादीच एक दिवस पाकिस्तानला संपवतील. पाकिस्तानला त्यांचा दहशतवादी ढाचा उद्ध्वस्त करावा लागेल. टेरर आणि टॉक एकत्र चालणार नाही. पाणी आणि रक्ताचे पाटही एकत्र वाहणार नाही. आज मी सगळ्या जगाला सांगतो, पाकिस्तानशी चर्चा करायची असेल, तर ती पाकव्याप्त काश्मीर आणि दहशतवादी कारवाया यांच्यावरच होईल. आज बुद्ध पौर्णिमा आहे. भगवान बुद्धाने आपल्याला शांततेचा मार्ग दाखवला आहे. प्रत्येक भारतीयाला ही शांतता लाभली पाहिजे. विकसित भारताचं स्वप्न पूर्ण झालं पाहिजे यासाठी भारत शक्तिशाली असणं गरजेचं आहे. आवश्यक असल्यास या शक्तीचा



प्रयोगही सक्तीचा ठरतो. मागच्या काही दिवसांमध्ये भारताने हेच केलं आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधोरेखित केले.

ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाल्यानंतर प्रथमच त्यांनी देशवासियांशी संवाद साधला. यावेळी प्रत्येक भारतीयाच्या मनातील प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. पाकबरोबरची ही शस्त्रसंधी म्हणजे केवळ अल्पविराम असून, ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेले नाही, दहशतवादाविरोधात ही कारवाई सुरूच राहील, हे त्यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, मी आज पुन्हा एकदा सांगतो भारताने पाकिस्तान विरोधातली कारवाई ही फक्त स्थगित केली आहे. पाकिस्तानने पुन्हा आगळीक केली तर त्याला प्रत्युत्तर दिले जाईल. भारतावर दहशतवादी हल्ला झाला, तर

» पान ७ वर

> भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानमधील दहशतवादी ठिकाणांवर हल्ला केला. दहशतवाद्यांना स्वप्नातही वाटले नसेल की भारत इतकी मोठी पावले उचलेल… जेव्हा भारतीय क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने पाकिस्तानमधील त्या ठिकाणांवर हल्ला केला तेव्हा केवळ दहशतवाद्यांच्या इमारतीच उद्ध्वस्त झाल्या असे नव्हे तर त्यांचे मनोबलही ढासळले."
>
> — **नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

### ऑपरेशन सिंदूर

• आम्ही भारतीय सैन्याला दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे आणि आज प्रत्येक दहशतवादी, प्रत्येक दहशतवादी संघटनेला 'की हमारी बेहनो, बेटियों के माथे से सिंदूर हाथाने का अंजाम क्या होता है, हे कळून चुकले आहे. ऑपरेशन सिंदूरची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आपल्या शूर सैनिकांनी अतुलनीय शौर्य दाखवले. आज मी त्यांचे धाडस, त्यांचे शौर्य आणि त्यांचे शौर्य त्यांना समर्पित करतो. हे शौर्य मी आपल्या देशाच्या प्रत्येक आई, बहिणी आणि मुलीला समर्पित करतो, असे पंतप्रधान मोदी यांनी सोमवारी ऑपरेशन सिंदूरवर राष्ट्राला संबोधित करताना सांगितले.

# पाकचे मिराज फायटर जेट पाडले

## कराचीतील मिलिर कँटवर हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय वायुसेनेने पाकिस्तानात तब्बल १५० किमी आत घुसून कराचीतल्या मिलिर कँट येथील हवाई संरक्षण तळावर अचूक हल्ला केल्याचे स्पष्ट झाले आहे. 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत भारताने पाकिस्तानचे एक मिराज फायटर जेट पाडल्याची अधिकृत घोषणा सोमवारी करण्यात आली. या हल्ल्याचे थरारक दृश्य भारतीय लष्कराने एक्स या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केले आहे.

दिल्लीमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत संरक्षण दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. ही पत्रकार परिषद लेफ्टनंट जनरल राजीव घई (सैन्य), एअर व्हाइस मार्शल ए.के. भारती (हवाई दल) आणि वाइस अॅडमिरल ए.एन. प्रमोद (नौदल) यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या वेळी त्यांनी स्पष्ट केले की, मे ९ आणि १० च्या रात्री पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या सर्व हवाई हल्ल्यांना भारताच्या बहुस्तरीय एअर डिफेन्स आणि अँटी-ड्रोन प्रणालीने यशस्वीरित्या प्रत्युत्तर दिले. पाकिस्तानच्या मिराज जेटव्यतिरिक्त चीन आणि तुर्कस्तानमध्ये बनवलेले ड्रोन तसेच पीएल-१५ क्षेपणास्त्रेही भारताच्या संरक्षण यंत्रणांनी नष्ट केली आहेत.

### लष्कराकडून व्हिडिओ जारी

• भारतीय लष्कराने पाकिस्तानच्या मिराज फायटर जेटच्या अवशेषांचा व्हिडिओ सोशल मीडियावर जारी केला आहे. यामध्ये विमानाच्या भागांचे जळालेले अवशेष, ढासळलेले उपकरणे आणि घटनास्थळी सैन्याचे हालचाली स्पष्टपणे दिसून येतात. पाकिस्तानच्या सैन्याने रविवारी सांगितले होते की, त्यांच्या एका लढाऊ विमानाला "किरकोळ नुकसान" झाले आहे. मात्र, कोणते विमान होते किंवा कसे नुकसान झाले याबाबत त्यांनी कोणतीही ठोस माहिती दिली नव्हती. त्याच्या दुसऱ्याच दिवशी भारताने मिराज जेटला पाडल्याची कबुली देत पुरावे सादर केले.

# पावसाचे शुभवर्तमान!

## वेळेआधीच मान्सून अंदमानमध्ये

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मान्सून यंदा वेळेआधीच दाखल होणार असल्याची चिन्ह निर्माण झाली आहे. नैऋत्य मान्सून दक्षिण अंदमान समुद्र, दक्षिण-पूर्व बंगालच्या उपसागराच्या काही भागांत आणि अंदमानात आला आहे. तसेच निकोबार बेटांवर मंगळवार दि. १३ मे पर्यंत पोहचण्याची शक्यता आहे.

येत्या चार ते पाच दिवसांत मान्सून दक्षिण अरबी समुद्र, मालदीव, कोमोरिन क्षेत्राच्या काही भागात येणार आहे. ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ के. एस. होसाळीकर यांनी याबाबतची माहिती दिली आहे. भारतीय हवामान विभागाने दोन दिवसांपूर्वी केरळमध्ये वेळेच्या चार दिवसांपूर्वी मान्सून येणार असल्याचे म्हटले आहे. २००८ नंतर म्हणजेच १८ वर्षांनी मान्सून नियोजित वेळेच्या चार दिवस आधी केरळमध्ये येणार आहे. सध्या मान्सून दक्षिण अंदमान बेटावर आला आहे.

१५ मे नंतर त्याची प्रगती वेगाने होणार आहे. त्यानंतर तो दक्षिण अरबी समुद्रात प्रवेश करेल आणि श्रीलंकेचा काही भाग, दक्षिण बंगाल उपसागराचा काही भाग, संपूर्ण अंदमान बेट व्यापणार आहे. केरळमध्ये मान्सून दाखल होण्याची तारीख ३१ मे आहे. परंतु यंदा २७ मे रोजीच मान्सून पोहचणार आहे. गोव्यामध्ये पाच जून तर महाराष्ट्रातील किनारपट्टी भागांत ६ जूनपर्यंत मान्सून येण्याची शक्यता आहे.

भारतीय हवामान विभागाने यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. १०६ टक्के पाऊस पडणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. पावसासंदर्भात भारतीय हवामान विभागाने वर्तवलेला अंदाज २०१५ वगळता गेल्या २० वर्षांत बरोबर ठरला. यंदा अल निनो किंवा ला निना याबाबत कोणतीही परिस्थिती उद्भवणार नसल्याचे म्हटले आहे.

हवामान विभागाने राज्यात पुन्हा एकदा अवकाळी

» पान ७ वर

### मान्सून कधी कुठे पोहचणार?

- **५ जून :** गोवा, आंध्र प्रदेश किनारपट्टी, कर्नाटक, पश्चिम बंगाल.
- **६ जून :** महाराष्ट्र, आंध्र प्रदेशाचे किनारपट्टी व्यतिरिक्त जिल्हे.
- **१० जून :** मध्य महाराष्ट्र, मुंबई, तेलंगणा, छत्तीसगड, ओडिसा, झारखंड, बिहार.
- **१५ जून :** गुजरात, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश.
- **२० जून :** गुजरात, राजस्थान, उत्तराखंड, दिल्ली.
- **२५ जून :** राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेश.
- **३० जून :** राजस्थान, नवी दिल्ली.



## शेअर बाजारात सुपर मंडे!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भारत आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या शस्त्रसंधी आणि अमेरिका-चीनमध्ये सुरू असलेल्या टॅरिफवरील चर्चेचा सकारात्मक परिणाम भारतीय शेअर बाजारावर झाल्याचं दिसून आलं. सेन्सेक्समध्ये २,९७५ अंकांची वाढ होऊन तो ८२,४२९ वर स्थिरावला, तर निफ्टीमध्ये ९१६ अंकांची वाढ होऊन तो २४,९२४ वर पोहोचला. सोमवारी शेअर बाजारातील ३,२३६ शेअर्समध्ये मोठी वाढ झाली, तर ४४८ शेअर्समध्ये काहीशी घसरण झाल्याचं दिसून आलं.

भारतासाठी संरक्षण उपकरणे तयार करणाऱ्या कंपन्यांचे आणि शस्त्रास्त्र उत्पादक कंपन्यांना शस्त्रास्त्र उपकरणे पुरवणाऱ्या कंपन्यांचे शेअर्स वाढले. यामध्ये भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड, भारत डायनॅमिक्स लिमिटेड, सीरसी अॅडव्हान्स, लार्सन आयडियाफोर्ज टेक या कंपन्यांचा समावेश आहे.

» पान ७ वर

# अजूनही तैनात… कारवाईस केव्हाही तयार; नौदलाचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दहशतवाद्यांचा पाठीराखा असलेल्या पाकिस्तानने अरबी समुद्रात कोणत्याही कारवाया केल्या तर भारत "निर्णायक" कारवाई करण्यास तयार असल्याचा इशारा भारतीय नौदलाने रविवारी (दि. ११) दिला होता. त्यानंतर सोमवारी (दि. १२) पुन्हा एकदा शत्रुला धडकी भरवणारी ताकद भारतीय नौदलाने दाखवली आहे.

भारती नौदलाने लढण्यासाठी सदैव सज्ज — कोणत्याही वेळी, कुठेही, कोणत्याही प्रकारे असे म्हणत समुद्रातून लढाऊ विमान उड्डाणाच्या विहंगमय दृश्याचा व्हिडिओ शेअर केला आहे. नौदलाने या व्हिडिओसोबत "दृढ निश्चयाचे पंख, अचूकतेने आरंभ…

» पान ७ वर



### नौदल लक्ष्यांवर अचूक प्रहार करण्यास सक्षम

• भारतीय नौदलाने एक्स पोस्टमध्ये सांगितले आहे की, पहलगाम हल्ल्यानंतर अरबी समुद्रात विविध शस्त्रचाचण्या घेऊन युद्धनीती तपासली व त्यामध्ये सुधारणा करण्यात आल्या. या प्रक्रियेत नौदलाच्या कर्मचाऱ्यांची, शस्त्रास्त्रांची, उपकरणांची आणि युद्धप्लॅटफॉर्म्सची कार्यक्षमता पुन्हा तपासली गेली आणि ते विशिष्ट लक्ष्यांवर अचूक प्रहार करण्यास सक्षम असल्याचे सिद्ध झाले. दिवसाच्या सुरुवातीला नौदल संचालन महासंचालक व्हाइस अॅडमिरल ए. एन. प्रमोद यांनी सांगितले की, भारतीय नौदल अरबी समुद्राच्या उत्तरेकडील भागात आघाडीवर तैनात असून, अटकावात्मक आणि प्रतिकारक्षम स्थितीत आहे. समुद्रातील व जमीनवरील ठिकाणांवर ठराविक वेळी अचूक हल्ला करण्यासाठी नौदल पूर्णतः सज्ज आहे.

## नवनीत राणा यांना पुन्हा धमकी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**अमरावती :** भारत आणि पाकिस्तान दरम्यान सध्या तणावाचे वातावरण आहे. त्यावेळी भारतीय जनता पक्षाच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांना पाकिस्तानमधून धमकी आली आहे. पाकिस्तानातील वेगवेगळ्या फोनवरून जीवे मारण्याच्या धमकी त्यांना देण्यात आली आहे. याबद्दल नवनीत राणा यांनी मुंबईच्या खार पोलिसांना माहिती दिली आहे. नवनीत राणा यांना यापूर्वीही पाकिस्तानमधून धमकीचे मेसेज आले आहे.

नवनीत राणा यांना आलेल्या धमकीच्या संदेशात म्हटले आहे की, हिंदू शेरनी

» पान ७ वर

## पवार, गडकरी, फडणवीस, शिंदे एकाच मंचावर!

# सहकार क्षेत्राची १५० वर्षे पूर्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्राला सहकार क्षेत्राची पंढरी असं म्हटलं जातं. या सहकार क्षेत्रात केवळ साखर कारखानेच नाही, तर दूध उत्पादन संघ, पतसंस्था, सहकारी बँका, बचत गट यांसह विविध संस्थांचा समावेश आहे. अशा सहकार क्षेत्राचा जन्मच महाराष्ट्रात झाला. आज महाराष्ट्रातील हे सहकार क्षेत्र इतकं वाढलं आहे की, पश्चिम महाराष्ट्रातील संपूर्ण राजकारण याच सहकार क्षेत्रावर अवलंबून आहे. अशा या सहकार क्षेत्राला आज दीडशे वर्ष पूर्ण झाली असून, यावर विचार मंथन करण्यासाठी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर




येथे खासदार शरद पवार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार असे दिग्गज नेते एकाच मंचावर आले होते. यावेळी, त्यांनी सहकार क्षेत्राबाबत आपल्या भावना प्रकट केल्या.

या संदर्भात बोलताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, "१२ मे १८७५ रोजी सुपे येथे सावकारी विरोधात आंदोलन झालं. सावकारांच्या जाचाला, पिळवणुकीला वैतागून १८ पगड जाती आणि बारा बलुतेदार यांनी एकत्र येत सावकारांविरोधात मोठं बंड केलं. तीच सहकार चळवळीची सुरुवात मानली जाते. त्याला आता दीडशे वर्ष पूर्ण झाली असून, १५० वर्षांचा इतिहास आणि आत्मपरिक्षण करण्याची संधी आपल्याला मिळाली आहे. एखादा निष्कर्ष काढायचा असेल तर त्याचं मूल्यांकन करावं

» पान ७ वर

## अदानी सुमहाने मोडले सर्व विक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भारत पाकिस्तान युद्धबंदीच्या निर्णयानंतर उद्योगपती गौतम अदानी यांनी मोठा फायदा झाला आहे. अदानींच्या १० कंपन्यांनी इतकी चांगली कामगिरी केली की त्यांनी एका दिवसात ७० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली. कंपन्यांच्या शेअर्समध्ये प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे सर्व कंपन्यांच्या मार्केट कॅपमध्ये वाढ झाली आहे.

सर्वात मोठा फायदा अदानी ग्रुपची प्रमुख कंपनी अदानी एंटरप्रायझेसला झाला आहे. ज्यामध्ये सुमारे २० हजार कोटी रुपयांचा नफा झाला आहे. गौतम अदानी यांच्या सिमेंट कंपन्यांच्या मार्केट कॅपमध्येही चांगली वाढ झाली आहे. वीज आणि ऊर्जा कंपन्यांच्या शेअर्समध्ये वाढ झाली आहे.

बीएसईच्या आकडेवारीनुसार, अदानी ग्रुपच्या एकूण

» पान ७ वर

# आम्ही दहशतवादी तळांनाच लक्ष्य केले

## लष्कराकडून भारताची भूमिका स्पष्ट



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तान यांच्यातील शस्त्रसंधीसंदर्भात लष्कराकडून पत्रकार परिषद घेण्यात आली. हवाई दलाने सांगितले की, ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून आम्ही केवळ दहशतवादी तळांना लक्ष्य केले. पाकिस्तानने केलेल्या कारवाईमुळे आम्हाला प्रत्युत्तर देणे भाग पडले. पाकिस्तानकडून चिनी क्षेपणास्त्रांनी आमच्यावर हल्ला केला, पण ते आमच्या हवाई संरक्षण यंत्रणेत घुसण्यात अपयशी ठरले. आमच्या संरक्षण यंत्रणेने वाटेतच ही क्षेपणास्त्रे नष्ट केली.

हवाई दलाच्या वतीने माध्यमांशी बोलताना एअर मार्शल भारती म्हणाले की, आम्ही केवळ दहशतवाद्यांवर, त्यांच्या तळांवर अचूक हल्ले केले, पण पाकिस्तानी सैन्याने ते स्वतःवर घेतले. पाकिस्तानी सैन्याशी युद्ध करणे किंवा त्यांच्या तळांना लक्ष्य करणे हा आमचा उद्देश नव्हता. हे यापूर्वीही आमच्याकडून स्पष्ट करण्यात आले

» पान ७ वर

# वडिलांच्या हौतात्म्याचा बदला घेईन - मुलीचे उद्गार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमध्ये पाकिस्तानने केलेल्या हल्ल्यात राजस्थानचे जवान सुरेंद्र कुमार मोगा शहीद झाले. उधमपूरमध्ये सुरेंद्र मोगा तैनात होते. सुरेंद्र मोगा हे लष्कराच्या मेडिकल युनिटमध्ये सेवा देत होते. सुरेंद्र कुमार यांचे पार्थिव त्यांच्या मूळ गावी मेहरादसी येथे पोहोचले तेव्हा प्रत्येकाचे डोळे पाणावले होते.

सामान्य लोकांपासून ते राज्यातील वरिष्ठ नेते, लोकप्रतिनिधी आणि लष्करी अधिकाऱ्यांपर्यंत अनेकजण सुरेंद्र कुमार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी जमले होते. जयपूरच्या लष्करी तुकडीनेही शहीद सुरेंद्र यांना मानवंदना दिली. सुरेंद्र यांची पत्नी आणि मुलांचं दुःख काळीज पिळवटून टाकणारं होतं.

शहीद जवान सुरेंद्र यांच्या सात वर्षांचा मुलगा दक्ष याने चितेला अग्नी दिला. त्यावेळी ११ वर्षांची मुलगी वर्तिका तिरंगा हातात धरून मोठ्या धाडसाने म्हणाली की, "मी मोठी होऊन सैन्यात भरती होईन आणि माझ्या वडिलांच्या हौतात्म्याचा बदला घेईन. पाकिस्तान नष्ट झाला पाहिजे." वर्तिकाचे उद्गार ऐकून अनेकांचा उर अभिमानाने भरून आला, मात्र डोळ्यातील अश्रू थांबत नव्हते.

शहीद सुरेंद्र कुमार यांची पत्नी सीमा देवी यांची स्थिती पाहून अनेकांना अश्रू अनावर झाले. सुरेंद्र कुमार यांचा गणवेश सीमा देवी यांना हवाई दलाने दिला

» पान ७ वर

# मध्य महाराष्ट्रात वादळी वाऱ्यांसह विजांचा कडकडाट

**हवामान**

### हवामान खात्याचा सतर्कतेचा इशारा

**ऑरेंज अलर्ट:** नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भारतीय हवामान विभागाने देशातील विविध भागांमध्ये पुढील काही दिवसांमध्ये वादळी वाऱ्यांसह विजांचा कडकडाट होईल असा हवामान स्थितीचा इशारा दिला आहे. यामध्ये निकोबार द्वीपसमूह, त्रिपुरा, उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीम यांसारख्या प्रदेशात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

या पावसामुळे स्थानिक जनजीवनावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, तसेच पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या



उप-हिमालयीन भागांमध्ये देखील वादळ, विजांच्या कडकडाटासह प्रतितास ५० ते ६० किमी वेगाने वारे वाहण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. यामुळे शेती, वाहतूक यावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अंदमान आणि निकोबार येथे काही भागांत ३० ते ४० किमी प्रतितास वेगाने जोरदार वारे, विजांचा कडकडाट आणि पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासन आणि नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज देण्यात आलेला आहे. भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्रात ११ ते १९ मे २०२५ दरम्यान वादळी पाऊस, विजांचा कडकडाट आणि गारपिटीचा इशारा दिला आहे. या कालावधीत राज्यातील अनेक भागांत हवामानात मोठे बदल होण्याची शक्यता वर्तवली आहे.

#रा

» पान ७ वर

### हवामान विभागाचे इशारे

• यलो अलर्ट: मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, परभणी, जालना, नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# राष्ट्रपती भवनातही घुमला 'जय जय महाराष्ट्र' चा नारा...!



# पुण्याच्या 'तरूणाई' ची दिल्लीच्या तख्तावर 'बाजी'...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रपती भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या 'सन्मानाने वृद्धत्व – ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी उपक्रम' या कार्यक्रमात पुण्यातील जनसेवा फौंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. विनोद शहा यांचा 'सिनियर अनसंग हिरोज' हा सन्मान देऊन गौरव करण्यात आला. यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्यमंत्री श्री. बी. एल. वर्मा, सचिव अमित यादव आणि सहसचिव मोनाली धकाटे यांच्यासह केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयातील अधिकारी उपस्थित होते. जनसेवा फाउंडेशन, पुणेच्यावती ने ट्रस्टी व शासकीय कार्यक्रम प्रमुख, आरआरटीसी प्रमुख जयदेव नाईक आणि कार्यक्रम अधिकारी जयवंत मंत्री यांनी प्रतिनिधित्व केले.

या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिक कल्याण पोर्टलचे उद्घाटन करण्यात आले. राष्ट्रपतींनी सिनियर अनसंग हिरोजशी संवाद देशातील ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांची माहिती करून घेतली. तसेच ज्येष्ठ नागरिक निवासगृहांचे राष्ट्रपतींच्या हस्ते ऑनलाइन स्वरूपात उद्घाटन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी प्रतिज्ञा करण्यात आली. तसेच ज्येष्ठांसाठी सहाय्यक साधने आणि उपकरणांचे वाटप करण्यात आले. ब्रह्माकुमारी संस्था यांच्यासोबत सामंजस्य करारावर यावेळी स्वाक्षरी देखील करण्यात आली.

यावेळी बोलताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, "वडीलधाऱ्यांचा सन्मान करणे हा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. ज्येष्ठ हे केवळ आपल्या भूतकाळाचे साक्षीदार नाहीत, तर भविष्यासाठी ते मार्गदर्शकही आहेत."




## 'सहेला रे.. ' गानमैफलीचे शनिवारी आयोजन

**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाउंडेशन यांच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत 'कलाश्री ' प्रस्तुत 'सहेला रे.. ' ही गानमैफल सादर होणार आहे. ही रंगतदार सांस्कृतिक संध्या शनिवार, दि.१७ मे रोजी संध्याकाळी ६ वाजता भारतीय विद्या भवनच्या सरदार महादेव बळवंत नातू सभागृहात होणार आहे.अभिषेक काळे आणि डॉ.राधिका जोशी हे कलाकार भारतरत्न पं.भीमसेन जोशी,गानसरस्वती किशोरी आमोणकर यांच्या रचना सादर करणार आहेत.कार्यक्रमाचे निवेदन डॉ.वंदना बोकील-कुलकर्णी या करणार असून मालू गावकर (हार्मोनियम),रामकृष्ण करंबेळकर(तबला) हे साथसांगत करणार आहेत.

भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाउंडेशन यांच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २४४ वा कार्यक्रम असून प्रवेश विनामूल्य आहे.

## महावितरणकडून केएसबीला सौर पंप पुरवठ्याचे आदेश

**पुणे :** केएसबी लिमिटेडने २०२५ च्या पहिल्या तिमाहीत भक्कम आर्थिक कामगिरी करत स्थैर्य आणि सातत्यपूर्ण वृद्धी दाखवली आहे. कंपनीची एकूण विक्री ५९५ कोटी रुपये झाली असून, २०२४ च्या याच तिमाहीच्या तुलनेत त्यात ९.४ टक्क्यांची घसघशीत वाढ झाली आहे. ऑपरेटिंग नफा मार्जिन ११.४ टक्क्यांवर स्थिर राहिला आहे, ज्यामुळे कंपनीच्या प्रभावी व्यवस्थापन क्षमतेवर शिक्कामोर्तब झाले आहे. या तिमाहीत कंपनीने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वपूर्ण असे यश संपादन केले आहे. 'प्रधानमंत्री कुसुम योजना'अंतर्गत (घटक बी) त्यांना काम मंजुरी पत्र प्राप्त झाले आहे. त्रिपुरा अक्षय ऊर्जा विकास संस्थेने केएसबीला सुमारे १४ कोटी किंमतीचे ९६२ सौर जलपंप प्रणाली पुरवठ्याचे काम दिले आहे. त्याचबरोबर, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेअंतर्गत सुमारे ४९ कोटी ) किंमतीचे २००० सौर पंप पुरवठ्याचे आदेश प्राप्त झाले आहेत.



## अण्णा तळवलकर मेमोरियल ट्रस्टचे पुरस्कार जाहीर

**पुणे :** कै. कृ. ब. उर्फ अण्णा तळवलकर मेमोरियल ट्रस्टतर्फे १८ व्या वार्षिक पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून यांदाचा समाजशिक्षक पुरस्कार ज्ञान प्रबोधिनी मानसशास्त्र संस्थेच्या संचालक आणि ज्येष्ठ मानसशास्त्र संशोधिका डॉ. अनघा लवळेकर यांना, तर अनुकरणीय उद्योजक पुरस्कार कंझ्युमर शॉपी या व्यवसाय प्रदर्शनांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करणाऱ्या मीनल मोहाडीकर यांना देण्यात येणार आहे, अशी माहिती कै. कृ. ब. उर्फ अण्णा तळवलकर मेमोरियल ट्रस्टतर्फे श्रीकांत कुलकर्णी आणि चारुदत्त आलेगावकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळवली आहे. या पुरस्कारांचे वितरण परम विशिष्ट सेवा मेडल विजेते निवृत्त लेफ्टनंट जनरल सुदर्शन हसबनीस यांच्या अध्यक्षतेखालील कार्यक्रमात करण्यात येणार आहे. रविवार दिनांक १८ मे २०२५ रोजी संध्याकाळी ५.०० (पाच) वाजता, गणेश सभागृह, न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रस्ता, येथे हा पुरस्कार वितरण सोहळा होणार असून सर्वांसाठी खुल्या असलेल्या या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# टँकर माफियांची 'बनवाबनवी'...!

### गत वर्षीच्या तुलनेत ६ हजार २३३ फेऱ्यांची वाढ : कोट्यावधींचा चुराडा

मुबलक पाऊस होउनही आणि धरणे तसेच नद्या ओसंडू भरुन वाहिल्या असतानाही गतवर्षीच्या तुलनेत यंदा टँकरच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे; धक्कादायक बाब म्हणजे पाणीपुरवठा करण्यास सक्षम असल्याचा दावा करत असलेले महापालिका प्रशासन यामध्ये सपशेल अपयशी ठरले आहे. पाणी पोचत नसल्याची ओरड बहुतांशी सोसायटीधारकांनी सुरु केली आहे, विशेष म्हणजे पिण्यासाठी असलेले हे पाणी चक्क अन्य कामासाठी वापरले जात असल्याचे दाहक वास्तव अनेकवेळा उजेडात आले आहे. टँकरमाफियांच्या या 'बनवाबनवी'मुळे कोट्यावधी रुपयांचा चुराडा होत आहे, तरीही सर्व काही आलबेल असल्याचा दावा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात बहुतांश ठिकाणी पाणीपुरवठा वाहिन्यांचे जाळे पोहचले नाही. त्यामुळे नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यास पाणीपुरवठा विभागाला मर्यादा येतात. त्यामुळे पालिकेमार्फत अनेक भागांत टँकरने पाणीपुरवठा केला जातो. महापालिकेकडे टँकर कमी असल्याने पाणीपुरवठा करण्यासाठी ठेकेदारांची देखील नियुक्ती करण्यात आली आहे. ८ टँकर असलेल्या ठेकेदारांमार्फत हे पाणी पुरविले जाते. यासाठी शहरात टँकर भरणा केंद्र देखील आहेत. हे पाणी पुरविण्यासाठी पालिका ठेकेदारांना पैसे देते. ज्या सोसायट्यांना पाणी कमी पडते किंवा त्यांना अतिरिक्त पाण्याची गरज आहे अशा सोसायट्यांना ठरलेले शुल्क भरून टँकर दिले जातात. या सर्व टँकर फेऱ्यांची नोंद पालिकेच्या पाणीपुरवठा विभागातर्फे ठेवली जाते. या वर्षीच्या नोंदीत गत वर्षीच्या तुलनेत ६ हजार २३३ फेऱ्यांची वाढ झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

शहराला पाणी पुरविणाऱ्या धरणांत पाणीसाठा मुबलक असताना देखील यंदा पुणेकरांच्या टँकरच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. महापालिकेने या वर्षी पुणेकरांना तब्बल ४७ हजार ८३६ टँकर फेऱ्यांद्वारे पाणी पुरविले. गेल्या वर्षी एप्रिलच्या तुलनेत या वर्षी टँकर फेऱ्यांत ६ हजार २३३ ने, तर २०२३ च्या तुलनेत १४ हजार १९३ फेऱ्यांची वाढ झाली आहे. असे असले तरी मार्च महिन्याच्या तुलनेत एप्रिल महिन्यात उन्हाचा कडाका सर्वाधिक असताना देखील टँकर फेऱ्यांची संख्या ६० ने घटली आहे.



पुण्यात या वर्षी एप्रिल आणि मे महिन्यात उन्हाचा चांगलाच कडाका वाढला आहे. तापमान जवळपास ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेले होते. यामुळे पाण्याची देखील मागणी वाढली. ही वाढलेली पाण्याची मागणी पूर्ण करताना पालिकेच्या नाकी नऊ आलेले. ही वाढलेली मागणी पूर्ण करण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा वाढविण्यात आला. या वर्षी एप्रिल महिन्यात महापालिकेतर्फे टँकरच्या ४७ हजार ८३६ फेऱ्या झाल्या. गेल्या गतवर्षीच्या एप्रिल महिन्याच्या तुलनेत टँकर फेऱ्यांमध्ये ६ हजार २३३ ने वाढ झाली, तर २०२३ च्या तुलनेत तब्बल १४ हजारांनी वाढ झाली. २०२३-२४ च्या एप्रिल महिन्यात टँकरच्या एकूण ३३ हजार ६४३ फेऱ्या झाल्या होत्या, तर २०२४-२५ मध्ये टँकरच्या ४१ हजार ६०३ फेऱ्या झाल्या. २०२५-२६ मध्ये महापालिकेकडे ४७ हजार ८३६ टँकर फेऱ्यांची नोंद झाली आहे.

खासगी टँकरचालक आपला पाणीसाठा वापरून पाणीपुरवठा करतात. याची नोंद पालिकेने ठेवणे गरजेचे असताना ती ठेवली जात नाही. हे टँकर बरेचदा वापरायच्या पाण्यासाठी मागविले जातात. मात्र, त्यांच्या शुल्कावर नियंत्रण ठेवले जात नसल्याने टँकरचालकांकडून मोठी रक्कम आकारून नागरिकांची लूट केली जाते. याबाबत अनेक तक्रारी करून देखील अशा टँकरमाफियांवर कारवाई केली जात नाही.

| महिना | वर्ष | टँकरफेऱ्या |
|---|---|---|
| एप्रिल | २०२३ | ३३,६४३ |
| एप्रिल | २०२४ | ४१,६०३ |
| एप्रिल | २०२५ | ४७,८३६ |
| मार्च | २०२५ | ४७,८९६ |

मार्च २०२५ च्या तुलनेत एप्रिल महिन्यात शहरात जास्त ऊन होते. उन्हाचा पारा चाळिशी पार गेला होता. मात्र, असे असताना देखील महापालिकेने पुरविलेल्या टँकरसंख्येत थोडी घट झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत ६० टँकरने ही घट झाली आहे. महापालिकेने मार्च महिन्यात ४७ हजार ८९६ टँकर फेऱ्यांद्वारे पाणी पुरविले होते. त्या तुलनेत एप्रिल महिन्यात उकाडा अधिक असूनही टँकर फेऱ्यांची संख्या काहीशी घटली आहे. एप्रिल २०२५ मध्ये ४७ हजार ८३६ टँकर फेऱ्यांची नोंद झाली आहे.

# अभ्यासाच्या तणावातून विद्यार्थ्याची आत्महत्या



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भोपाळ येथील एम्समध्ये वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या बीडमधील १८ वर्षीय विद्यार्थ्याने पुण्यातील वानवडी भागात राहत्या ठिकाणी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. उत्कर्ष महादेव हिंगणे असं या विद्यार्थ्याचं नाव असून, त्याने बाथरूममध्ये स्वतःचा गळा चिरून जीवन संपवलं.

उत्कर्षने आत्महत्येपूर्वी व्हॉट्सअॅपवर एक पोस्ट लिहत आपल्या कृत्याची माहिती दिली. या सुसाईड नोटमध्ये त्याने अभ्यासाच्या तणावामुळे आत्महत्या करत असल्याचं नमूद केलं आहे. पोलिसांनी ही सुसाईड नोट जप्त केली असून, ती तपासासाठी पाठवण्यात आली आहे.

ही घटना वानवडीतील फातिमा नगरमधील पंचरत्न हाऊसिंग सोसायटीत सोमवारी सकाळी सव्वा सहाच्या सुमारास घडली. पोलिस नियंत्रण कक्षाला याबाबत माहिती मिळाल्यानंतर वानवडी पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. बाथरूममध्ये रक्ताच्या थारोळ्यात उत्कर्षचा मृतदेह आढळून आला. त्याच्या शरीरावर धारदार शस्त्राच्या जखमा होत्या.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक सत्यजित आदमाने यांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्कर्ष हा मूळचा बीड जिल्ह्यातील असून, भोपाळ येथील एम्स रुग्णालयात वैद्यकीय शिक्षण घेत होता. एका शैक्षणिक कार्यक्रमासाठी तो पुण्यात आला होता. मात्र, अभ्यासाचा ताण सहन न झाल्यामुळे त्याने हे टोकाचं पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. उत्कर्षसारखा हुशार विद्यार्थी अभ्यासाच्या दबावाखाली असा निर्णय घेतो, हे अत्यंत दुर्दैवी आहे.

# वाचन संस्कृतीसाठी प्रियंका चौधरींकडून पुस्तक वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वाचनसंस्कृतीला चालना देण्यासाठी आणि ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने, "लायब्ररी गर्ल" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रियंका चौधरी यांनी ५००० पुस्तकांचे मोफत वाटप पुणे शहर आणि उपनगरात केले. या उपक्रमाअंतर्गत विविध प्रकारची पुस्तके – कथा, विज्ञान, आत्मविकास, शालेय अभ्यासक्रम, आणि बालसाहित्य वाचकांच्या हातात मोफत पोहोचवण्यात आली. निमित्त होत त्यांच्या जन्म दिनाचे जन्मदिनाचा वायफट खर्च न करता समाजहिताचा प्रियंका यांनी हा उपक्रम राबवला.

यामध्ये प्रामुख्याने स्थानिक सामाजिक संस्था, शाळा आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात आले, जेणेकरून ज्ञानाची समान संधी सर्वांना मिळावी. हाच मूळ उद्देश होता. नागरिक, विद्यार्थी, शिक्षक आणि वाचनप्रेमी यांचा यात सहभाग मोठ्या प्रमाणात होता. प्रियंका चौधरी म्हणाल्या, "वाढदिवस साजरा करताना तो समाजासाठी उपयुक्त ठरावा, हीच माझी भावना आहे. प्रत्येकाच्या हातात पुस्तक पोहोचवणे हे माझं ध्येय आहे."

सध्या काळात वाचन संस्कृती लोप पावताना आपणाला दिसत आहे. त्या वाचन संस्कृतीला नवसंजीवनी देण्यासाठी माझ्या तर्फे हा मी खारीचा वाटा उचलला आहे.



पुणे वाचनसंस्कृतीला चालना देण्यासाठी आणि ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने, "लायब्ररी गर्ल" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रियंका चौधरी यांनी ५००० पुस्तकांचे मोफत वाटप पुणे शहर आणि उपनगरात केले

# आई हे जगातले सर्वोत्तम विद्यापीठ : प्रा. मिलिंद जोशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** परमेश्वराने हे जग निर्माण केले आणि आपल्या अस्तित्वाचा प्रत्यय येत राहावा यासाठी त्याने आईची निर्मिती केली. मुलांचे भावनिक भरणपोषण करणारी आई हे जगातले सर्वोत्तम विद्यापीठ आहे, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी व्यक्त केले.

जागतिक मातृदिनानिमित्त जय गणेश व्यासपीठ, पुणेतर्फे विघ्नहर्ता कार्यकर्ता मातृगौरव सन्मान सोहळ्याचे मराठाचेंबर ऑफ कॉमर्स येथे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी प्रा. जोशी बोलत होते. आमदार हेमंत रासने, लक्ष्य फाऊंडेशनच्या प्रमुख अनुराधा प्रभुदेसाई, अॅड. प्रताप परदेशी यांची प्रमुख उपस्थिती होती. शहराच्या विविध भागातील २१ मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या मातांचा या वेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तर मुलांनी आपल्या आईचे पेढा भरवून तोंड गोड केले. सुरुवातीस सुवासिनींनी मातांचे औक्षण करून पाद्यपूजन केले.



पियूष शहा (साईनाथ मंडळ ट्रस्ट), विश्वास भोर (अखिल मंडई मंडळ), किरण सोनीवाल (वीर शिवराज मित्र मंडळ), प्रल्हाद थोरात (श्री शिवाजी मित्र मंडळ), राहुल जाधव (ओम हरिहरेश्वर मंडळ) यांच्या पुढाकारातून या हृद्य आणि भावस्पर्शी सोहळा आयोजित केला होता.

प्रा जोशी म्हणाले, या जगात जी गोष्ट आईसाठी म्हणून केली गेली ती अजरामर झाली आहे. पैशातील गुंतवणुकीइतकीच नात्यातील गुंतवणूक महत्वाची आहे हे समजून घेणे महत्वाचे आहे. सार्वजनिक जीवनात कार्यकर्ता म्हणून काम करणाऱ्यांना हारांपेक्षा प्रहारच अधिक मिळतात.



"गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांच्या आईचा सत्कार ही अभिवन कल्पना आहे. पुण्याची सांस्कृतिक राजधानी अशी ओळख निर्माण करून देण्यात गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांचा मोठा वाटा आहे. अनेक वर्षांपासून सामाजिक-राजकीय क्षेत्रात कार्यरत आहे, पण पहिल्यांदाच आईचा सन्मान होताना पाहात आहे.

—आमदार हेमंत रासने,

# डंपरच्या अपघातांची ‘बंपर ऑफर’...!

## नगर रस्त्यावर होतोय ‘मृत्यूचा पाठलाग’: मद्यधुंद चालक अन् नियमांची ऐशी की तैशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



राष्ट्रसंचार EXCLUSIVE

**पुणे :** गेल्या काही महिन्यांपासून नगर रस्त्यावर डंपरच्या माध्यमातून नियम धाब्यावर बसवून दगड आणि खडीची अनाधिकृत वाहतूक होत आहे, धक्कादायक बाब म्हणजे गर्दीच्या वेळेस या डंपरला रस्त्यावर येण्यास मनाई असतानाही ते बेमालूमपणे रस्त्यावर धावत असून आतापर्यंत डंपरच्या अपघातामुळे अनेक निष्पाप जीवांना प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे अपघातांची ‘बंपर ऑफर’च निर्माण झाली असून हे डंपर अक्षरश: ‘मृत्युचा पाठलाग’ करत आहे, विशेष म्हणजे हे विदारक दृश्य दिसत असतानाही पोलीस प्रशासन बड्या धेंडाना पोसण्यासाठी त्यांच्यावर कारवाई करण्यास कुचराई करत आहेत.

नगर रस्ता हा शहराच्या पूर्वेकडील महत्त्वाचा महामार्ग समजला जातो. या महामार्गावरुन अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, बीड या महत्त्वाच्या शहरांसह मध्यप्रदेश राज्यातही प्रवेश करणे शक्य होते. विशेष म्हणजे हा महत्त्वाचा महामार्ग असतानाही त्याचे रुंदीकरण करताना कोणतेही नियोजन करण्यात आलेले नाही. त्यामुळे चंदननगर, वाघोली, लोणीकंद, कोरेगाव भिमा, शिक्रापूर, रांजणगाव गणपती याठिकाणी नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे वाहनचालकांसह स्थानिक नागरिकांनाही मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत असून पाच ते दहा किलोमीटर प्रवासासाठी तब्बल एक एक तास वेळ लागत आहे.

हे वास्तव असतानाच गेल्या काही वर्षांपासून दगड आणि खडीची अनाधिकृत वाहतूक करत असलेल्या डंपरमुळे या महामार्गावरील वाहतूक अधिकच ‘जाम’ होत आहे; त्यातूनच अपघातांची संख्या दिवसेदिवस अधिकच वाढत चालली आहे. त्यामुळे सकाळी आणि संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेस या महामार्गावर डंपरच्या वाहतूकीला बंदी घालण्यात आली होती, तरीही या बंदीचा आदेश धुडकावून अनेक डंपर बिनधास्तपणे या रस्त्यावर धावत असून बंदीच्या काळातच सर्वाधिक अपघात झाले आहेत. मात्र; वाहतूक पोलीस या अनाधिकृत वाहतूकीला पाठीशी घालत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.



> या अनाधिकृत वाहतूकीमुळे निरपराधांना त्याची शिक्षा भोगावी लागत आहे, मुळात या वाहतूकीवरच नव्हे तर खाणीवरही शासनाने बंदी घालण्याची आवश्यकता आहे. मात्र; त्यांना पाठीशी घालण्याचे महापाप प्रशासन आणि शासनही करत आहे. त्यामुळे त्याची गंभीर दखल घेऊन आता नागरिकांनीच हा लढा हातात घेण्याची आवश्यकता आहे.
>
> **-चंद्रकांत वारघडे,** संस्थापक अध्यक्ष, माहिती सेवा समिती

### असे बसवितात नियम धाब्यावर...!

- प्रमाणापेक्षा अधिक दगड आणि खडीची वाहतूक
- बहुतांशी चालकांकडे वाहन परवाना नाही
- धुळ साचल्याने नंबरप्लेट दिसतच नाही, परिणामी कारवाई अशक्य
- सर्वच चालक नशेत करतात ड्रायव्हिंग
- रॅश ड्रायव्हिंग आणि नियमांचा भंग

### कारवाईत सातत्य राहणार का ?

■ या खाण मालकांपैकी सर्वाधिक खाणमालक हे वाघोली आणि परिसरातील असून त्यांचा अनाधिकृत व्यवसाय महसूल विभागालाही माहिती आहे, त्यामुळे याची दखल घेऊन आमदार माऊली कटके यांनी विजयी झाल्यानंतर अशा प्रवृत्तींना थारा देणार नाही असा इशारा दिला होता. तरीही या खाणमालकांमध्ये किंचितही सुधारणा झालेली नाही, आता वाघोलीच्या वाहतूक विभागाच्या सहाय्यक पोलीस निरीक्षकपदाची सूत्रे दत्तात्रय लिंगाडे यांनी हाती घेतली आहेत. त्यांनी पहिल्याच आठवड्यात धडाकेबाज कारवाई सुरु करत वचक बसविण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. मात्र; या कारवाईत सातत्य राहणार का ? हे आता येणारा काळच ठरविणार आहे.

## कर्नाटक आंब्याचा हंगाम बहरला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोकणातील हापूसचा हंगाम अंतिम टप्प्यात आल्यानंतर कर्नाटक आंब्याचा हंगाम बहरला आहे. कर्नाटकातून आंब्यांची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. हापूसप्रमाणे चव असलेल्या कर्नाटकातील आंब्यांना मागील काही वर्षांपासून मागणी वाढली आहे. यंदा वातावरणातील बदलामुळे हापूसचे उत्पन्न कमी प्रमाणावर आले आहे. जून महिन्यापर्यंत कर्नाटकातील आंबा बाजारात उपलब्ध राहणार आहे. दरवर्षी कर्नाटकातील आंब्यांचा हंगाम १५ एप्रिलपर्यंत सुरू होतो. यंदा कर्नाटक आंब्यांचा हंगाम १५ दिवस उशिराने सुरू झाला आहे. हंगामाच्या पहिल्या टप्प्यात आवकही चांगली होत आहे. यंदा हापूसचा हंगाम लवकर संपणार आहे. देवगड, रत्नागिरी, रायगड जिल्ह्यातून होणारी आंब्याची आवक कमी झाली आहे.

कर्नाटक आंब्यांचा हंगाम साधारणपणे १५ जूनपर्यंत सुरू राहणार आहे. हापूस बाजारात उपलब्ध नसल्याने ग्राहकांकडून कर्नाटक आंब्यांच्या मागणीत वाढ झाली आहे. कर्नाटकातील तुमकूर भागात आंब्यांची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जात असल्याची माहिती कर्नाटक आंब्यांचे व्यापारी रोहन उरसळ यांनी दिली.



## रामदास मारणे यांना 'विद्यावाचस्पति सन्मान'

**पुणे :** सामाजिक कार्यकर्ते रामदास मारणे यांना त्यांच्या सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'विद्यावाचस्पती सन्मान' देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान पं. दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ यांच्या वतीने हॉटेल रेडिसन पार्क इन, अयोध्या धाम येथे आयोजित राष्ट्रीय संगोष्ठी आणि दीक्षांत समारंभ प्रसंगी प्रदान करण्यात आला. या विशेष प्रसंगी पद्मश्री डॉ. अरविंद कुमार, माजी कुलगुरू, राणी लक्ष्मीबाई केंद्रीय कृषी विद्यापीठ, झांसी यांच्या हस्ते रामदास मारणे यांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. इंद्रभूषण मिश्रा, कुलगुरू, पं. दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ तसेच वृंदावन धाम, मथुरा येथील प्रसिद्ध कथावाचिका दीपा मिश्रा आदी मान्यवर उपस्थित होते. रामदास मारणे हे "युवा भारती" या युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. तसेच ते ग्रीनगाई पर्यावरण व शाश्वत विकास फाउंडेशन या पर्यावरण शिक्षण व शाश्वत विकासासाठी कार्य करणाऱ्या संस्थेचे अध्यक्ष म्हणून देखील कार्यरत आहेत. यावेळी पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारसरणीवर आधारित सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकास यावर सखोल चर्चा झाली.



## सिंबॉयोसिस सेंटर फॉर डिस्टन्सच्या लोगोचे अनावरण

**पुणे :** डिस्टन्स लर्निंग क्षेत्रात अतिशय उत्तम पणे काम करत असलेल्या, सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंगला २५ वर्ष पूर्ण झाली. या निमित्त किवळे येथील सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या ऑडिटोरियम मध्ये आयोजित कार्यक्रमात सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंगच्या रौप्य महोत्सवी लोगोचे अनावरण मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राच्या संचालिका मुक्ता अवचट पुणतांबेकर, सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ शा. ब. मुजुमदार, तसेच सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटीच्या प्रिन्सिपल डायरेक्टर डॉ. स्वाती मुजुमदार हस्ते करण्यात आले.डॉ. स्वाती मुजुमदार म्हणाल्या, "तंत्रज्ञान भविष्यात महत्वाची भूमिका बजावणार आहे, आणि दुर्गम भागात मध्ये शिक्षण पोहचवण्या करीता फायदेशीर ठरणार आहे, दुर्गम भागांना जोडण्याचे काम या तंत्रज्ञानामुळे शक्य होणार आहे, आणि याचाच मागोवा घेऊन एक व्हर्च्युअल ग्लोबल कॅम्पस तयार करण्याचा माझा मानस होता.

## मार्केटयार्डात कोलकात्ता येथून लिचीची आवक

**पुणे :** गुलटेकडी मार्केटयार्ड फळबाजारात कोलकात्ता येथून लिचीची आवक होत आहे. २४ एप्रिलपासून लिचीच्या हंगामास सुरुवात झाली आहे.



सुरूवातीला १०० ते १५० बॉक्स इतकी आवक होत होती.आता त्यात वाढ होऊ ती १५०० ते १६०० बॉक्सवर पोहचली आहे. घाऊक बाजारात दर्जानुसार दहा किलोच्या एका बॉक्सला १६०० ते २४०० रूपये भाव मिळत आहे. येत्या आठवडाभरात बिहार येथूनही लिचीची आवक सुरू होईल, अशी माहिती लिचीचे व्यापारी शैलेश परदेशी यांनी दिली. रंगाने लाल चुटूक, काटेरी आणि चवीला गोड असणाऱ्या 'लिची' या फळाचा हंगाम सुरू झाला आहे. ग्राहकांकडून लिची या फळाला मोठी मागणी असल्याने भाव तेजीत आहेत. किरकोळ बाजारात लिचीच्या प्रतिकिलोस २५० ते ३५० रूपये दर मिळत आहे. जून अखेर ते जुलै महिन्याच्या पहिल्या आठव्यापर्यंत हा हंगाम सुरू असतो. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा हंगाम वेळेत सुरू झाला आहे. सध्या चांगल्या दर्जाच्या लिचीची आवक सुरू असेही परदेशी यांनी नमूद केले.

## अभ्यंकर फाऊंडेशनतर्फे पोलीस चौकींसाठी कुलर भेट

**पुणे :** मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज, अँड ॲग्रीकल्चर (एमसीसीआयए) आणि क्रेडाई पुणे मेट्रोचे माजी महासंचालक डॉ. डी. के. अभ्यंकर यांच्या विद्यावाचस्पती दिवाकर अभ्यंकर फाऊंडेशनच्या वतीने शास्त्री रस्त्यावरील सेनादत्त पोलीस चौकी, अलका टॉकीज आणि नारायण पेठ पोलीस चौकी यांसाठी एअर कुलर्स देणगी स्वरूपात देण्यात आले.



नुकतेच सेनादत्त पोलीस चौकीचे अतुल साळवे यांनी डॉ. अभ्यंकर यांच्या हस्ते या कूलर्सचा स्वीकार केला. गेल्या काही दिवसात वाढलेला उन्हाचा तडाखा लक्षात घेत, कायमच कार्यतत्पर असलेल्या आपल्या पोलीस बांधवांना आपुलकीचा गारवा मिळावा या उद्देशाने हे कूलर्स देगणी स्वरूपात दिले असून नजीकच्या भविष्यात आणखी पोलीस चौकींमध्ये ते देण्याचा मानस डॉ. अभ्यंकर यांनी यावेळी व्यक्त केला.

# पुन्हा मुदतीचे ‘उड्डाण’...!

## कात्रज चौकातील उड्डाणपुलासाठी ‘अडथळयाची शर्यत’

वाहतूकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या आणि दोन मार्गांना जोडत असलेल्या कात्रज चौकातील वाहतूक कोंडी सोडविण्यात महापालिका प्रशासनाला सपशेल अपयश आले आहे, आश्चर्याची बाब म्हणजे या कामाच्या पूर्णत्वासाठी खुद्द केंद्रिय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांनी आदेश देऊनही प्रशासनाने त्यांचेच आदेश धाब्यावर बसविले आहेत. विशेष म्हणजे या उड्डाणपूलासाठी अकरा जागांचे भूसंपादन करणे आवश्यक असतानाही आतापर्यंत केवळ सात जागा ताब्यात घेण्यात आल्या आहेत, त्यामुळे हा घोळ आणखीनच वाढत चालला असून त्यासाठी सातत्याने मुदतवाढ घ्यावी लागत आहे. परिणामी या उड्डाणपूलासाठी ‘अडथळयांची शर्यत’ कायम सुरु आहे.

> जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सक्तीचे भूसंपादन करत आहोत. पुणे महापालिकेने तडजोडीने काही जागा ताब्यात घेतली आहे. उर्वरित जागेचा आम्हाला प्रस्ताव मिळाला असून त्यानुसार आम्ही कारवाईला सुरवात केली आहे. या प्रक्रियेनुसार मोजणी झाली आहे. तरीही जागा ताब्यात घेण्यासाठी किमान सहा महिन्याचा कालावधी लागणार आहे.
>
> **- श्वेता दारुणकर,** विशेष भूमीसंपादन अधिकारी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आता कात्रज चौकातील उड्डाणपूल उतरविण्यासाठी राजस सोसायटी चौकातील एकूण ११ जागा अडथळा ठरत होत्या. त्या जागा ताब्यात घेणे अत्यंत गरजेचे असताना यामधील केवळ ७ जागा ताब्यात आलेल्या आहेत. भूसंपादन विभागाकडून कामाला गती देत या जागा लवकर ताब्यात घ्याव्यात अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.

कात्रज चौकातील उड्डाणपुलाच्या कामामध्ये निर्माण होत असलेले अडथळे काही केल्या कमी होताना दिसत नाहीत. चौकातील वाहतूक कोंडी आणि भूसंपादनाच्या अडथळ्यांची शर्यत पार करत उड्डाणपुलाचे काम निम्म्यांपर्यंत आले. उड्डाणपूल उतरविण्यासाठी लागणारी संपूर्ण जागा ताब्यात घेण्यासाठी किमान सहा महिन्याचा अवधी लागणार आहे. त्यामुळे सहा महिन्याचा अवधी जागा ताब्यात येण्यास लागल्यानंतर पथविभागामार्फत पुढे किमान तीन महिने सेवा रस्ते करण्यासाठी अवधी लागेल. त्याशिवाय उड्डाणपूल उतरविता येणार नाही. कारण, वाहतूक त्या सेवा रस्त्यांवरुन वळविणे गरजेचे आहे. त्यानंतरच उड्डाणपूल उतरविण्याचे काम सुरु होईल. त्यामुळे उड्डाणपुलाच्या कामाला पुन्हा मुदतवाढीशिवाय पर्याय राहणार नाही.

मालमत्ता विभागाने आता जागा ताब्यात घेण्याचा चेंडू भूसंपादन विभागाच्या कोर्टात टाकला आहे. भूसंपादन विभागाकडून जागांची नुकतीच मोजणी करण्यात आली आहे. त्यानुसार भूसंपादन अधिकाऱ्यांकडून सक्तीने जागा ताब्यात घेण्याची कारवाई करण्यात येणार आहे. मोजणीनंतर भूसंपादन विभागाने हरकती आणि सूचनाही मागविल्या आहेत. त्यासाठी एक महिन्याची मुदत आहे. आतापर्यंत एकूण ४ हजार ५७७ चौ.मी. जागा अडथळा ठरत होती. त्यापैकी एकूण सुमारे ९ कोटी रुपये मोजून २ हजार १३९ चौ.मी जागा ताब्यात घेतली आहे. तर, उर्वरित निम्म्याहून अधिक २४३८ चौरस मीटर जागा ताब्यात घेणे बाकी आहे. विधानपरिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांनी एकत्रित पाहणी दौरा करुन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या कार्यालयात सर्व अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक घेतल्यानंतर उड्डाणपुलाबाबत नागरिकांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. त्यावेळी भूसंपादन कायद्यान्वये जागा ताब्यात घेण्याचा निर्णयही झाला होता. मात्र, मागील दोन महिन्यापासून भूसंपादनाच्या कामाला हवी तशी गती न मिळाल्याने उड्डाणपुलाचे काम डिसेंबरअखेरपर्यंत पूर्ण होणार का याबाबत प्रश्नचिन्हे उपस्थित झाले आहे.

# पथ विक्रेता समितीच्या बैठकीला ‘तारीख पे तारीख’



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पथ विक्रेत्यांशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी नगर पथ विक्रेता समितीने आयोजित केलेल्या बैठकीच्या वेळेत अचानक बदल करण्यात आल्याने गोंधळ उडाला. दरम्यान, राज्य सरकारच्या नगर विकास विभागाकडून अद्याप या समितीला मान्यता मिळालेल्या आदेशाची प्रतिक्षा आहे. समितीची निवड झाल्यानंतर अडीच वर्षे उलटूनही कायदेशीरदृष्ट्या ती अस्तित्वात आली नाही.

मनपाच्या अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागच्या उपायुक्तांनी नगर पथ विक्रेता समितीची बैठक लवकरात लवकर घेण्याची मागणी सदस्यांनी केली आहे. दरम्यान पथ विक्रेत्यांशी संबधित विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी नगर पथ विक्रेता समितीची बैठक ६ मे रोजी आयोजित करण्यात आली होती. मात्र, अचानकपणे या बैठकीची वेळ बदलल्यामुळे सर्व समितीच्या सदस्यांमध्ये गोंधळ उडाला.

प्रशासनाकडून दुपारी ४.३० वाजता बैठक बोलाविली होती. परंतु महापालिका आयुक्तांना वेळ नसल्याने त्यांनी ही बैठक सकाळी ११.३० वाजता बोलावली. वेळेत झालेल्या बदलासंबंधी दूरध्वनीद्वारे अधिकृत पूर्वसूचना बहुतेक सदस्यांना केवळ एक तास आधी मिळाली. त्यामुळे नव्याने निश्चित केलेल्या वेळेत कोणतेही सदस्य उपस्थित राहू शकले नाही. त्यामुळे या बैठकीत चर्चा होऊ शकलेले मुद्दे प्रलंबित राहिले असल्यामुळे नव्याने नगर पथ विक्रेता समितीची बैठक लवकरात लवकर आयोजित करावी. अशी विनंती या पत्राद्वारे करण्याची माहिती समितीचे सदस्य सागर दहिभाते, गजानन पवार, नीलम अय्यर व कमल जगधने यांनी दिली.

# नागरी समस्येसाठी जनसंपर्क कार्यालय हक्काचे केंद्र -ना. पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नागरी समस्या सोडविण्यासाठी जनसंपर्क कार्यालय हे हक्काचे केंद्र असून, कोथरुड मतदारसंघातील संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांचे विविध समस्या सोडविण्यासोबतच; शासनाच्या लोकोपयोगी योजनांचा लाभ पोहोचवण्याची भावना राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी व्यक्त केली. कोथरुड मतदारसंघातील पाषाण-सुतारवाडी भागातील नागरिकांसाठी नवीन जनसंपर्क कार्यालयाचे लोकार्पण ना. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी भाजप उत्तर मंडल अध्यक्ष लहू बालवडकर, सरचिटणीस पुनीत जोशी, गणेश कळमकर, भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सरचिटणीस प्रल्हाद सायकर, माजी नगरसेविका ज्योती कळमकर, स्वप्नाली सायकर, प्रकाश तात्या बालवडकर, उत्तरचे माजी अध्यक्ष सचिन पाषाणकर, दक्षिणचे माजी अध्यक्ष डॉ संदीप बुटाला यांच्या सह भाजपचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ना. पाटील म्हणाले की, नागरी समस्या सोडविण्यासाठी जनसंपर्क कार्यालय हे हक्काचे केंद्र आहे. मतदारसंघातील विविध जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासोबतच; शासनाच्या विविध लोकोपयोगी योजना जनतेपर्यंत पोहोचविल्या. त्यामुळे या जनसंपर्क कार्यालयाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते सुकन्या समृद्धी योजनेच्या लाभार्थ्यांना योजनेचे कार्ड प्रदान करण्यात आले.



पुणे कोथरुड मतदारसंघातील पाषाण-सुतारवाडी भागातील नागरिकांसाठी नवीन जनसंपर्क कार्यालयाचे लोकार्पण राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री ना.चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते झाले. ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते सुकन्या समृद्धी योजनेच्या लाभार्थ्यांना योजनेचे कार्ड प्रदान करण्यात आले.

# दगडूशेठ गणपती बाप्पा ५ हजार शहाळ्यांमध्ये विराजमान



नैवेद्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे मंदिरात शहाळे महोत्सव आयोजित करण्यात आला. श्री गणेशांचे विविध लीला स्वरुपात अनेक अवतार पाताळ, पृथ्वी व स्वर्गलोकात झाल्याचे आपल्या पुराणात सापडते. त्यापैकी एक म्हणजे पुष्टिपती विनायक अवतार. पुष्टिपती विनायक जयंतीनिमित्त दगडूशेठ गणपती मंदिरात हा शहाळे महोत्सव आयोजित करण्यात आला होता.

वैशाख वणव्यापासून तमाम भारतीयांचे रक्षण व्हावे, दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष, शेतक-यांच्या समस्या दूर होण्यासोबत आरोग्यसंपन्न भारताकरीता दगडूशेठ गणपती बाप्पांसमोर प्रार्थना करीत शहाळे महोत्सवात ५ हजार शहाळ्यांचा महानैवेद्य बाप्पाला दाखविण्यात आला. शिव-पार्वतीच्या घरी वैशाख शुद्ध पौर्णिमेच्या शुभदिनी दुर्मती राक्षसाच्या वधार्थ झालेला हा अवतार आहे. वैशाख शुद्ध पौर्णिमेला सूर्योदयाच्यावेळी गणेश जन्माची पूजा व ब्रह्मणस्पती सुक्त अभिषेक झाला. तसेच मंदिरामध्ये गणेशयाग देखील करण्यात आला.

गाभा-यासह सभामंडपात शहाळ्यांची व वृक्षांची नयनरम्य आरास करण्यात आली होती. पहाटे गायिका सानिया पाटणकर आणि सहका-यांनी आपली गायन सेवा गणपती चरणी अर्पण केली. दुर्मती राक्षसाने पृथ्वी-पाताळ-स्वर्गलोक जिंकून सर्वत्र विध्वंस चालविलेला होता, त्याचा नित्पात करण्याकरिता पार्वती मातेला दिलेल्या वरानुसार भगवान श्री गणेशांनी विनायक अवतारामध्ये प्रगट होऊन दुर्मती राक्षसाचा वध केला. त्यामुळे वैशाख शुद्ध पौर्णिमेचा दिवस हा पुष्टिपती विनायक जयंती म्हणून साजरा केला जातो.

> श्री गणेश पुराण व मुद्गल पुराण या ग्रंथामध्ये या अवताराचा संदर्भ आढळतो. या अवतारामध्ये पुष्टी ही भगवान विष्णुंच्या घरी त्याची मुलगी म्हणून जन्म घेते व श्री गणेश हे विनायक स्वरुपात शंकर-पार्वती यांच्या घरी जन्म घेतात. वैशाख पौर्णिमेच्या पवित्र दिवशी श्री गणेशाचा पुष्टिपती विनायक हा अवतार झाला होता.
>
> **-सुनिल रासने,** अध्यक्ष, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट



## ‘एफएसएआय’चा पदग्रहण व शपथविधी समारंभ संपन्न

**पुणे :** सुरक्षित भारत साध्य करण्याच्या दृष्टिकोनातून स्थापन झालेल्या फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडिया (एफएसएआय) पुणे चॅप्टरचा २०२५ -२७ या कालावधीसाठी श्रीमती सुजल शाह यांची अध्यक्षपदी, अजित यादव यांची सचिवपदी तर श्री. विनायक जोगळेकर यांची प्रस्तावित अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

श्रीमती सुजल शाह आणि कार्यकारिणीचा पदग्रहण व शपथविधी समारंभ प्रादेशिक संचालक सी के अशर यांच्या हस्ते संपन्न झाला.

या प्रसंगी, पीएमआरडी आणि पुणे महानगर पालिकेचे मुख्य अग्निशमन आधिकारी देवेंद्र पोटफोडे, एफएसएआय चे अध्यक्षीय सदस्य पंकज धारकर, प्रादेशिक संचालक सी के अशर, सुरेश मेनन, महेश गव्हाणे, मिलिंद राणे, किन्नरी मेनन, दीक्षित, राजेश शिर्के, अर्चना गव्हाणे, सिंपल जैन, अमोल उंबरजे आणि पुणे चॅप्टरचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## भारती हॉस्पिटल येथे परिचारिका दिन साजरा

**पुणे :** आरोग्य व्यवस्थेत समाजहिताचे काम करणाऱ्या सर्व नर्सेस महिलांनी आपल्या शारीरिक आरोग्याबरोबरच आर्थिक आरोग्याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. असे मत अतिरिक्त विभागीय आयुक्त कविता द्विवेदी यांनी व्यक्त केले. भारती हॉस्पिटल येथे आयोजित परिचारिका दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी भारती विद्यापीठ आरोग्य विज्ञान विभागाच्या संचालिका डॉ. अस्मिता जगताप, मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. मंदार करमरकर, डेप्यु. मेडिकल डायरेक्टर डॉ. जितेंद्र ओसवाल, नर्सिंग सुप्रिटेंडट वैशाली धोंगडे, डेप्यु. नर्सिंग सुप्रिटेंडट भारती कुलकर्णी हे मान्यवर उपस्थित होते. द्विवेदी म्हणाल्या, नर्सेसचे काम हे सुंदर आहे. समाजाला निरोगी ठेवण्यासाठी त्यांचे योगदान मोठे आहे. पण हे काम करत असताना येणारा ताण हा मोठा आहे. या तणावाचे व्यवस्थापन प्रत्येक नर्सने केले पाहिजे. डॉ. अस्मिता जगताप म्हणाल्या, हॉस्पिटल हे नर्सेस व सपोर्ट स्टाफमुळे चालते. डॉक्टरांनी लिहून दिलेल्या उपचारांची प्रत्यक्षात अंलबजावणी नर्सेस करतात. यावेळी दीर्घकाळ सेवा केलेल्या नर्सेसचा तसेच विविध स्पर्धेत पुरस्कार प्राप्त नर्सेसचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली बामणे व वृषाली आंधळे यांनी केले तर वैशाली धोंगडे यांनी आभार मानले.




## ‘आम्ही सिडनीकर’ या पुस्तकाचे आज प्रकाशन

**पुणे :** पद्मयानी प्रकाशनातर्फे शरद पाठक यांच्या ‘चुकवू नये असे काही...’ आणि ‘आम्ही सिडनीकर’

या दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा मंगळवार दिनांक १३ मे रोजी दुपारी ४.०० वाजता, माधवराव पटवर्धन सभागृह, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ताआयोजित करण्यात आला आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रविण मसालेवालेचे संचालक विश्व चोरडिया, ज्येष्ठ साहित्यिक आणि संगणक तज्ज्ञ अच्युत गोडबोले आणि ज्येष्ठ मुलाखतकार सुधीर गाडगीळ यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. शरद पाठक यांनी जगभरातील भ्रमंतीमध्ये अधोरेखित केलेली शंभराहून अधिक पर्यटन स्थळे आणि सिडनीतील अनुभवांचे आत्मकथन वाचकांना या पुस्तकांमधून वाचायला मिळणार आहे.

# युद्धात नाही तर बुद्धात उपाय शोधू शकतो : डॉ.वि.दा.कराड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** " जगाला युद्धात नाही तर बुद्धात उपाय सापडू शकतो. जगाने बुद्धांच्या शिकवणींपासून शिकून शांतीचा मार्ग अवलंबला पाहिजे. अस्थिरतेने ग्रासलेल्या या पृथ्वी वर भगवान गौतम बुद्धाच्या ज्ञानाच्या मार्गाचे अनुसरण करून जीवन समृद्ध होऊ शकते. " असे विचार माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी व्यक्त केले.

तथागत भगवान गौतम बुद्ध पौर्णिमा एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी कवी डॉ. संजय उपाध्ये, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन.पठाण, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस, दुरदर्शनचे माजी संचालक डॉ. मुकेश शर्मा, माईर्स एमआयटीचे कुलसचिव प्रा.डॉ. रत्नदीप जोशी, डब्ल्यूपीयूचे कुलसचिव प्रा. गणेश पोकळे, प्रा.डॉ. दत्ता दंडगे, प्रा. विक्रांत गायकवाड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे अध्ययन प्रमुख प्रा.डॉ. विनोद जाधव उपस्थित होते.



● तथागत भगवान गौतम बुद्ध पौर्णिमा एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले," भगवान गौतम बुद्धांचे पंचशील तत्व आणि संत श्री ज्ञानेश्वर माऊलीचे पसायदान संपूर्ण जगाला शांतीचा मार्ग दाखवू शकतात. बुद्धांनी जागतिक धर्म, मानवता कल्याण आणि जातीभेदाच्या भिंती ओलांडून संपूर्ण मानवजातीला एकत्र आणण्याचे कार्य केले आहे. भारत हा जगभर भगवान बुद्ध आणि महात्मा गांधीसाठी ओळखला जातो."

डॉ.आर.एम.चिटणीस म्हणाले,"भगवान बुद्धांनी जगाला शांती व अहिंसेचा संदेश दिला. जगाला सत्य, शांती आणि मानवतेचा संदेश देणारे बुद्धांचे पंचशील तत्व मानवी जीवनाला योग्य दिशा देईल."

डॉ. एस.एन.पठाण म्हणाले," वर्तमान काळात संपूर्ण देशाला बुद्धांच्या विचारांची गरज आहे. या धर्मामध्ये सर्व धर्मांचे तत्व व वैचारिकतेचा समावेश आहे. पाप पुण्याचा विचार सोडून सदाचाराने व्यवहार करावा."

प्रा.दत्ता दंडगे म्हणाले," २५०० वर्षांपूर्वी स्थापन झालेला बौद्ध धर्म असून भगवान बुद्धांचे विचार आज ही आहे. हा धर्म पूर्ण तृप्तीतून उद्गम झालेला आहे. ज्ञानातून करूणा निर्माण होते आणि ती करूणा आचरणातून दिसायला हवी."

या नंतर डॉ. संजय उपाध्ये, डॉ. मुकेश शर्मा, प्रा. गणेश पोकळे व प्रा. विक्रांत गायकवाड यांनी भगवान गौतम बुद्धांचे विचार सांगितले आणि त्यांच्याकडून शिकण्यास सांगितले.

प्रा.डॉ. विनोदकुमार जाधव यांनी सूत्रसंचालन केले. तसेच प्रा. डॉ. विक्रांत गायकवाड यांनी आभार मानले.


# ‘सिंहगड’ ला मिळणार ‘गतवैभव’

## राज्य शासनाचा २८५ कोटींचा विकास आराखडा

‘हा कोंढाणा आपल्या स्वराज्यात आलाच पाहिजे’ अशी इच्छा खुद्द माँसाहेब जिजाऊंनी व्यक्त केली होती, त्यांचा हाच आदेश शिरसांवध्य मानत छत्रपती श्री शिवाजी महाराज यांनी हा गड ताब्यात घेण्याची मोहिम आखली होती. विशेष म्हणजे स्वत:च्या मुलाचे लग्न जवळ आले असतानाही ‘आधी लगीन कोंढाण्याचे आणि मग रायबाचे’ अशी गर्जना करत सुभेदार तानाजी मालुसरे या मोहिमेवर गेले होते. तेथे मुगलांशी लढत असतानाच ते धारातीर्थी पडले होते. त्यामुळेच महाराजांनी या गडाचे नामकरण ‘सिंहगड’ असे केले होते. मात्र; या ऐतिहासिक अशा गडाची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे या गडाला ‘गतवैभव’मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने तब्बल २८५ कोटींचा विकास आराखडा तयार केला आहे.



> सिंहगड किल्ल्याला शिवकालीन वैभव प्राप्त व्हावे, गडावरील ऐतिहासिक वास्तू, स्थळांचे जतन व्हावे तसेच देशासह जगभरातील शिवप्रेमींना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राष्ट्रीय लढ्याचा जिवंत इतिहास अनुभवता येण्यासाठी विकास आराखडा मंजूर होणे आवश्यक होते. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राज्य सरकारने छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील निस्सीम भक्तीपोटी विकास आराखडा मंजूर करण्यासाठी बहुमोलाचे योगदान दिले आहे.
>
> **- भीमराव तापकीर,** आमदार, खडकवासला विधानसभा मतदारसंघ



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आता सिंहगड किल्ल्याला पुन्हा शिवकालीन वैभव प्राप्त होणार आहे. स्थानिक आमदार भीमराव तापकीर यांच्या प्रयत्नातून राज्य सरकारने सिंहगड गडाच्या विकासासाठी २८५ कोटी रुपये खर्चाचा विकास आराखडा मंजूर केला आहे.

गडाच्या उन्मळून आलेला कल्याण दरवाजा, पुणे दरवाजासह ढासळणारी तटबंदी, बुरुज, पाऊल वाटा, पायऱ्या तसेच ऐतिहासिक वास्तूंची शिवकालीन बांधकाम शैलीत उभारणी करण्यात येणार आहे. या शिवाय पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पायी मार्गावर रेलिंग, शिवकालीन अमृतेश्वर व इतर मंदिरांचा जीर्णोद्धार, संग्रहालय, दिशादर्शक फलक, पाण्याच्या सुविधा, पार्किंग व्यवस्था, प्रकाश योजना व ५२ जलस्रोतांचे संवर्धन व पुनरुज्जीवन आदी कामे विकास आराखड्यात करण्यात येणार आहेत. सिंहगडच्या इतिहासात प्रथमच गडाच्या विकासासाठी मोठ्या निधीचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे.

आ. तापकीर हे गेल्या सात-आठ वर्षांपासून शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा करत होते, मात्र आराखडा मंजूर करण्यास शासनाकडून दिरंगाई होत असल्याने अनेक वर्षांपासून विकास आराखडा लालफितीत अडकला होता. त्यामुळे आ. तापकीर यांनी याकडे विधिमंडळात शासनाचे लक्ष वेधले होते, तसेच जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतही रखडलेल्या सिंहगड विकास आराखड्याचा प्रश्न उपस्थित केला होता. याची दखल घेत सरकारने विकास आराखड्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात सिंहगड विकास आराखड्याचे नुकतेच सादरीकरण करण्यात आले. उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी विकास आराखड्याला तत्त्वतः मान्यता देत हिरवा कंदील दाखवला आहे. आता हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी उच्चस्तरीय समितीकडे पाठविण्यात येणार आहे.

## विमानतळावर जाण्यासाठी कॅब सेवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** पुणेकरांना विमानतळावर वेळेत सोडण्यासाठी व विमानतळावरून इच्छित स्थळी नेण्यासाठी कॅबची नवी सेवा सुरु झाली आहे. ‘मेरू’ असे या कॅबसेवेचे नाव आहे. ही सेवा फक्त पुणे विमानतळासाठी असून इतर कंपन्यांप्रमाणे अन्यत्र याची सेवा नाही.

विमानाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची गरज लक्षात घेऊन ही सेवा सुरु करण्यात आली. पहिल्या टप्यात ५० कॅबच्या माध्यमातून सेवा दिली जाणार आहे. प्रवाशांचा प्रतिसाद वाढल्यानंतर कॅबच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

पुण्यात विविध कॅब कंपन्यांच्या सेवा आहेत पण ठराविक ठिकाण किंवा विमानतळासाठी प्रथमच सेवा सुरू झाली आहे. ही ‘मोबाईल अॅप’ आधारित सेवा आहे. प्रवाशांना विमानतळावर सोडणे व अथवा घेऊन येण्यासाठी यासाठी ‘प्रिमीयम सेवा दिली जात आहे.

सध्या कॅबची संख्या कमी असल्याने प्रवाशांना थोड्या वेळेसाठी वेटिंग करावे लागते, मात्र असे असले तरीही याची सेवा अधिक विश्वासार्ह व सुरक्षित असल्याचा दावा विमानतळ प्रशासनाने केला आहे. पुण्यात कॅबने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

**मेरू कॅबसेवेच्या काही मुख्य वैशिष्ट्यांमध्ये समाविष्ट आहेत:**

- 24/7 उपलब्धता:
- मेरू कॅबसेवा दिवस-रात्री, कोणत्याही वेळी उपलब्ध आहे.
- विविध प्रकारच्या गाड्या:
- मेरूकडे सेडान, हॅचबॅक आणि एसयूव्ही गाड्यांचा ताफा आहे, ज्यामुळे तुम्हाला तुमच्या गरजेनुसार गाडी निवडता येते.
- विविध पेमेंट पर्याय:
- तुम्ही रोख, इन-अॅप वॅलेट किंवा भारत क्यूआर कोडद्वारे पेमेंट करू शकता.
- अॅपद्वारे बुकिंग:
- मेरूचे अॅप तुम्हाला सहज आणि सोप्या पद्धतीने कॅब बुक करण्याची सुविधा देते.
- विमानतळ ट्रान्सफर:
- मेरू विमानतळ ट्रान्सफरसाठी देखील एक चांगली सेवा आहे, जी तुम्हाला शहरात आणि शहराबाहेर प्रवास करण्यासाठी मदत करते.
- भाडेकर सेवा:
- मेरू भाडेकर सेवेसाठी देखील उपलब्ध आहे, जी तुम्हाला लांब प्रवासासाठी किंवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी मदत करते.
- पुण्यामध्ये मेरू कॅबसेवेचा वापर:
- पुण्यामध्ये मेरू कॅबसेवा अनेक ठिकाणी उपलब्ध आहे, आणि अनेक लोक या सेवेचा वापर करतात.

# लक्ष्मीबाई दगडूशेठ दत्त मंदिरात सैनिकांना सलाम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने देशवासीयांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी आणि सैनिकांना अभिवादन करण्यासाठी वैशाख पौर्णिमा निमित्त श्री दत्त मंदिरात वीर माता -पत्नीच्या हस्ते माध्यान्ह आरती आणि सामूहिक प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले होते. आनंद सराफ, शिरीष मोहिते व वीर पत्नी दिपाली मोरे यांनी यासाठी नियोजन केले.

नयना बेंद्रे व कर्नल नवीन बालकृष्ण बेंद्रे (निवृत्त) यांच्या हस्ते दत्तयाग संपन्न झाला. यावेळी दत्तमंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र बलकवडे, कार्यकारी विश्वस्त अॅड. प्रताप परदेशी, खजिनदार अॅड. रजनी उकरंडे, उत्सव प्रमुख सुनिल रुकारी, उत्सव उप प्रमुख अक्षय हलवाई, विश्वस्त महेंद्र पिसाळ, अॅड. शिवराज कदम जहागिरदार, डॉ. पराग काळकर, युवराज गाडवे आदी उपस्थित होते.

विश्वस्त अॅड. शिवराज कदम जहागिरदार यांनी सांगितले की युद्धजन्य संकट येण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी जागरूक आणि शांत राहावे. संशयास्पद हालचाली दिसल्यास त्वरित पोलिसांना कळवा. अफवा पसरवू नका. केवळ खात्रीलायक माहितीच शेअर करा. प्रशासनाच्या सूचनांचे पालन करा.



पुणे कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने देशवासीयांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी आणि सैनिकांना अभिवादन करण्यासाठी वैशाख पौर्णिमा निमित्त श्री दत्त मंदिरात वीर माता -पत्नीच्या हस्ते माध्यान्ह आरती आणि सामूहिक प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले होते.

# बुद्ध जयंतीनिमित्त शहीद जवानांच्या कुटुंबियांसाठी एक लाखांचा धनादेश सुपूर्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** युद्ध नको बुद्ध हवा, हा संदेश जगाला मिळणे आवश्यक आहे. युद्धाला अंत नसतो हे युक्रेन आणि रशियाच्या युद्धाच्या स्थितीवरून समजते. संवेदनामधूनच भगवान गौतम बुद्ध, सम्राट अशोक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर निर्माण झाले. त्यांनी बुद्ध विचारांवर चालत शांततेचा पुरस्कार केला. शहीद जवानांच्या कुटुंबियांच्या संवेदनातूनच कार्यक्रमासाठी येणारा खर्च आर्मी रिलिफ फंडाला देण्याचा उपक्रम स्तुत्य आहे, असे प्रतिपादन रिपब्लिकन युवा मोर्चाचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी केले.




भंते नागघोष, भंते धम्मानंद, भंते प्रियदर्शी, भंते अंकुश माला आदी भिख्खुंनी त्रिसरण, पंचशील आणि धम्मदेसना दिली. या वेळी आंबेडकरी चळवळीतील रिपब्लिकन युवा मोर्चाचे अध्यक्ष राहुल डंबाळे, सुवर्णा पवार, यशवंत शिर्के, विजय गायकवाड, विजय कांबळे, गजानन जागडे, नामदेव घाडगे, सोपान लभाणे, सुभाष कांबळे, अनिल ननावरे, मेजर रणपिसे, मालती धीवार, रजनी वाघमारे, कविता घाडगे, मंगला गमरे, महार बटालियनचे कॅप्टन पोळके, सुभेदार वानखेडे आणि सहकारी उपस्थिती होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्रिसरन, पंचशील ग्रहण करण्यात आले. धम्मदेसना घेण्यात आली. या वेळी देशसेवेत भूमिका बजाविणाऱ्या महार बटालियन मधील माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. भंते संघाचे स्वागत करण्यात आला.

या वेळी डॉ. सिद्धार्थ धेंडे म्हणाले की, केंद्र आणि राज्य सरकारला आवाहन आहे. पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना सरकारने ५० लाख रुपये मदत म्हणून दिले आहे. मात्र दुसरीकडे देशातील आपल्या सैनिकांना युद्धात वीरमरण आले. ते शहीद झाले की त्यांच्या कुटुंबियांना मात्र तुटपुंजी मदत दिली जाते. त्यामुळे शहीद झालेल्या वीर जवानांच्या कुटुंबियांना देखील ५० लाखांची मदत द्यावी, असे आवाहन डॉ. धेंडे यांनी केले. तसेच शहीद जवानांच्या कुटुंबियांची जबाबदारी केंद्र सरकारने घ्यावी, अशी मागणीही या वेळी करण्यात आली.

या वेळी उपस्थित भंतेकडून युद्ध नको बुद्ध हवा हा संदेश देत असताना बुद्धाने शांतता व करुणाची शिकवण दिली आहे. परंतु स्वरक्षण करताना (स्वतःचे किंवा देशाचे) हिंसा करणे यात गैर नसते, हे उदाहरण देऊन तथागत गौतम बुद्धांचा खरा शांततेचा संदेश काय हे समजावून सांगितले.



> पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना सरकारने ५० लाख रुपये मदत म्हणून दिले आहे. मात्र आपल्या सैनिकांना युद्धात ते शहीद झाले त्यांच्या कुटुंबियांना मात्र तुटपुंजी मदत दिली जाते. त्यामुळे शहीद झालेल्या वीर जवानांच्या कुटुंबियांना देखील ५० लाखांची मदत द्यावी.
>
> **— डॉ. सिद्धार्थ धेंडे,** माजी उपमहापौर, पुणे मनपा



## २० हजार नागरिकांचा फीडबॅक गोळा करणार

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'पीसीएमसी @ 50' व्हिजन मोहिमेंतर्गत नागरिक सर्वेक्षणाची सुरुवात पिंपरी चिंचवड शहराच्या विविध विभागांमध्ये झाली आहे. स्वयंसहाय्यता गटांच्या २५० हून अधिक प्रशिक्षित महिलांमार्फत हे सर्वेक्षण करण्यात येत आहे. २०३२ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापनेला ५० वर्ष पूर्ण होत आहेत. महापालिकेच्या या सुवर्ण महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहराच्या विकास धोरणासाठी जवळपास २० हजार नागरिकांचा फीडबॅक गोळा करणे, हे या सर्वेक्षणाचे उद्दिष्ट आहे. पिंपरी चिंचवड महापालिका समाज विकास विभाग टाटा स्ट्राईव्हच्या सहकार्याने सक्षमा उपक्रमा अंतर्गत ही मोहिम राबविण्यात येत आहे. यासाठी महापालिकेचा सिटी ट्रान्सफॉर्मेशन उपक्रम (सीटीओ) सहकार्य करीत आहे. या सर्वेक्षणात निवासी व्यक्ती, व्यावसायिक आस्थापने आणि विविध संस्था येथील नागरिकांचा फीडबॅक गोळा केला जाणार आहे.

नागरिक या सर्वेक्षणात ऑनलाइन देखील सहभागी होऊ शकतात. महापालिकेच्या विविध विभाग कार्यालयांमध्ये आणि तसेच शहरातील विविध ठिकाणी याबाबत क्युआर कोड लावण्यात आले आहेत. हा कोड स्कॅन करून नागरिकांना सर्वेक्षणात ऑनलाइन सहभागी होता येईल. याशिवाय महापालिकेच्या संकेतस्थळाला भेट देऊन सर्वेक्षणात सहभागी होता येईल. पिंपरी चिंचवड शहराच्या भवितव्याला आकार देण्यासाठी 'पीसीएमसी @ 50' व्हिजन हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणात जास्तीतजास्त नागरिकांनी सहभागी व्हावे. सर्वेक्षणासाठी येणाऱ्या स्वयंसहाय्यता गटांच्या महिलांना सहकार्य करावे. तसेच सर्वेक्षण फॉर्म भरताना तुमचे योग्य मत नोंदवा. तुमचे मत आपल्या शहराच्या भवितव्यासाठी महत्त्वाचे आहे, असे आयुक्त शेखर सिंह यांनी म्हटले आहे.

## ठेकेदार विष्णू महादेव मातेरे यांचे अल्पशा आजाराने निधन



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरातील महापालिकेचे जेष्ठ ठेकेदार विष्णू महादेव मातेरे (वय ६६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. निगडी भक्ती शक्ती स्मशानभूमी येथे अंत्यविधी होणार असल्याचे नातेवाईकांनी कळविले आहे. विष्णू महादेव मातेरे (वय ६६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे.

## वाल्हेकरवाडी येथे १७ वर्षीय तरूणीचा खून



**चिंचवड :** दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञातांनी १७ वर्षीय तरूणीवर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरूणीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना रविवारी (दि.११) रात्री नऊच्या सुमारास कृष्णाई कॉलनी, वाल्हेकरवाडी येथे घडली. खून झालेल्या युवतीचे नाव कोमल असे आहे. याप्रकरणी युवतीचा मामा सचिन बिभीषण माने (वय ३९, रा. वाल्हेकरवाडी, चिंचवड) यांनी चिंचवड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, दुचाकीवरून आलेल्या दोघा अज्ञात इसमांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी सचिन माने यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन कोमलला आपल्या वाहनातून ऑक्सीकेअर रूग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी कोमलला पाहून तातडीने वायसीएम रुग्णालयात हलवण्याचा सल्ला दिला. मात्र, वायसीएम रुग्णालयात दाखल करताच डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. दरम्यान, माहिती मिळताच चिंचवड पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे. हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही.

## टीपी योजनेसाठी रस्त्यावर उतरू : ग्रामस्थांचा इशारा

**मोशी :** भूमिपुत्रांच्या विरोधात बळजबरीने महापालिका प्रशासन काही करणार असेल; तर त्याविरोधात रस्त्यावर उतरु, असा इशारा ग्रामस्थांकडून देण्यात आला. तसेच श्री नागेश्वर महाराज कृती समिती स्थापन करून पुढील दिशा ठरविण्याचा प्रस्तावही बैठकीत मंजूर करण्यात आला.मोशीतील बोऱ्हाडेवाडी, सावतामाळीनगर येथे राबविण्यात येणाऱ्या नगर नियोजन (टीपी) योजने विरोधात रविवारी ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराज मंदिरात स्थानिक गावकऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. त्याबैठकीत वरील इशारा देण्यात आला. माजी नगरसेवक धनंजय आल्हाट, वसंत बोराटे, अरूण बोऱ्हाडे, मंदा आल्हाट, राष्ट्रवादी महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट, रूपाली आल्हाट, संतोष बोराटे, सागर बोराटे, नारायण आल्हाट, सुभाष आल्हाट, देवस्थान ट्रस्टचे माजी अध्यक्ष नितीन सस्ते, राजेंद्र ओझरकर, संतोष आल्हाट, परशुराम आल्हाट आदी १५० हून अधिक स्थानिक नागरिक उपस्थित होते.

विकास आराखड्यात बोऱ्हाडेवाडीतील सुमारे २५० एकर जमीन हे हरित क्षेत्र आहे. हे क्षेत्र रहिवासी करण्यात यावे अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## संस्मरणीय गीतांनी श्रोते मंत्रमुग्ध



**पिंपरी** विविध भारती म्युझिकल इव्हेंट प्रस्तुत 'इतना तो याद हैं मुझे...' या संस्मरणीय हिंदी - मराठी गीतांच्या ऑडिओ - व्हिज्युअल नि:शुल्क सांगीतिक मैफलीत श्रोते मंत्रमुग्ध झाले. निगडी प्राधिकरणातील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात आयोजित करण्यात आलेल्या या विशेष सांगीतिक मैफलीत दिशा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब जवळकर, उपाध्यक्ष संतोष बाबर, ॲड. अंतरा देशपांडे, मोहनकुमार भस्मे, नीलेश भिंगारे, विनिता भिंगारे, मल्लिकार्जुन इंगळे, साहेबराव कावळे, तुषार कदम, राजेंद्र पगारे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

विनायक कदम, नंदकुमार कांबळे, अनिल जंगम, अरुण सरमाने, डॉ. सायली बांबुरडे, नेहा दंडवते, डॉ. किशोर वराडे, पिनाक भिंगारे, स्वाती भागवत, सुहास पालेकर या गायक कलाकारांसह विशेष अतिथी गायक कलाकार विजय वाघमारे आणि ललिता जगदाळे यांनी आपल्या एकल आणि युगुलस्वरातील सादरीकरणातून चित्रपटसंगीतातील काही लोकप्रिय आणि काही विस्मरणात गेलेल्या सुमधुर गीतांचा नजराणा पेश करीत रसिकांची मने जिंकून घेतली. देवश्री कदम आणि अंकिता जंगम या बालकलाकारांनी 'लगान' चित्रपटातील 'मधुबन में...' या गीतावर केलेले बहारदार नृत्य हे या मैफलीचे खास वैशिष्ट्य ठरले. विनायक कदम आणि नंदकुमार कांबळे यांनी संयोजन केले. सचिन शेटे यांनी विशेष साहाय्य केले. शैलेश घावटे यांनी ध्वनी संयोजन केले.

# बीपीएमएस मदत कक्षाची वानवा

### तांत्रिक कारणामुळे वारंवार प्रणाली बंद




राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पीएमआरडीए हद्दीतील बांधकामाबाबतची परवानगी आणि नियमावलीबाबत नागरिकांना माहिती व्हावी, तसेच त्यांच्या गैरसोय दूर करण्यासाठी पीएमआरडीएअंतर्गत बीपीएमएस मदतकक्ष स्थापन करण्यात आला आहे.

प्राधिकरणाच्या तळमजल्यावर या कक्षामध्ये येणाऱ्या अडचणींवर तात्काळ निराकरण येत असल्याचे सांगण्यात येते. मात्र, प्रत्यक्षामध्ये या केंद्रात नेमलेल्या कर्मचाऱ्यांना त्याबाबतचे विशेष ज्ञान नसल्याचे दिसून आले. तसेच, तांत्रिक कारणामुळे वारंवार ही प्रणाली बंद पडत असल्याचे दिसून आले. पीएमआरडीएकडून विकास परवानगी प्रक्रिया पारदर्शक व कार्यक्षम होत असल्याचा दावा करण्यात येतो. मात्र प्रत्यक्षामध्ये ही यंत्रणा फोल ठरत आहे. याबाबत त्या केंद्रात चौकशी केली असता, इंटरनेट सेवा बंद असल्याने ही प्रणाली विस्कळीत झाल्याचे सांगण्यात आले. तसेच, संबंधित प्रणालीचा डाटा आणि माहितीबाबत कर्मचाऱ्यांना कोणतीही माहिती नसल्याचे दिसून आले. त्यामुळे आलेल्या नागरिकांच्या समस्यांचे ते कशा पद्धतीने काय निराकरण करणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पीएमआरडीए कार्यालयात विविध कामानिमित्त अभियंते, आर्किटेक्ट, विकसक तसेच नागरिक येत असतात. या संबंधितांना कामानिमित्त वारंवार कार्यालयात यावे लागू नये, यासाठी पीएमआरडीएकडून ऑनलाइनच्या माध्यमातून (बीपीएमएस) म्हणजेच बिल्डिंग प्लांट मॅनेजमेंट सिस्टीम सुरू करण्यात आली आहे.

**नागरिकांना हेलपाट्यावर हेलपाटे**

- मात्र ही प्रणाली किचकट असल्याचे खुद्द येथील कर्मचारी सांगतात. त्यामुळे ऑनलाइन अर्ज करूनदेखील वारंवार होणाऱ्या तांत्रिक कारणामुळे ही सेवा बंद पडत आहे. त्यामुळे पुन्हा नागरिकांना पीएमआरडीएच्या कार्यालयात हेलपाटे मारावे लागत आहेत.

## पहिल्याच पावसामध्ये सांडपाण्याच्या वाहिन्या तुंबल्या

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपळे निलख :** मुळा नदीच्या सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. त्यासाठी भराव टाकण्यात आलेला आहे. जुन्या वाहिन्या फुटल्या आहे. त्यामुळे पहिल्याच पावसामध्ये नदीला जोडणाऱ्या सांडपाण्याच्या वाहिन्या तुंबल्या होत्या. त्यामुळे पंचशीलनगरमधील घरांमध्ये पाणी शिरले होते. याबाबत नागरिकांनी प्रशासनावर टीका केली आहे.

पिंपरी-चिंचवडच्या सीमेवर असणाऱ्या पिंपळे-निलख भागामध्ये मुळानदी सुधारचे काम सुरू झाले आहेत. त्यासाठी नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर भराव टाकला आहे. त्याचबरोबर काँक्रीटीकरण सुरू आहे. हे काम करत असताना जुन्या सांडपाण्याच्या वाहिन्या गाडल्या गेल्या आहेत. काही तुटलेल्या आहेत.

विशालनगरकडून बाणेरकडे जाणाऱ्या पुलाच्या अलीकडे पंचशीलनगर आहे. या भागामध्ये शुक्रवारी सायंकाळी जोरदार पाऊस झाला. पावसामध्ये मैला सांडपाणी वाहिन्या तुंबल्या. त्यामुळे पंचशीलनगरमधील सुमारे ५० ते ६० घरांमध्ये पाणी शिरले आहे. मैला सांडपाणी घरांमध्ये शिरल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

अचानक जोरदार पाऊस झाला. त्यामुळे पिंपळे निलख भागातील सखल भागात पाणी साचले होते. त्यातून वाहने काढताना चालकांना कसरत करावी लागली. सांडपाण्याच्या वाहिन्या, पावसाळी पाणी वाहून जाणारी गटारे तुंबल्याने घरात पाणी शिरले. त्यामुळे कपडे, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू साहित्याचे नुकसान झाले. नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे. याबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

> या भागामध्ये नदी सुधारचे काम आहे. आणि त्यासाठी जुन्या सांडपाण्याच्या वाहिन्या बुजवल्या गेल्या आहेत. पहिल्याच पावसामध्ये सांडपाणी मोठ्या प्रमाणात तुंबले आणि नागरिकांच्या घरात पाणी शिरले. त्यात मोठे नुकसान झाले आहे.
>
> — **अतुल खरात,** सामाजिक कार्यकर्ते

## कामगार चळवळ ज्योत तेवत ठेवण्याची गरज : सदाफुले

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महाराष्ट्र राज्यामध्ये औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अनेक कंपन्यांची स्थापना झाल्या त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवडसह औद्योगिककरणामुळे पुणे जिल्ह्यामध्येही कारखान्यात खूप मोठ्या प्रमाणात हजारोंच्या संख्येने कामगारांनी काम केले त्याकाळी त्यांना कामगार म्हणून विविध कामगार कायद्याद्वारे लाभ मिळाला. मात्र आता परिस्थिती वेगळी आहे. कामगाराची स्थिती आणि कामगाराची व्याख्या बदलत चाललेली आहे.

कामगार कामगार चळवळ क्षीण होत चालली असून कामगार चळवळीचे ज्योत पुन्हा तेवत ठेवण्याची गरज असल्याचे मत कामगार प्रशिक्षक पुरुषोत्तम सदाफुले यांनी केले. कष्टकरी संघर्ष महासंघ महाराष्ट्र, महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघातर्फे आयोजित कामगार दिन व महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने भव्य मेळावा व कष्टकरी कामगारांना पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले यावेळी ते बोलत होते.




# वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या ट्रान्सफॉर्मरचे स्थलांतर..!

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** देहू- आळंदी रस्त्यावर चिखली-पाटील नगर येथील अत्यंत रहदारीच्या ठिकाणी महावितरण प्रशासनाचा जुना ट्रान्सफॉर्मर होता. त्यामुळे रस्त्यात अडथळा निर्माण होवून वाहतूक कोंडीची समस्या नियमित भेडसावत होती. याची दखल घेत आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेनुसार, ट्रान्सफॉर्मर स्थलांतरीत करण्याची कार्यवाही सुरू झाली आहे.

ट्रान्सफार्मर स्थलांतरीत करण्याच्या कामाचे भूमिपूजन रविवारी करण्यात आले. यावेळी कामगार नेते सचिन लांडगे, माजी नगरसेवक सुरेश म्हेत्रे, कुंदन गायकवाड, समाजिक कार्यकर्ते विनायक आबा मोरे, अंकुश मळेकर, मोरे काका, जितेंद्र यादव, संतोश मोरे, दिनेश यादव, योगेश सोनवणे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.





> चिखली आणि परिसरातील वाहतूक सक्षम करण्यासाठी महानगरपालिका विकास आराखड्यातील ७ डीपी रस्त्यांच्या कामांना आपण यापूर्वीच सुरूवात केली आहे. शहरातील "मिसिंग लिंक"चाही प्रश्न काही दिवसांत मार्गी लागणार आहे. सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांना वाहतूक कोंडीमुक्त रस्ते उपलब्ध करुन देण्यासाठी आम्ही सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहोत. चिखली- पाटीलनगर परिसरातील वाहतुकीला अडथळा ठरणारा ट्रान्सफॉर्मर हटवण्याची मागणी होती. त्यानुसार कार्यवाही सुरू झाली आहे. सर्वसामान्य नागरिकांना कोंडीमुक्त रस्ते उपलब्ध व्हावेत, यासाठी आम्ही आग्रही आहोत.
>
> — **महेश लांडगे,** आमदार, भाजपा

माजी नगरसेवक कुंदन गायकवाड म्हणाले की, भोसरी विधानसभा मतदार संघातील चिखली- पाटीलनगर येथे देहू- आळंदी रस्त्यावर वाहतुकीला अडथळा ठरणारा महावितरण प्रशासनाचा ट्रान्सफॉर्मर हटवण्याबाबत स्थानिक नागरिकांनी आमदार महेश लांडगे यांच्याकडे मागणी केली होती. त्यानुसार, महावितरण प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. अखेर सदर डीपी स्थलांतरीत करण्याच्या कामाला सुरूवात झाली आहे.

संपादकीय विशेष

# युद्धविराम का झाला?

अमेरिका आणि जी-7 देशांनी भारत आणि पाकिस्तानला केलेल्या आवाहनानंतर युद्धविराम करार करण्यात आला. अर्थात भारताने धडा शिकवण्याचा केलेला निर्धार पाहता पाकिस्तान मोठी किंमत मोजणार, हे स्पष्ट होते. त्यामुळे पाकिस्तानला युद्धविराम करावा लागला. अर्थात पाकिस्तान किती विश्वासघातकी आहे, याचा प्रत्यय पुढील तीन तासांमध्येच आला. मात्र युद्ध थांबवणेच आपल्या हिताचे आहे, हे पाकिस्तानने हेरले. अमेरिकेचे ऐकले नाही तर मदत मिळणार नाही, अमेरिकेची खप्पामर्जी परवडणारी नाही याची जाणीव पाकिस्तानला होती, तर तणाव कायम राहिला, तर आपली पाकव्याप्त काश्मीरमधील गुंतवणूक धोक्यात येईल, याची भीती चीनला होती. चीन कितीही पाठिराखा असला, तरी गुंतवणूक धोक्यात येणे आणि पाकिस्तानचा काही भाग तुटून विलग होणेही चीनच्या दृष्टीने परवडणारे नाही. त्यामुळे पाकिस्तानला गुडघे टेकवून युद्धबंदीला तयार व्हावे लागले. भारताच्या अटीही मान्य कराव्या लागल्या. पुढील लढाई कोणाच्याही भल्याची नाही, असे दोन्ही बाजूंना वाटते तेव्हा युद्धबंदी होते. जीवित आणि मालमत्तेचे नुकसान झाले तर जनता दबाव निर्माण करते. तशी परिस्थिती पाकिस्तानमध्ये तयार झाली होती. कधी कधी युद्धविराम फक्त काही तासांसाठी असतो. लोकांना वाचवण्यासाठी किंवा जखमींना मदत करण्यासाठी असतो. तर कधी कधी ही बंदी वर्षानुवर्षे टिकते. 2003 मध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या युद्धविरामाचा परिणाम 2021 पर्यंत टिकला; परंतु त्यानंतर अनेक वेळा त्याचे उल्लंघन झाले.

भारत आणि पाकिस्तानमधील चार दिवसांच्या संघर्षानंतर युद्धबंदी जाहीर झाली असली, तरी या वेळी परिस्थिती आणि दृष्टिकोन दोन्ही वेगळे आहेत. भारताने दहशतवाद्यांच्या अड्ड्यांविरुद्ध यशस्वी लष्करी कारवाई केली आहेच; परंतु राजनैतिक, सामरिक आणि जागतिक व्यासपीठांवर पाकिस्तानला कोंडीत पकडण्यातही यश मिळवले आहे. युद्धबंदी हा फक्त तात्पुरता विराम आहे; परंतु भारतासाठी हा एक धोरणात्मक विजय आहे. भारताने पाकिस्तानला तिन्ही आघाड्यांवर लष्करी, राजनैतिक आणि नैतिक कोंडीत पकडले आहे आणि स्पष्ट केले आहे की दहशतवादाची आता कोणतीही किंमत राहणार नाही, फक्त प्रतिसाद मिळेल. या युद्धबंदीमुळे पाकिस्तानला काय मिळाले, याचा विचार करावा लागेल. भारताने 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमधील अनेक दहशतवादी लाँच पॅड, लपण्याची ठिकाणे आणि पुरवठा तळांना लक्ष्य करून नष्ट केले. हे हल्ले इतके अचूक आणि प्रभावी होते की, पाकिस्तानला माघार घ्यावी लागली.

आता भारताचे धोरण बदलले आहे. यापुढे कोणताही दहशतवादी हल्ला दहशतवाद नव्हे तर युद्ध मानला जाईल आणि त्यानुसार त्याला प्रत्युत्तर दिले जाईल, असा निर्णय भारताने घेतला आहे. केवळ पाकिस्तानलाच नाही, तर आंतरराष्ट्रीय समुदायासाठीही हा संदेश स्पष्ट आहे. भारत आता पूर्वीसारखी सहिष्णुता दाखवणार नाही, असा त्याचा अर्थ आहे. 'ऑपरेशन सिंदूर'ने पाकिस्तानमध्ये प्रचंड विनाश केला. भारताला जागतिक संवादाद्वारे आंतरराष्ट्रीय पाठिंबादेखील मिळाला आहे. भारताच्या संयम आणि कठोर धोरणाला जग पाठिंबा देत असल्याचे दिसून आले. मोक्याच्या आघाड्यांवर वेढा युद्धबंदी असूनही भारताने आपल्या रणनीतीमध्ये कोणतीही उदारता दाखवलेली नाही. सिंधू पाणी करार स्थगित करण्याचा निर्णय कायम आहे. तसेच दूतावासामधील कर्मचारी कमी करण्याचे, पाकिस्तानी नागरिकांना व्हिसा न देण्याचे आणि आर्थिक संबंध मर्यादित करण्याचे धोरणही त्यांनी कायम ठेवले आहे.

भारत जागतिक व्यासपीठांवर पाकिस्तानचा दहशतवादाला पाठिंबा असल्याचे पुरावे सतत सादर करत आहे. यामुळे पाकिस्तानला केवळ आंतरराष्ट्रीय स्तरावरच पेचप्रसंगाचा सामना करावा लागत नाही, तर त्याच्या आर्थिक मदतीवरही परिणाम होऊ शकतो. पाकिस्तानचा इतिहासही फसवणुकीने भरलेला आहे. कारगिल, संसदेवरील हल्ला, मुंबईवरील 26/11 चा हल्ला, पठाणकोट, उरी ते पुलवामा अशी किती तरी उदाहरणे आहेत. अशा परिस्थितीत भारताने या वेळी आपली दक्षता कमी केलेली नाही. पाकिस्तान फक्त 48 तासांमध्ये विनाशाच्या उंबरठ्यावर होता; पण युद्धबंदीने त्याला वाचवले. ज्या शस्त्रांनी पाकिस्तान भारतात विनाश घडवण्याचे स्वप्न पाहत होता, ती पूर्णपणे अपयशी ठरली. पाकिस्तानने बहुतेक शस्त्रे चीन आणि तुर्कीकडून खरेदी केली. पण वेळ आली तेव्हा ती निरुपयोगी ठरली. पाकिस्तानचे सर्व हल्ले अयशस्वी झाले आणि भारताचा वेगवान हल्ला रोखणेही त्यांना शक्य झाले नाही.

पाकिस्तानच्या हल्ल्यांना भारताने इतके चोख प्रत्युत्तर दिले, की त्याचे पडसाद तुर्कस्तान आणि चीनमध्येही उमटले असतील. कारण पाकिस्तान मागे पडल्याने त्यांच्या शस्त्रास्त्रांचे गुपितही उघड झाले आहे.

विद्ध्वंसाची व्याप्ती राजधानीसह अनेक शहरांपर्यंत पोहोचली. त्यामुळे लष्करप्रमख मुनीर आणि पंतप्रधान शाहबाज यांची चिंता वाढली. पाकिस्तानचे सैन्य घाबरू लागले. शेवटी, टिकून कसे राहता येईल, असा प्रश्न त्यांना पडला कारण तुर्की आणि चीनकडून मिळालेली शस्त्रे कुचकामी ठरली होती. तुर्कीकडून मिळालेल्या ड्रोनचा वापर करून पाकिस्तानने भारतात विनाश घडवण्याची योजना आखली होती; परंतु पाकिस्तानच्या ड्रोनने सीमा ओलांडण्याचा प्रयत्न करताच भारताच्या एस-400 आणि 'आकाश' या संरक्षण प्रणालीने नष्ट केले. दुसरीकडे, भारताने हल्ले केले, तेव्हा पाकिस्तानच्या सुरक्षा तळांवर बसवलेल्या चिनी संरक्षण प्रणाली त्यांना रोखू शकल्या नाहीत. भारतासमोर चीनचे तंत्रज्ञान अपयशी ठरले. पाकिस्तानने डागलेले प्रत्येक चिनी ड्रोन भारताने पाडले. यानंतर, सूड घेण्याचा टप्पा सुरू झाला, त्यात पाकिस्तानच्या लष्करी तळांवर मोठ्या प्रमाणात विनाश करण्यात आला. त्यामुळे पाकिस्तानचा पूर्णपणे पराभव झाला. भारताने पूर्ण ताकदीने हल्ला केला नाही. फक्त पाकिस्तानच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर दिले जात होते. भारताने पूर्ण ताकदीने हल्ला केला असता तर पाकिस्तानचा नाश निश्चित होता. या पार्श्वभूमीवर विनाश टाळण्यासाठी पाकिस्तानने युद्धबंदी करार केला असला, तरी कुत्र्याचे शेपूट नळीत घातले, तरी ते बाहेर काढल्यानंतर वाकडे ते वाकडेच असते. पाकिस्तान त्याच श्रेणीत मोडतो. युद्धबंदी कराराकडे त्या दृष्टीकोनातून पहावे लागेल.

# बुद्ध पौर्णिमा


मानवी जीवनातील दुःख निवारण्यासाठी बुद्धांनी आठ मार्ग सांगितले आहेत. यम, नियम, आसन, प्राणायम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, समाधी. गौतम बुद्धांनी आयुष्यभर शील, समाधी आणि प्रज्ञेचा मार्ग शिकवला. त्यांनी करुणा विकसित करण्याचा आणि समता, स्वातंत्र्य व बंधुत्व यावर आधारित जीवन जगण्याचा धडा लोकांना दिला.

बुद्ध पौर्णिमा केवळ भारतातच नाही तर जगातील १८० हुन अधिक देशात साजरी केली गेली. भारत, चीन, जपान, नेपाळ, भूतान, म्यानमार, थायलंड, श्रीलंका, मलेशिया, व्हिएतनाम, सिंगापूर, अमेरिका, कंबोडिया, इंडोनेशिया या देशात तर बुद्ध पौर्णिमा दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. जगातील सर्व बौद्ध धर्मीय बांधव बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करतात. बुद्ध पौर्णिमेला बोध गया येथे जगभरातून बौद्ध अनुयायी येतात आणि प्रार्थना करतात. बौद्ध धर्माच्या धर्मग्रंथाचे वाचन, पठण केले जाते. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे २ मे १९५० रोजी भारतात पहिली सार्वजनिक बुद्ध पौर्णिमा साजरी केली गेली. २७ मे १९५३ रोजी भारत सरकारने बुद्ध पौर्णिमेला सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. बुद्ध पौर्णिमेला सार्वजनिक स्वरूप आले आहे. भारतातील बौद्ध अनुयायींनी हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला. या दिवशी बुद्ध विहारे रंगीबेरंगी पताका, फुलांनी सजवली होती. बौद्ध बांधवानी यादिवशी गोडधोडाचे जेवण करून आपले मित्र नातेवाईक यांना घरी आमंत्रण देऊन आनंद साजरा केला. बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी सर्व बौद्ध भिक्षु व बौद्ध बांधवानी बुद्ध विहारात एकत्र येऊन प्रार्थना केल्याने एकोपा वाढला. बुद्धांची शिकवण अंगिकारण्याचा संकल्प आधुनिक जगाची ओळख करणारा आहे. बुद्धांनी सांगितलेल्या मार्गाने चालण्याचा निश्चय करतात. गौतम बुद्ध हे भारताचे सर्वोत्तम भूमिपुत्र आहेत. तथागत भगवान गौतम बुद्धांनी त्यांना मिळालेले ज्ञान समाजापर्यंत नेऊन एका वेगळ्या बदलाची पायाभरणी केली. त्याकाळात अंधश्रद्धा, कर्मकांड पाखंड यांनी उच्चांक गाठला होता. गौतम बुद्धांनी यावर प्रहार केला. नरबळी, पशुबळी, अंधश्रद्धा, कर्मकांड यांना त्यांनी कडाडून विरोध केला. गौतम बुद्धांनी मानव कल्याणाचा उपदेश केला. लोकांमध्ये असलेल्या स्वर्ग,नरक या भंपक गोष्टींबद्दल असलेली भीती दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. गौतम बुद्धांनी आपल्या अनुयायांना चार आर्यसत्य सांगितली ती चार आर्यसत्य आचरणात आणल्यास मानवाचे जीवन आनंदमय होऊ शकते. ती चार आर्य सत्य म्हणजे

१) मानवाला दुःख असते.
२) दुःखाला कारण असते.
३) दुःखाचे निवारण करता येते.
४) दुःख कमी करण्याचे उपाय आहेत.

मानवी जीवनातील दुःख निवारण्यासाठी बुद्धांनी आठ मार्ग सांगितले आहेत. यम, नियम, आसन, प्राणायम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, समाधी. गौतम बुद्धांनी आयुष्यभर शील, समाधी आणि प्रज्ञेचा मार्ग शिकवला. त्यांनी करुणा विकसित करण्याचा आणि समता, स्वातंत्र्य व बंधुत्व यावर आधारित जीवन जगण्याचा धडा लोकांना दिला. आज बुद्ध पौर्णिमेपासून सर्वांनी शिलाचे काटेकोरपणे पालन करून आपली काया, वाचा व मनाची कृती निष्कलंक राहील असा संकल्प करावा. सर्व नागरिकांनी तथागत गौतम बुध्दांच्या मार्गाने चालावे. गौतम बुद्धांनी दाखवलेला मार्ग हाच मानव मुक्तीचा मार्ग आहे.


# सावित्रीच्या लेकींचे प्रेरणादायी यश!

यशस्विनी रा
श्याम ठाणेदार



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. राज्याचा बारावीचा निकाल ९१. ८८ टक्के लागला. नेहमीप्रमाणे कोकण विभागाने या निकालात बाजी मारली. कोकण विभागाचा ९६ . ७४ टक्के निकाल लागला असून कोकण विभागाने राज्यात अव्वल स्थान पटकावले असून लातूर विभाग निकालात तळाशी राहिला आहे. लातूर विभागाचा निकाल ८९. ४६ टक्के इतका लागला आहे. लातूर विभाग टक्केवारीत सर्वांचा मागे पडला हे या निकालातून स्पष्ट दिसते. मागील दशकात लातूर विभाग हा दहावी बारावीच्या निकालात सातत्याने अग्रस्थानी राहिला आहे. लातूर पॅटर्न हा दहावी बारावीच्या निकालासाठी राज्यात प्रसिद्ध होता. आताही नीट आणि जेईई परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांची पसंती लातूरलाच असते. नीट आणि जेईईची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांची पहिली पसंती पुणे आणि दुसरी पसंती लातूर असते. ज्यांना शक्य आहे ते पालक आपल्या पाल्यांना राजस्थानातील कोटा येथेही पाठवतात मात्र महाराष्ट्रात लातूर पॅटर्नने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली असताना लातूरची निकालात इतकी घसरण होणे हे आश्चर्यकारकच आहे. अर्थात निकालात घसरण फक्त लातूर विभागाची झाली असे नाही तर संपूर्ण राज्याचा निकाल यावर्षी घसरला आहे. यावर्षी राज्याचा निकाल ९१. ८८ टक्के लगला जो मागील वर्षीच्या तुलनेत १.४९ टक्क्यांनी कमी आहे. मागील वर्षी म्हणजे २०२४ साली बारावीचा निकाल ९३.३७ टक्के होता. यावर्षी बारावीचा निकाल का घसरला ? असा प्रश्न विचारला जात आहे. यावर्षी राज्य सरकारने कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले त्यामुळे हा निकाल घसरला असण्याची शक्यता आहे. अर्थात हे चांगलेच झाले. कॉपीमुक्त परीक्षा या अभियानामुळे राज्याची खरी गुणवत्ता समोर आली. मध्यंतरी राज्याचा निकाल हा ९७ ते ९९ टाक्यांच्या दरम्यान असायचा आणि त्यात शेकडो विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळायचे. सरकारने कॉपीमुक्त परीक्षा हे अभियान राबवल्या मुळे कॉपिला काही प्रमाणात आळा बसला आहे. सरकारने हे अभियान यापुढेही चालू ठेवावे. विद्यार्थ्यांनी कॉपिवर अवलंबून न राहता वर्षभर नियमितपणे अभ्यास करावा कारण काळ झपाट्याने बदलत आहे. आता शिक्षणातही तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. आज उत्तरपत्रिका शिक्षक तपासित आहेत पण भविष्यात या परीक्षांच्या उत्तरपत्रिका ए आय च्या मदतीने तपासल्या जातील. जेंव्हा ए आय तंत्रज्ञान वापरून उत्तरपत्रिका तपासल्या जातील तेंव्हा निकाल आणखी घसरण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे तंत्रस्नेही शिक्षक दिसले गुरुजींनी यावर्षी त्यांच्या वर्गाच्या उत्तरपत्रिका ए आय तंत्रज्ञान वापरून तपासल्या. ए आय तंत्रज्ञानाने अवघ्या काही सेकंदात एक उत्तर पत्रिका तपासून होते हे त्यांनी दाखवून दिले त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात उत्तर पत्रिका तपासण्याकरिता होणार हे नक्की त्यामुळे यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही. अर्थात राज्याचा एकूण निकाल घसरला असला तरी या निकालात मुलींनी नेहमीप्रमाणे बाजी मारली आहे. यावर्षी जवळपास ९४.५८ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जवळपास ५ टक्क्यांनी अधिक आहे. मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८९.५१ टक्के इतके आहे. अर्थात दहावी असो की बारावी निकालात कायम मुलीच बाजी मारत असतात हे आपण यावर्षीच नाही तर मागील अनेक वर्षापासून पाहत आहोत. निकालात मुलींनी बाजी मारणे ही नक्कीच अभिमानास्पद बाब आहे. परीक्षार्थी मुलींची संख्या कमी असूनही उत्तीर्ण होणाऱ्या मुलींचे प्रमाण जास्त असणे हे मोठ्या शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे लक्षण आहे. सावित्रीच्या लेकिंची ही गरुड भरारी पाहून संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे. एकेकाळी केवळ चूल आणि मूल इतकेच ज्यांचे जग होते त्या मुली आज गगनभरारी मारत आहेत. सावित्रीच्या लेकींचे हे यश निश्चितच प्रेरणादायी आहे. एकेकाळी ज्या मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते त्याच मुली आज शिक्षण व्यवस्थेचे सर्वात मोठे संचित बनू पाहत आहे. पुरोगामी महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. कठोर परिश्रमाने मुलींनी हे यश मिळवले आणि इतरांना प्रेरणा दिली. कठोर परिश्रमातून मुलींनी हे यश मिळवून समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे. बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन आणि सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस मनापासून शुभेच्छा!

## सुप्रभात



### राशीभविष्य

- **मेष** : उत्तम वार्ता कानी येईल. येणे वसूल होईल. वाहन वा यंत्राचा वापर जपून करायला हवा.
- **वृषभ** : अंगभूत कला-गुणांचा विकास होईल. प्रवासात नव्या ओळखींचा लाभ घ्यावा. बाकी चिंता नसावी.
- **मिथुन** : व्यवसायात अनपेक्षित दिलासा मिळेल. मुलांना प्रगतीच्या संधी लाभतील. महत्त्वाच्या भेटी होतील.
- **कर्क** : प्रक्रिया उद्योगात अनुकूलता राहील. नव्या विचारांना चालना मिळेल. अचानक धनलाभ संभवतो.
- **सिंह** : खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. प्रियजनांचा सहवास लाभेल. यांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल.
- **कन्या** : अनुभवींचा सल्ला कामी येईल. आत्मविश्वासानं वाटचाल होत राहील. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
- **तूळ** : नोकरीत नव्या संधी लाभतील. सहकाऱ्यांची उत्तम साथ लाभेल. सरकारी कामं मार्गी लागतील.
- **वृश्चिक** : आर्थिक व्यवहार लाभदायक ठरतील. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. मुलांना अडचणी संभवतात.
- **धनु** : कामं रखडतील. स्थावर प्रश्नात तडजोडीचं धोरण ठेवावं. प्रवासात विशेष काळजी घ्यावी.
- **मकर** : यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. अनावश्यक खर्च टाळावा.
- **कुंभ** : विवाहेच्छुकांचे विवाह ठरतील. मोठ्या खरेदीचा उत्साह राहील. ज्येष्ठांनी प्रकृतीची काळजी घ्यावी.
- **मीन** : नोकरीत बदल संभवतो. धार्मिक कार्याचं समाधान लाभेल. घरगुती जबाबदाऱ्यांमध्ये वाढ होईल.

### कूल ड्रिंक्स — बनवा टेस्टी मॉकटेल्स

**रास्पबेरी लेमन मॉकटेल**

**साहित्य–** बर्फ (बारीक किसून), एक बाटली सोडा वॉटर, दोन मोठ चमचे व्हिप्ड क्रीम, अर्धा चमचा आल्याचा रस, दोन लहान चमचे लिंबाचा रस, दोन मोठे चमचे रास्पबेरी सिरप, एक कप क्रश्ड रास्पबेरी इत्यादी.

**कृती–** क्रश केलेली रास्पबेरी, रास्पबेरी सिरप, लिंबू आणि आल्याचा रस ब्लेंड करुन त्यात किसलेलं बर्फ आणि सोडा वॉटर मिसळावं. सर्व्हिंग ग्लासमध्ये तीन चतुर्थांश भरून वर क्रीम सेट करावं. चेरी लावून सजवावं.

**स्ट्रॉबेरी लेमोनेड**

**साहित्य–** चार कप स्ट्रॉबेरी, लिंबाचा रस, अर्धा कप साखर, अर्धा कप पाणी, तीन कप सोडा वॉटर, दोन कप बर्फाचा चुरा इत्यादी.

**कृती–** स्ट्रॉबेरी ब्लेंडरमधून बारीक करून गाळून घ्या. पाण्यात साखर विरघळवून फ्रीजमध्ये थंड करून घ्या. हे पाणी, स्ट्रॉबेरी आणि लिंबाचा रस एकत्र करा. सोड्यासह सर्व्ह करताना स्ट्रॉबेरीच्या फोडींनी गार्निश करा.

### दिनविशेष — १३ मे

**२०१५** : सरकारी जाहिरातींमध्ये केवळ राष्ट्रपती, पंतप्रधान आणि सरन्यायाधीशांचीच छायाचित्रे वापरता येणार असल्याचं जाहीर.
**२०१७** : 'रॅन्सवेअर'मुळे शंभर देशांना फटका. अनेक कंपन्यांचे कामकाज ठप्प.
**२०१८** : दिल्लीसह उत्तर प्रदेश आणि दक्षिणेकडे आंध्र आणि तेलंगणला धुळीच्या वादळासह अवकाळी पावसाचा जोरदार तडाखा.

### महत्त्वपूर्ण काही — बनवा बर्फाच्या बोटी

मित्रांनो, उन्हाळ्यात थंडाव्याची आस असते. सगळं काही गारेगार हवं असतं. मग एखादी गारेगार कलाकृती साकारण्याचा विचार कसा वाटतोय तुम्हाला? यासाठी तुम्हाला बर्फाचा वापर करायचा आहे. बर्फाचा वापर करून तुम्हाला शिडाची होडी बनवायची आहे. ही कलाकृती सोपी आहेच शिवाय बनवताना तुम्हाला खूप मजाही येईल. चला तर मग, कामाला लागू या.

**साहित्य:** बर्फ, छोट्या आकाराचा स्ट्रॉ, कन्स्ट्रक्शन पेपर इत्यादी.

**कृती:** बर्फाच्या ट्रे मध्ये पाणी भरून फ्रीझरमध्ये ठेवा. बर्फ अर्धवट लागलेला असताना त्यात स्ट्रॉचा तुकडा खोचून ठेवा. आता बर्फ सेट होऊ द्या. म्हणजे तो बर्फाचा तुकडा ध्वजस्तंभ किंवा धुराडं असलेल्या बोटीसारखा दिसेल. आता हा बर्फ बाहेर काढा. दुसरीकडे कन्स्ट्रक्शन पेपरचे त्रिकोणी आकारात तुकडे कापून घ्या. पंचिंग मशीनने त्रिकोणांना खालून आणि वरुन भोकं पाडा. कागद स्ट्रॉमध्ये अडकवा. आता बर्फाची ही बोट पाण्यात सोडा. बर्फाच्या या बोटी खूप छान दिसतील.

### पंचांग

**मंगळवार, १३ मे २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
वैशाख कृ. १, नक्षत्र : विशाखा
चंद्रराशी : वृश्चिक, योग : परिघ
सूर्योदय: ६.०७, सूर्यास्त: ७.०३


### फॉरवर्डस

**अपनों के दिए जख्म बडा तकलीफ देते हैं।
अपनोंकी बेवफाई इंसान को तोड देती हैं।
जिंदा ही मर जाना पडता हैं।
कभी-कभी किस्मत ऐसे मोड लाकर छोड देती हैं।**

### आरोग्यमंत्र — वाढवा प्रतिरोधक शक्ती

आजारांनी सहजासहजी शरीराचा ताबा घेऊ नये यासाठी रोगप्रतिकारकक्षमता वाढवणं अत्यंत गरजेचं असतं. ही क्षमता वाढवण्यासाठी आहारात विविध पोषक घटकांचा समावेश करायला हवा. याविषयी...

✽ प्रथिनांमुळे शरीर आतून मजबूत बनतं. रोगांचा सामना करण्याबरोबरच शरीराची हानी भरून काढेपर्यंतची अनेक कामं प्रथिनांमुळे होतात. त्यामुळे शरीरात उत्तम दर्जाची प्रथिनं जाणं गरजेचं ठरतं. हे लक्षात घेता अंडी, मासे, चिकन आणि डाळी यांचा आहारात समावेश करायला हवा. वजनाच्या प्रत्येक किलोसाठी एक ग्रॅम प्रथिनं दररोज शरीराला मिळायला हवीत. म्हणजे वजन ६८ किलो असेल तर तुम्हाला दिवसाला ७० ग्रॅम प्रथिनांची गरज आहे हे ओळखा आणि त्याप्रमाणे आहाराचं नियोजन करा.



✽ रोगप्रतिकारक क्षमता वाढवायची असेल तर आहारात 'क' जीवनसत्त्वाचा समावेश करायला हवा. आवळा, किवी, संत्रं यासारखी फळं खाल्ल्याने 'क' जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात मिळू शकतं.

✽ बी १२ हे जीवनसत्त्व रोगप्रतिकारक क्षमता वाढवतं शिवाय आजार बरा करण्यासही मदत करतं. बी १२ हे जीवनसत्त्व प्राणीजन्य पदार्थांमध्ये आढळतं. दूध, मांस, अंडी यामध्ये हे जीवनसत्त्व असतं. त्यामुळे या घटकांचं सेवन वाढवा. शाकाहारी असाल तर डॉक्टरांच्या सल्ल्याने बी १२ जीवनसत्त्वाच्या गोळ्या घ्या.

### स्मार्ट लूक

दोस्तांनो, उन्हाळ्यात लेअरिंगचा पर्याय बाजूला ठेवावा लागतो. या दिवसात टी शर्ट, जीन्स, ट्राउजर्स, शॉर्टस असा सिंपल आणि सोबर लूक कॅरी करावा लागतो. पण या लूकमध्येही तुम्ही रंगत आणू शकता. ॲक्सेसरीजचा वापर करून तुम्ही तुमचा साधा लूक खुलवू शकता. शाहीद कपूरच्या एअरपोर्ट लूकमधून तुम्ही ही प्रेरणा घेऊ शकता.

✽ नेव्ही ब्लू राउंड नेक टी शर्ट आणि जीन्स असा लूक त्याने कॅरी केला होता. पण चर्चा झाली ती त्याच्या स्टाईलची. ॲक्सेसरीजची. यावेळी त्याने स्लिंग बॅग कॅरी केली होती. रुंद पट्टयाच्या ट्रेंडी स्लिंग बॅगमुळे त्याचा लूक चांगलाच खुलला होता. क्रमश:

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### भारत पाकिस्तानच्या डीजीएमओमध्ये चर्चेची पहिली फेरी

**इस्लामाबाद :** पाकिस्तान आणि भारताच्या लष्करी ऑपरेशन्स महासंचालकांमध्ये (डीजीएमओ) सोमवारी चर्चेची पहिली फेरी पार पडली. डीजीएमओ मेजर जनरल काशिफ अब्दुल्ला आणि भारताचे पंतप्रधान लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी हॉटलाइनवर एकमेकांशी चर्चा केल्याची माहिती संरक्षण सूत्रांनी दिली. दरम्यान, या चर्चेचा कोणताही तपशील देण्यात आलेला नाही.

### आसाम विधानसभेच्या १०४ जागा जिंकण्याची क्षमता : हिमंत बिस्वा



**गुवाहाटी :** आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी पंचायत निवडणुकीत भाजपची कामगिरी ऐतिहासिक असल्याचे सांगत पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुकीत सत्ताधारी आघाडी१२६ पैकी १०४ जागा जिंकण्याची क्षमता असल्याचे म्हटले आहे. आसाममधील सर्व पंचायत समित्यांमध्ये सत्ताधारी भाजप आघाडीवर असून सलग दुसऱ्या दिवशी मतमोजणी सुरू आहे.

# अवर जॉब इज टू हिट द टार्गेट

## एअर मार्शल ए.के. भारतींच्या वक्तव्याची चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानमधील नऊ ठिकाणी हल्ला करून दहशतवादी तळं उद्ध्वस्त केली. या कारवाईत नेमके किती दहशतवादी आणि पाकिस्तानी सैनिक ठार झाले याची चर्चा सुरू झाली. पण त्यावर भारतीय सैन्याने मात्र स्पष्ट शब्दात माहिती दिली. आमचे काम हे दहशतवाद्यांना टार्गेट करणे आहे, त्यांच्या प्रेतांची संख्या मोजणे नाही असं एअर मार्शल ए.के. भारती म्हणाले. त्यांच्या या वक्तव्याची चर्चा सुरू आहे.

भारताच्या ऑपरेशन सिंदूरची माहिती देण्यासाठी लष्कराच्या तीनही दलांनी एक पत्रकार परिषद घेतली. त्यामध्ये पाकिस्तानच्या नऊ ठिकाणी हल्ले करुन दहशतवादी तळं उद्ध्वस्त केल्याची माहिती देण्यात आली. तसेच भारताच्या या हल्ल्यात १०० हून जास्त दहशतवादी ठार झाल्याची माहिती देण्यात आली.

आधी पाकिस्ताने भारताच्या वेगवेगळ्या शहरांवर हल्ले केले. त्यावेळी पाकिस्तानचे सर्व ड्रोन्स निकामी करण्यात आले. त्यानंतर भारताने पाकिस्तानवर प्रत्युत्तरादाखल कारवाई केली. भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकस्तानचे ३५ ते ४० सैनिक ठार झाले. त्यामध्ये काही मोठ्या अधिकाऱ्यांचासाही समावेश असल्याची माहिती भारतीय लष्कराने दिली.

भारताने केलेल्या कारवाईमध्ये नेमके किती दहशतवादी आणि पाकिस्तानी सैनिक ठार झाले असा प्रश्न विचारण्यात आला. नेमका आकडा लष्कराकडे आहे का याची माहिती विचारण्यात आली. त्यावर एअर मार्शल ए.के. भारती म्हणाले की, "आमचे काम हे मिसाईल टाकून लक्ष्य भेदणे आहे, प्रेतांची संख्या मोजणे नाही. आम्ही आमचे काम हे चोखपणे बजावले. आम्ही अशाच ठिकाणी हल्ला केला ज्यामुळे पाकिस्तानचे जास्तीत जास्त नुकसान होईल."

एअर मार्शल ए.के. भारती म्हणाले की, "भारताने समन्वय साधत पाकिस्तानच्या हवाई दलाच्या तळावर, कमांड सेंटरवर अत्यंत जलदगतीने हल्ला केला. त्यामुळे पाकिस्तानी लष्कराचे मोठे नुकसान झाले. भारतीय हल्ल्यांमध्ये चकलाला, रफिक आणि रहीम यार खान सारख्या महत्त्वाच्या हवाई तळांचा समावेश होता. यानंतर, सरगोधा, भुलारी आणि जेकबाबाद सारख्या इतर महत्त्वाच्या लष्करी तळांवरही हल्ला करण्यात आला."

### आमचा लढा दहशतवाद्यांशी

● आमचा लढा अतिरेक्यांशी होता. आम्हाला पाकिस्तानी वायुदलावर हल्ला करायचा नव्हता, पण पाक लष्कर अतिरेक्यांच्या मदतीसाठी उतरला असं भारतीय वायुदलाचे एअर मार्शल ए.के.भारती म्हणाले. भारताच्या एकाही वायुदलाला हानी पोहोचलेली नाही, आपले सर्व वायुदल तल आणि तिथली यंत्रणा कार्यान्नवित आहेत असं देखील एअर मार्शल भारती म्हणाले. एअर मार्शल ए.के. भारती यांच्या या वक्तव्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे. भारताच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती आहे. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचे कंबरडे या हल्ल्यामुळे मोडल्याची माहिती समोर येत आहे.

# दहशतवादाला जागा नाही

**(पान १ वरुन)** त्याला पुन्हा एकदा चोख प्रत्युत्तर दिले जाईल. आपण आपल्या पद्धतीने उत्तर द्यायचं. कठोर कारवाई त्या प्रत्येक ठिकाणी होईल, जिथे दहशतवादाची मूळं रुजली आहेत. पाकिस्तानने अणुबॉम्ब आहे हे सांगून आम्हाला ब्लॅकमेल करु नये. भारत पुन्हा एकदा कठोर प्रहार करेल. दहशतवाद्यांना पोसणारं सरकार आणि त्यांच्या म्होरक्यांना आम्ही वेगळे कुणी आहेत म्हणून पाहणार नाही. ऑपरेशन सिंदूर राबवत असताना आम्ही पाकिस्तानचा तो भेसूर चेहरा पाहिला आहे. ठार झालेल्या दहशतवाद्यांना निरोप देण्यासाठी पाकिस्तानी लष्कराचे अधिकारी गेले होते. पाक हा दहशतवादी देश असल्याचा हा सर्वात मोठा पुरावा आहे. भारत आणि भारताच्या नागरिकांना कुठल्याही संकटापासून वाचवण्यासाठी आम्ही सज्ज असून, युद्धात भारताने कायमच पाकिस्तानला धूळ चारलेली आहे. आता ऑपरेशन सिंदूर राबवून दहशतवादाविरोधातील कारवाईचे नवे आयाम भारताने आखले आहेत, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधून बोलताना केले. पीएम मोदी म्हणाले की, भारत विरोधी कारवाया करणाऱ्या दहशतवादाच्या म्होरक्यांना भारताने एका झटक्यात संपवलं. भारताच्या या कारवाईनंतर पाकिस्तान गोंधळून गेला. या गोंधळात त्यांनी एक दुःसाहस केलं. दहशतवादाविरोधात कारवाईला योग्य म्हणण्याऐवजी पाकिस्तानने भारतावर हल्ले करण्यास सुरुवात केली. महाविद्यालयं, सामान्य नागरिकांची घरं, शाळा, गुरुद्वारे, धर्मस्थळं आपल्या सैन्य छावण्या यांना लक्ष्य केलं. यामध्ये पाकिस्तानचा बुरखा फाटला आहे. जगाने हे पाहिलं आहे पाकिस्तानचे ड्रोन्स, मिसाईल्स ही भारताच्या सामर्थ्यापुढे विरुन गेली. भारताच्या वायुदलाने आकाशातच त्यांना उत्तर दिलं. पाकिस्तानला सीमेवरच हल्ला करायचा होता. मात्र भारताने त्यांच्या छातीवरच वार केला. भारताचे ड्रोन्स, क्षेपणास्त्र यांनी अचूक हल्ला केला. पाकिस्तानी वायुसेनेच्या हवाई अड्डे उद्ध्वस्त केलं. पहिल्या तीन दिवसांतच पाकिस्तानचं इतकं नुकसान केलं की त्याचा अंदाज पाकिस्तानलाही नव्हता. पाकिस्तान बचाव कसा करायचा ते पाहू लागला, असे ते म्हणाले. दहशतवादाचा हा चेहरा पाहून प्रत्येक विरोधी पक्ष, प्रत्येक नागरिक भारतातल्या प्रत्येक नागरिकाला हे वाटत होतं की तोडीस तोड उत्तर दिलं पाहिजे. ऑपरेशन सिंदूर राबवून हे उत्तर आपण दिलं. ऑपरेशन सिंदूर हे फक्त नाव नाही. देशाच्या कोटी कोटी जनतेच्या भावनांचं प्रतीक आहे. ऑपरेशन सिंदूर न्यायाची अखंड प्रतिज्ञा आहे. ६ मे च्या रात्री उशिरा, ७ मेच्या पहाटे ही प्रतिज्ञा पूर्ण होताना देशाने आणि जगाने पाहिलं आहे. भारताच्या सैन्यदलांनी पाकिस्तानात दहशतवादी अड्डे, त्यांच्या ट्रेनिंग सेंटर्सवर अचूक प्रहार केला. दहशतवाद्यांना हे स्वप्नातही वाटलं नसेल की भारत एवढा मोठा निर्णय आपल्या विरोधात घेईल. पण देश जेव्हा एकवटतो, राष्ट्र प्रथम ही भावना असते, तेव्हा असे कणखर पोलादी निर्णय घेतले जातात. आपण सगळ्यांनी मागच्या काही दिवसांपासून देशाचं सामर्थ्य आणि संयम दोन्ही पाहिलं आहे. आपल्या सैन्यदलांना मी सॅल्युट करतो. मी देशाच्या प्रत्येक मातेला आणि भगिनींना हा पराक्रम अर्पित करतो. २२ एप्रिलला दहशतवाद्यांनी जे केलं त्यामुळे सगळा देश हादरुन गेला होता. धर्म विचारुन पर्यटकांना त्यांच्या कुटुंबासमोर, मुलांसमोर निर्घृणपणे ठार करणं हा दहशतवादाचा बीभत्स चेहरा होता. क्रौर्य होतं, देशाची सद्भवना तोडण्याचा प्रयत्न झाला, असे ते म्हणाले. भारतीय सैन्य दलांना सशस्त्र दलांना सॅल्युट करतो असंही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे.

पान १ वरून

## सहकार क्षेत्राची १५० वर्षे पूर्ण

लागत. आणि हे मूल्यांकन करण्याची हीच वेळ आहे. सहकार चळवळ महाराष्ट्रसोबतच गुजरात, कर्नाटक या राज्यांमध्ये पसरली आहे. याच सहकार क्षेत्रासाठी काम करण्याची मला संधी मिळाली. त्यावेळी मी गरीब माणसांच्या हितासाठी कायदा मोडायला हरकत नाही, असं काही अधिकाऱ्यांना बोललो. हे महात्मा गांधी बोलले होते. काळानुसार सहकाराचं स्पिरिट बदलणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. उत्तम काम करणाऱ्यांना प्रोत्साहन आणि जे काम करत नाहीत, त्यांना प्रवाहाच्या बाहेर काढलं पाहिजे. मक्याचा भाव अमेरिका आणि सोयाबीनचा भाव अर्जेंटिना ठरवत आहे. येणाऱ्या काळात या चळवळीचं सक्षमीकरण करणं गरजेचं आहे." असं मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केलं आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राचे वस्ताद अशी ओळख असलेले खासदार शरद पवार यांनी थेट मुख्यमंत्र्यांसमोरच सहकार क्षेत्रातील काही महत्त्वाचे बदल बोलून दाखवले. विशेष म्हणजे शरद पवार यांनी केलेल्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ मान्य केल्या. शरद पवार म्हणाले की, "मागील काही वर्षांमध्ये आपल्या महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची संख्या झपाट्यानं कमी होत आहे. महाराष्ट्रात एकेकाळी ८० टक्के साखर कारखाने होते. तर, केवळ २० टक्केच खासगी साखर कारखाने होते. आता चित्र बदललं असून, सध्याच्या घडीला ५० टक्के सहकारी साखर कारखाने आहेत. तर, ५० टक्के खासगी साखर कारखाने आहेत. सहकारी साखर कारखान्यांमध्ये ही ३० टक्क्यांची घसरण दिसून येते. या सर्वांचा अभ्यास करणं गरजेचं आहे. त्यासाठी एक समिती नेमण्याची आवश्यकता असून, सहकारी साखर कारखाने कमी होण्याची कारणं काय आहेत? याचा अभ्यास करायला हवा. सहकारी साखर कारखान्यांच्या काही अडचणी आहेत का? त्या समजून घ्यायला हव्यात," असं मत शरद पवार यांनी व्यक्त केलं.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मिश्किल व तितकीच गांभीर्याने घ्यावी अशी भाषण शैली पाहायला मिळाली. दरम्यान, दि महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह लिमिटेड बँकेचे विद्याधर अनास्कर हे मागील अनेक वर्षांपासून प्रशासक आहेत. त्यावर अजित पवार म्हणाले की, "अनासकर यांचे खरंतर कौतुकच केलं पाहिजे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असले काय किंवा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असले काय? प्रशासक मात्र तुम्हीच आहात. अनासकर यांनी संस्थेनं चांगला नफा मिळवल्यानंतर संचालक बोर्डाला देखील काही मिळालं पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. पण, ज्यावेळेस संस्था अडचणीत आणण्याचं काम संचालक बोर्ड करतात, त्यावेळेस त्यांच्याकडून देखील काहीतरी वसूल केलं पाहिजे. पण होतं काय ते संचालक बोर्ड सत्ता कुणाची ते बघतात आणि मग सहकार मंत्री जो असेल त्या सत्ताधारी पक्षामध्ये येण्याचा प्रयत्न करतात. त्यांनी प्रयत्न केला तरी यांना थांबवलं पाहिजे. किंवा त्यांना पक्षात प्रवेश दिला तरी त्यांच्यावर पुढं ॲक्शन झाली पाहिजे. मग ही सगळी सुता सारखी सरळ होतील. मुद्दामून कुणालाही त्रास देऊ नका. पण, ज्यांनी चुका केल्यात त्यांना त्रास झालाचं पाहिजे. सहकार क्षेत्राला बळकटी देण्यासाठी इथल्या कर्मचाऱ्यांना व्यवस्थापन प्रशिक्षण अतिशय गरजेचं आहे," अशी भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "असं लक्षात आलं की जोपर्यंत आपण संस्थात्मक कर्ज उपलब्ध करून देणार नाही, तोपर्यंत सावकाराच्या पाशातून शेतकऱ्यांना सोडवता येणार नाही. यातूनच आपल्याकडे अशा प्रकारच्या सहकारी संस्था, पतसंस्था तयार झाल्या. आणि त्यातून एक संस्थात्मक रचना इन्स्टिट्यूशनल मेकॅनिझम आपण उभी केली. जी हळूहळू समृद्ध होत गेली. शरद पवार यांनी भाषणा दरम्यान सहकार संस्थांच्या बळकटी देण्यासाठी समिती स्थापन करण्याची मागणी केली. महाराष्ट्रातील सहकारी संस्थांना अधिक बळकटी देण्यासाठी आम्ही एक समिती स्थापन करू आणि त्याचा अभ्यास देखील करू. सहकार उद्योगात केवळ साखर कारखानाच चालू शकत नाही. त्याचे इतर पूरक व्यवसाय देखील करायलाच हवेत. अनेक सहकारी साखर कारखान्यांमध्ये एकदम प्रोफेशनल काम पाहायला मिळत नाही. काही सहकारी साखर कारखान्यांमध्ये तर खोगीर भरती केल्याचं दिसून येतं. पण, तेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना केली आणि या मंत्रालयाचा कारभार अमित शाह यांच्या हाती दिला. त्यामुळं सहकार क्षेत्रात आपण खूप पुढं गेलो आहोत. प्रगती करत आहोत," असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं.

## आम्ही दहशतवादी तळांनाच लक्ष्य केले

होते. मात्र, त्यानंतरही पाकिस्तानी सैन्याने आमच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, पण ते आमच्या बहुस्तरीय संरक्षण यंत्रणेत घुसखोरी करण्यात अपयशी ठरले. आमच्या हवाई संरक्षणाने तुर्की आणि चीनचे ड्रोन आणि पाकिस्तानने हवेत पाठवलेले रॉकेट पाडले.

आम्ही पाकिस्तानला प्रत्युत्तर दिले, ज्यात आम्ही पाकिस्तानचा नूर खान हवाईतळ उद्ध्वस्त केला आणि अनेक हवाईतळांचे मोठे नुकसान केले, असे एअर मार्शल म्हणाले. आम्ही पाकिस्तानी हवाई तळांची दुरवस्था केली. आमच्या सैन्याने सीमा न ओलांडता आपलं काम केलं. पाकिस्तानचे जे काही नुकसान झाले आहे, त्याला पाकिस्तानी लष्कर जबाबदार आहे. या हल्ल्याच्या माध्यमातून आम्ही जगातील सर्व देशांना आपली ताकद दाखवून दिली आहे. आम्ही पाकिस्तानला स्पष्ट करू इच्छितो की, आम्हाला हवे तेथे, हवे तेव्हा आम्ही पाकिस्तानवर हल्ला करू शकतो, असेही त्यांनी सांगितले.

एअर मार्शल भारती म्हणाले की, आमची सर्व शस्त्रास्त्रे, आमची लढाऊ विमाने परिपूर्ण स्थितीत आहेत आणि शत्रूचा सामना करण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहेत. भारतीय लष्कराने रविवारी पाकिस्तानच्या खोटेपणाचा पर्दाफाश केला. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून आमची जी काही उद्दिष्टे होती, ती पूर्णपणे साध्य झाली, असे लष्कराने म्हटले होते. त्यानंतर झालेल्या पाकिस्तानी कारवाईला आम्ही चोख प्रत्युत्तर दिले, असे त्यांनी पुन्हा एकदा सांगितले.

## अजूनही तैनात... कारवाईस केव्हाही तयार; नौदलाचा इशारा

जिथे अटकाव ठरतो निर्णायक कृतीत!" असे म्हणत शत्रूला पुन्हा धडकी भरवली आह

यापूर्वी भारतीय नौदलाने समुद्रातील कवायतीचा प्रकार सीहंटरचा व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओला 'आकाशाचे अधिपती; समुद्राच्या तळाचे शिकारी...', लढण्यासाठी सदैव सज्ज, समुद्रावरनिर्भय, कोणत्याही वेळी कोठेही कोणत्याही प्रकारे" असे कॅप्शन दिले आहे. यामध्ये सीहंटर शिकारीसारखे कार्य करतात. ते समुद्रातील शत्रूंचा शोध घेणारे आणि त्यांचा नाश करणारे नौदलाचे अत्याधुनिक जवान किंवा यंत्रणा असते. समुद्राच्या पाण्यात, पाण्याखाली आणि आकाशातही सतत नजर ठेवतात आणि गरज पडल्यास अचूक कारवाई करतात.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात शनिवारी (दि.१०) १०० तासांच्या स्थल, आकाश आणि समुद्रातील लष्करी कारवाईनंतर शस्त्रसंधीवर सहमती झाली होती. मात्र, त्याच्यानंतर दुसऱ्याच दिवशी इस्लामाबादने शस्त्रसंधीचे उल्लंघन करत सीमा भागात गोळीबार केला. यानंतर भारतीय नौदलाने एक्स या माध्यमातून एक व्हिडिओ शेअर करत सांगितले की, "भारतीय नौदल समुद्रात विश्वासार्ह अटकावात्मक स्थितीत तैनात आहे. पाकिस्तान किंवा पाकिस्तानपुरस्कृत अतिरेक्यांकडून होणाऱ्या कोणत्याही शत्रुत्वपूर्ण कारवाईला निर्णायक उत्तर देण्यासाठी आम्ही अजूनही सज्ज आहोत".

## पावसाचे शुभवर्तमान!

पावसाचा इशारा दिला आहे. पुढील तीन-चार दिवसांत राज्यातील अनेक भागांत वादळी वाऱ्यांसह पाऊस पडण्याचा इशारा दिला आहे. हवामान विभागाकडून पुढील चार दिवस पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला असल्याने जळगाव जिल्ह्याला पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान सोमवारी जळगाव जिल्ह्यात विजेच्या कडकडाटासह वादळी वा-यासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला असल्याने नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलेली आहे.

## नवनीत राणा यांना पुन्हा धमकी

हनुमान चालीसा पढने वाली थोडे दिन की मेहमान है. जल्दी उडने वाली है. पाकिस्तानातील वेगवेगळ्या फोनवरून या धमक्या नवनीत राणा यांना आल्या आहे. त्यानंतर राणा यांच्याकडून ही माहिती पोलिसांना दिली आहे. पोलिसांनी तपासही सुरु केला आहे. नवनीत राणा यांना आलेली ही धमकी आंतरराष्ट्रीय पातळीवरुन आली आहे. त्यामुळे मुंबई पोलिसांना केंद्रीय यंत्रणेची मदत घ्यावी लागणार आहे.

मागील वर्षी आली होती धमकी : मागील वर्षी नवनीत राणा यांना पाकिस्तानमधून धमकी आली होती. त्यांच्या व्हॉटसॲप क्रमांकावर क्लिप पाठवून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधून ही धमकी आली आहे. आता पुन्हा राणा यांना धमकी आल्यामुळे पोलीस यंत्रणा कामाला लागली आहे.

## शेअर बाजारात सुपर मंडे!

भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीमुळे बाजारात तेजी आल्याचं सांगितलं जातंय. या तेजीमागे परदेशी गुंतवणूकदारांकडून होणारी खरेदी हे एक प्रमुख कारण आहे. देशाच्या जीडीपी आणि उत्पन्नात सुधारणा होण्याची अपेक्षा, चलनवाढ आणि व्याजदर यांसारख्या देशांतर्गत मॅक्रो निर्देशांकात घट ही बाजारातील गती पुनरुज्जीवित होण्याची चिन्हे आहेत. आयसीआयसीआय बँक, एचडीएफसी बँक, बजाज फायनान्स, आरआयएल, एल अँड टी, भारती, अल्ट्राटेक, एम अँड एम आणि आयशर या कंपन्यांच्या शेअर्समध्ये गुंतवणूक मोठ्या प्रमाणात केली जात आहे.

## देशातील ते विमानतळ पुन्हा सूरू

**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तान तणावामुळे देशभरातील ३२ हून अधिक विमानतळांवरील उड्डाणं बंद ठेवण्यात आली होती. १५ तारखेपर्यंत ही उड्डाणं बंद राहतील, असं भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून सांगण्यात आलं होतं. दरम्यान या निर्णयात बदल करण्यात आल्याचं समोर आलं आहे. भारत आणि पाकिस्तानमधील शस्त्रसंधीनंतर ९ राज्यांमधील ३२ विमानतळं तत्काळ उघडण्यात आली आहे. भारतीय विमानतळ प्राधिकरणाने प्रेस नोट जारी करीत याबाबत माहिती दिली. ९ मे ते १५ मे या कालावधीत देशातील ३२ विमानतळं बंद ठेवण्यात आली होती. मात्र शस्त्रसंधी झाल्यानंतर हा निर्णय मागे घेण्यात आला असून सोमवारपासून विमानतळं सेवा सुरू करण्यात आली आहे.

भारतीय विमानतळ प्राधिकरण प्रेस नोटमध्ये दिल्यानुसार, नागरी विमानांच्या उड्डाणासाठी तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्यात आलेले ३२ विमानतळ तत्काळ प्रभावाने पुन्हा खुली करण्यात आली आहेत. प्रवास करत असलेल्या सर्व प्रवाशांना विनंती आहे की त्यांनी आपली विमानाची उड्डाण स्थिती संबंधित एअरलाईनकडून थेट तपासणी करून घ्यावी आणि एअरलाईनच्या अधिकृत संकेतस्थळावर नियमित अपडेट पाहत राहावीत, असेही त्यांनी म्हटले आहे.


# चिनाबवरील सलाल धरणाचा दरवाजा उघडला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताने पाकिस्तानवर केलेल्या एअर स्ट्राईकने पाकिस्तानची चांगलीच दाणादाण उडवून दिली. एवढ्यावरच न थांबता भारताने चिनाब नदीवर बांधलेल्या धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडून पाकिस्तानमध्ये पूरसदृष्य परिस्थिती निर्माण करत पाणी-पाणी केले. भारताने केलेल्या या अनपेक्षित कारवाईने पाकिस्तान चांगलाच गांगरून गेला आहे.

भारताने चिनाब नदीवर बांधलेल्या धरणाचा एक दरवाजा उघडला आहे. जम्मू काश्मीरच्या रियासीमध्ये चिनाब नदीवर असलेल्या सलाल धरणाचा आणखी एक दरवाजा भारताने उघडला. या आधी बगलिहार बांधाचे अनेक दरवाजे खोलण्यात आले होते. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानसोबतचा सिंधु जल करार स्थगित केला आहे. यानंतर भारताने चिनाब नदीचे पाणी थांबवले होते.

या आधी पहिल्यांदा बगलिहार धरण आणि नंतर सलाल धरणाचे दरवाजे बंद करून पाकिस्तानची पाणीबाणी केली होती. दरम्यान जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या काही दिवसांमध्ये झालेल्या पावसामुळे धरणातील पाण्याची पातळी वाढली होती. यानंतर रामबनमध्ये चिनाब नदीवर असलेल्या बगलिहार हायड्रोइलेक्ट्रीक पॉवर प्रोजेक्टचे दरवाजे उघडण्यात आले होते. या शिवाय चिनाब नदीवरील असलेल्या रियासातील सलाल धरणाचे तीन दरवाजे उघडण्यात आले होते.



पहलगाममध्ये निष्पाप भारतीय पर्यटकांवर झालेल्या क्रुर हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानसोबत असलेला पाणी करार स्थगित करण्याचा निर्णय घेतला होता.

त्या पार्श्वभूमीवर भारताने सिंधु पाणी करार स्थगित केला होता. हा सिंधू पाणी करार जागतिक बँकेने केला होता. या करारावर १९६० मध्ये तत्कालीन भारतीय पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि तत्कालीन पाकिस्तानी राष्ट्रपती अयुब खान यांनी स्वाक्षरी केली होती.

### सिंदू जल करार

● सिंधु नदी प्रणालीमध्ये ६ नद्या ज्यामध्ये सिंधु, झेलम, चिनाब, रावी, ब्यास आणि सतलज या नद्यांचा समावेश आहे. सिंधु पाणी वाटप करारानुसार, पूर्वेकडील नद्या ज्यामध्ये रावी, ब्यास आणि सतलज नदीच्या पाण्यावरचा अधिकार भारताला मिळाला होता. तर सिंधु, झेलम आणि चिनाब नद्यांचा पाण्याचा अधिकार पाकिस्तानला मिळालेला होता.

## वडिलांच्या हौतात्म्याचा बदला घेईन - मुलीचे उद्गार

तेव्हा त्यांनी तो प्रथम कपाळाला आणि नंतर हृदयाला स्पर्श केला आणि रडू लागल्या. "एकदा तरी उठ" ही आर्त हाक हृदय पिळवटून टाकणारी होती. हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन विनय भारद्वाज यांच्या नेतृत्वाखाली लष्कर आणि पोलिसांच्या तुकडीने शहीद सुरेंद्र कुमार मोगा यांना गार्ड ऑफ ऑनर देऊन अंतिम निरोप दिला. शहीद सुरेंद्र कुमार यांचे पार्थिव लष्करी सन्मानाने पंचत्वात विलीन करण्यात आले.

## अदानी सुमहाने मोडले सर्व विक्रम

१० कंपन्यांचे मार्केट कॅप १२,११,४०९.०७ कोटी रुपये होते. जे सोमवारी वाढून १२,८१,५५४.५१ कोटी रुपये झाले. याचा अर्थ असा की अदानी समूहाच्या एकूण मार्केट कॅपमध्ये ७०,१४५.४४ कोटी रुपयांची वाढ झाली.

## एकूण १९७ ठिकाणी वन विभागाच्यावतीनं मचाण सज्ज

# प्राणीगणनेवर पावसाचं सावट?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अमरावती :** बुद्ध पौर्णिमेच्या रात्री चंद्राच्या लख्ख प्रकाशात अमरावती विभागातील सर्व जंगल क्षेत्रात प्राणीगणना होणार आहे. प्राणीगणनेसाठी राज्यभरातून आलेल्या वन्यजीव प्रेमींसाठी अमरावती विभागात मेळघाटातील १२७ ठिकाणांसह एकूण १९७ ठिकाणी वन विभागाच्यावतीनं मचाण सज्ज केले आहेत. गत दोन दिवसांपासून मेळघाटसह अमरावती जिल्ह्यात सर्वत्र पाऊस आहे. त्यामुळं प्राणीगणनेवरही पावसाचं सावट असण्याची शक्यता आहे. मेळघाट वन्यजीव विभागांतर्गत घनदाट जंगलात ३६ ठिकाणी खास बुद्ध पौर्णिमेनिमित मचाण उभारण्यात आले आहेत. यांसह मेळघाटातच गुगामलमल वन्यजीव विभागात ३५ अकोट वन्यजीव विभागात ५६ ठिकाणी मचाण बांधण्यात आलेत. यावर्षी सिपना वन्यजीव विभागात एकही मचाण उभारण्यात आलं नाही. अकोला येथील काटेपूर्णा जंगलात २३, यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा वन्यजीव विभागात टिपेश्वर, पैनगंगा येथे ४७ मचाण उभारण्यात आले आहेत.

बुद्ध पौर्णिमेच्या रात्री जंगलात मचाणावर मुक्काम करायचा असल्यानं काही वन्यजीव प्रेमी हे शनिवार, रविवारपासूनच मेळघाटात आले आहेत. अनेकांनी चिखलदरा या पर्यटन केंद्रावर दोन दिवस प्रयत्नाचा आनंद लुटल्यावर आज सकाळी त्यांच्या नियोजित ठिकाणी वन परिक्षेत्र कार्यालय गाठलं. हा थरार अनुभवण्यासाठी वन्यजीव प्रेमींकडून वन विभान ३ हजार २०० रुपये इतकं शुल्क घेतलं. रात्रीचं जेवण मचाणवरच वन विभागाकडून पुरवलं जाणार आहे. अमरावती जिल्ह्यात गत चार दिवसांपासून पावसाचं वातावरण असून चांदूरबाजार, अचलपूर, चिखलदरा तालुक्यात पाऊस कोसळला. अमरावती शहरात रात्री साडेबारा वाजता मुसळधार पाऊस झाला. आज सकाळी अमरावती शहरात पावसाच्या सरी बरसल्या तर मेळघाटच्या पायथ्याशी असणाऱ्या अचलपूर, परतवाडा या जुळ्या शहरात सकाळी जोरदार पाऊस बरसला.

### सिंधू जल करार

● सिंधु नदी प्रणालीमध्ये ६ नद्या ज्यामध्ये सिंधु, झेलम, चिनाब, रावी, ब्यास आणि सतलज या नद्यांचा समावेश आहे. सिंधु पाणी वाटप करारानुसार, पूर्वेकडील नद्या ज्यामध्ये रावी, ब्यास आणि सतलज नदीच्या पाण्यावरचा अधिकार भारताला मिळाला होता. तर सिंधु, झेलम आणि चिनाब नद्यांचा पाण्याचा अधिकार पाकिस्तानला मिळालेला होता.



#रा

# पाकमधील अण्वस्त्रांचे केंद्र उद्ध्वस्त

## अमेरिकेने त्यासाठीच केला हस्तक्षेप, सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरच्या पहलगाम मध्ये २२ एप्रिल रोजी २६ निरपराध पर्यटकांच्या हत्येनंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला होता. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने ७ मे रोजी 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तानातील अनेक दहशतवादी तळांवर प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली. या कारवाईचा सर्वात मोठा आणि धक्कादायक भाग म्हणजे भारताने १० मे रोजी पाकिस्तानच्या नूरखान हवाईतळावर अचूक क्षेपणास्त्र हल्ला केला, ज्यामुळे पाकिस्तानच्या लष्करी सामर्थ्याला धक्का तर बसलाच, शिवाय त्याच्या अण्वस्त्रांच्या सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले. या हल्ल्यानंतर १० मे रोजी संध्याकाळी दोन्ही देशांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीने शस्त्रसंधीची घोषणा केली. पण या शस्त्रसंधीमागे नूरखान एअरबेस उद्ध्वस्त होण्याची आणि पाकिस्तानच्या आण्विक कमांड सेंटरवर निर्माण झालेल्या धोक्याची कहाणी दडलेली आहे.



नूर खान एअरबेस पूर्वी चकला एअरबेस म्हणून ओळखला जात होता. पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादपासून अवघ्या १० किलोमीटर अंतरावर रावळपिंडी येथे हे ठिकाण आहे. हे पाकिस्तानी हवाई दलाचे प्रमुख लॉजिस्टिक हब आहे, व्हीआयपी हालचाली, टोही मोहिमा आणि लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांच्या ऑपरेशनचे केंद्र आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा हवाईतळ पाकिस्तानच्या स्ट्रॅटेजिक प्लॅन डिव्हिजन (एसपीडी) आणि नॅशनल कमांड ऑथॉरिटीच्या (एनसीए) मुख्यालयाच्या अगदी जवळ आहे, ज्यावर देशाच्या सुमारे १७० अण्वस्त्रांचे संरक्षण आणि संचालन करण्याची जबाबदारी आहे. १० मे रोजी सकाळी भारताने नूरखान हवाईतळावर अचूक हल्ला करण्यासाठी ब्रह्मोस, हॅमर आणि स्कॅल्प क्षेपणास्त्रांचा वापर केला. न्यूयॉर्क टाईम्सने दिलेल्या वृत्तानुसार, हा हल्ला इतका घातक होता की, पाकिस्तानची हवाई संरक्षण यंत्रणा त्याचा मागोवा घेण्यात पूर्णपणे अपयशी ठरली. या हल्ल्यात एअरबेसच्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधा उद्ध्वस्त झाल्या आणि पाकिस्तानी सैन्यात भीतीचे वातावरण पसरले. भारताची क्षेपणास्त्रे आपल्या अत्यंत संवेदनशील लष्करी तळांपर्यंत पोहोचू शकतात, याची जाणीव या हल्ल्यामुळे पाकिस्तानला झाली.

नूरखान एअरबेसपासून अवघ्या काही किलोमीटर अंतरावर असलेल्या पाकिस्तानच्या न्यूक्लिअर कमांड सेंटरला या हल्ल्याचा फटका बसला. ब्रह्मोस क्षेपणास्त्राने १-२ किमी अधिक अचूक मारा केला असता, तर पाकिस्तानच्या अण्वस्त्रांमध्ये स्फोट आणि किरणोत्सर्ग होऊ शकला असता, असा दावाही अहवालात करण्यात आला आहे. तथापि, या दाव्यांची स्वतंत्रपणे पडताळणी झालेली नाही किंवा भारताकडून अशी कोणतीही पुष्टी झालेली नाही. मात्र, या हल्ल्यामुळे पाकिस्तानच्या लष्करी आणि राजकीय नेतृत्वात खळबळ उडाली आहे. काही वृत्तांनुसार, पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी तातडीने अण्वस्त्रांच्या वापराबाबत निर्णय घेणारी सर्वोच्च संस्था एनसीएची बैठक बोलावली होती. मात्र, नंतर पाकिस्तानी मंत्र्यांनी अशी कोणतीही बैठक झाली नसल्याचा दावा केला.

नूरखान एअरबेसवरील हल्ल्याच्या बातमीने अमेरिकेतही खळबळ उडाली. एकेकाळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांचे सरकार या वादात हस्तक्षेप करण्यास टाळाटाळ करत होते, परंतु अणुयुद्धाच्या भीतीने त्यांना सक्रियपणे मध्यस्थी करण्यास भाग पाडले, असे एनवायटीने म्हटले आहे. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे भारत थेट पाकिस्तानच्या अण्वस्त्रांपर्यंत पोहोचला होता. पाकिस्तानातील रावळपिंडीयेथील नूरखान एअरबेसवर शुक्रवारी रात्री झालेल्या स्फोटानंतर परिस्थिती अधिक गंभीर बनली. हा तळ केवळ पाकिस्तानी हवाई दलाचे प्रमुख वाहतूक केंद्र नाही तर त्याच्या अण्वस्त्रांच्या सुरक्षेशी संबंधित स्ट्रॅटेजिक प्लॅन डिव्हिजनच्या मुख्यालयाला लागून आहे.

### भारताकडे १७२ अण्वस्त्रे

- स्वीडनच्या थिंक टँक सिपरीच्या अहवालानुसार भारताकडे १७२, तर पाकिस्तानकडे १७० अण्वस्त्रे आहेत. पाकिस्तानने 'फर्स्ट यूज' धोरण अवलंबले आहे, म्हणजे गरज पडल्यास तो अण्वस्त्रांचा प्रथम हल्ला करू शकतो, तर भारताच्या 'नो फर्स्ट यूज' धोरणामुळे केवळ स्वसंरक्षणासाठी अण्वस्त्रांचा वापर करण्याची परवानगी आहे. पाकिस्तानची अण्वस्त्रे निकामी करण्याची क्षमता भारताकडे आहे, हे नूरखान यांच्यावरील हल्ल्याने सिद्ध केले, ज्यामुळे पाकिस्तानच्या धमक्या पोकळ झाल्या.

# भारतीयांच्या सुरक्षेसाठी १० उपग्रह



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इस्रो) अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन यांनी सांगितले की, देशातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी १० उपग्रह २४ तास सतत देशावर लक्ष ठेवून आहेत. मणिपूरची राजधानी इम्फाळ येथील केंद्रीय कृषी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाला संबोधित करताना ते म्हणाले की, भारत 'लिव्हिंग स्पेस पॉवर' बनत आहे आणि २०४० पर्यंत देशातील पहिले अंतराळ स्थानक उभारण्यात येईल.

इस्रो प्रमुख म्हणाले, भारतातून ३४ देशांचे ४३३ उपग्रह अंतराळात सोडण्यात आले आहेत आणि ते त्यांच्या कक्षेत स्थापित करण्यात आले आहेत. देशातील नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या धोरणात्मक उद्देशाने आज १० उपग्रह अहोरात्र कार्यरत आहेत, हे सांगताना मला आनंद होत आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये सुरू असलेल्या लष्करी तणावाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे वक्तव्य केले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्याच्या उद्देशाने देशाने ७ मे रोजी सकाळी 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केले होते.

डॉ. नारायणन म्हणाले, देशाची सुरक्षा सुनिश्चित करायची असेल तर उपग्रहांचा वापर करावा लागेल. आपल्याला आपल्या सात हजार किलोमीटरच्या किनारपट्टीचे रक्षण करावे लागेल. आपल्याला संपूर्ण उत्तर भारतावर सतत पाळत ठेवावी लागेल. सॅटेलाईट आणि ड्रोन तंत्रज्ञानाशिवाय हे काम शक्य नाही. इस्रो जी-२० देशांसाठी एक विशेष उपग्रह विकसित करत आहे, ज्याचा उद्देश हवामान, वायू प्रदूषण आणि हवामानावर लक्ष ठेवणे आहे. स्वातंत्र्यानंतर देशाची प्रगती अद्वितीय आणि उल्लेखनीय असल्याचे इस्रोप्रमुखांनी सांगितले.

# दिल्ली विमानतळाकडून नवी नियमावली जारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत पाकिस्तान तणावादरम्यान दिल्ली एअरपोर्टने रविवारी प्रवाशांसाठी एक प्रवासी नियमावली जारी केली आहे. विमानतळाकडून प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, विमानतळावरील सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. सद्यपरिस्थिती पाहता फ्लाइटच्या वेळांमध्ये बदल होऊ शकतो आणि सुरक्षा तपासणीत अधिक वेळ लागू शकतो. यासाठी प्रवाशांना वेळेच्या थोडं आधी विमानतळावर पोहोचावं लागेल.

एअरपोर्टने प्रवाशांना सांगितलं की, केवळ अधिकृत माहितीवर विश्वास ठेवा आणि प्रवाशांशी संबंधित अपडेटवर लक्ष द्या. भारत आणि पाकिस्तानदरम्यान शनिवारी सायंकाळी ५ वाजता लागू केलेली शस्त्रबंदीचं पाकिस्तानने उल्लंघन केलं. त्यानंतर देशभरातील सुरक्षा अधिक कडक करण्यात आली आहे.

भारताकडून ३२ विमानतळं बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे प्रत्येक दिवशी ४०० हून अधिक उड्डाणे रद्द होण्याची शक्यता आहे. विमानन नियामक डीजीसीएने सांगितलं की, ही बंदी ९ मेपासून १५ मेपर्यंत सकाळी ५.२९ पर्यंत कायम राहील. त्यामुळे प्रवाशांनी आपला प्रवास रिशेड्यूल करा आणि यासाठी संबंधित एअरलाइन्सशी संपर्क करा. सरकार आणि सुरक्षा एजन्सी भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या परिस्थितीनुसार निर्णय घेईल. तसेच तुमच्या संबंधित एअरलाइनच्या संपर्क माध्यमांद्वारे अपडेट राहा.



### मार्गदर्शक तत्वे

- केबिन आणि चेक-इन बॅगेजसाठी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचं पालन करा.
- सुरक्षा तपासणीसाठी विलंब लागू शकतो, त्यासाठी विमानतळावर लवकर पोहोचा.
- प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी विमान कंपनी आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांना पूर्ण सहकार्य करा.
- एअरलाइन किंवा अधिकृत दिल्ली एअरपोर्टवरील वेबसाइटच्या माध्यमातून उड्डाणांची स्थिती तपासून पाहा
- प्रवाशांनी अधिक माहितीसाठी कंपनीच्या अधिकृत वेबसाइटवर अवलंबून राहावे, इतर कोणत्याही वेबसाइट पाहू नये.

# बिजापूरमध्ये नक्षलवाद्यांकडून काँग्रेस नेत्याची हत्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**गडचिरोली :** छत्तीसगड-गडचिरोली या पट्ट्यात सरकारकडून नक्षलवाद विरोधी मोहीम राबवली जात आहे. यामध्ये नक्षलवाद्यांचे अड्डे शोधून नष्ट केले जात आहे. याशिवाय गेल्या काही महिन्यात कित्येक नक्षलवाद्यांचा कंठस्नान घालण्यात सुरक्षा दलाला यश आलं आहे. काही आठवड्यांपूर्वी नक्षलवाद्यांनी शांततेचा प्रस्ताव पुढे केला होता. मात्र याबाबत सरकारकडून कोणतीही ठोस भूमिका घेण्यात आली नव्हती. त्यादरम्यान एक मोठी बातमी समोर आली आहे.

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी काँग्रेस नेत्याची हत्या केल्याचा भयंकर घटना उघडकीस आली आहे. सोमवारी ११ मेच्या मध्यरात्री काही नक्षलवाद्यांनी काँग्रेस कार्यकर्ता नागा भंडारीची अत्यंत निघृणपणे हत्या केली. बिजापूर जिल्ह्याच्या मारुडबाकातील लिंगापूरमध्ये ही हत्या करण्यात आली आहे. नक्षलवाद्यांच्या या कृत्याने परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. हत्येचं कारण अद्याप अस्पष्ट आहे. पोलीस खबऱ्या म्हणून त्यांची हत्या करण्यात आली अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे. काही दिवसांपूर्वी नक्षलवाद्यांनी छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यातील बैनपल्ली गावचे उपसरपंच मुचाकी रामा यांची हत्या केली होती. त्यानंतर आता नक्षलवाद्यांनी काँग्रेस नेत्याची हत्या केल्याचं समोर आलं आहे.



**मारजयून** इस्रायलने केलेल्या हल्ल्यानंतर नबातीह येथे धुराचे लोट उठताना दिसून येतात. दक्षिण लेबनॉनमधील मरजयून येथील हे छायाचित्र.

# कोपरगावचा कांदा थेट दुबईच्या थाळीत





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर :** कोपरगाव तालुक्यातील दहिगाव बोलका येथील पाच शेतकऱ्यांनी एकत्र येऊन दहिगाव साई माऊली फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातून शेतात पिकवलेला निर्यातक्षम कांदा थेट दुबईला विक्रीसाठी पाठविला आहे. राज्यासह आपल्या देशापेक्षा जास्त दर दुबईच्या बाजारात शेतकऱ्यांना मिळणार असल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केलंय.

यंदाच्या वर्षी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कांदा पीक घेतलंय. मात्र राज्यासह देशात कांद्याचे भाव मोठ्या प्रमाणात कोसळले असून, बाजारात देखील कांदाची मागणी कमी झालीय. कांद्याच्या शेतीसाठी झालेला खर्चही वसूल होण्याची शाश्वती नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाल्याचं पाहायला मिळतंय. मात्र अशातच कोपरगाव तालुक्यातील दहिगाव बोलका येथील काही कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येत आपल्याच गावातील दहिगाव साई माऊली फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातून तब्बल २९ टन कांदा आता थेट दुबईच्या बाजारात विक्रीसाठी पाठवलाय.

राज्यासह देशात सध्या कांद्याला मागणी कमी असून, बाजारात भावही १० ते १२ रुपये प्रति किलो मिळतोय. कांदा शेतीसाठी केलेला खर्चही यंदाच्या वर्षी मिळणे मुश्कील झालंय. अशातच गावातील शेतकऱ्यांनी दहिगाव साई माऊली फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कांद्याला कुठे चांगला दर मिळेल या विषयी चाचपणी करून याच कंपनीमार्फत आपला कांदा आता शेतकऱ्यांनी थेट दुबईच्या बाजारात विक्रीसाठी पाठवला आहे.

शेतकऱ्यांनी पाठवलेला कांदा पुढील पाच ते सहा दिवसांत दुबईच्या बाजारात पोहोचणार आहे. कांदा दुबईत पोहोचल्यानंतर भाव ठरणार आहे. मात्र २५ ते ३० रुपये प्रति किलो भाव कांद्याला दुबईच्या बाजारात मिळणार असल्याचं शेतकऱ्यांकडून सांगितलं जातंय. कांदा पाठवण्याच्या वाहतुकीसाठी प्रति किलो ११ ते १२ रुपये खर्च येणार असल्याचंही शेतकऱ्यांनी यावेळी सांगितलंय. त्यामुळे २५ ते ३० रुपये प्रति किलो जरी दुबईच्या बाजारात शेतकऱ्यांच्या कांद्याला भाव मिळाला तरीही १४ ते १६ रुपये प्रति किलो मागे शेतकऱ्यांना शिल्लक राहणार आहे. आज आपल्या बाजारात देखील १२ ते १३ रुपये किलो भाव मिळतोय. मात्र आम्हाला कांदा थेट बाजारात विक्रीसाठी घेऊन जावा लागत असल्याने परवडत नाहीय.



## लोक आता परतू शकतात : उमर अब्दुल्ला



**पुंछ/जम्मू :** जम्मू-काश्मीरमध्ये नुकत्याच झालेल्या पाकिस्तानी गोळीबारामुळे युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, पुंछ जिल्ह्याला या हल्ल्याचा फटका बसला आहे, असे सांगून मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी सोमवारी सांगितले की, दोन्ही देशांमध्ये आता लष्करी सामंजस्य असल्याने जे लोक घराबाहेर पडले आहेत ते परत येऊ शकतात. पाकिस्तानी लष्कराचा सध्या सुरू असलेला अपप्रचार फेटाळून लावत अब्दुल्ला म्हणाले की, शेजारी देश हा प्रचार सुरूच ठेवेल, पण वास्तव जगाला माहित आहे. त्यांनी (सीमेवरील रहिवाशांनी) आता आपापल्या घरी परतण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पूंछ शहराचा ८० ते ९० टक्के भाग रिकामा आहे. गोळीबार सुरू असताना ते घराबाहेर पडले होते. आता गोळीबार थांबला असल्याने ते आपापल्या घरी परतयेऊ शकतील, असे अब्दुल्ला यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

## नादियामध्ये चार बांगलादेशी नागरिकांना अटक

**कल्याणी (पश्चिम बंगाल) :**पश्चिम बंगालमधील नादिया जिल्ह्यातून सोमवारी चार बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली. त्यांच्यासोबत एका संशयित भारतीय दलालालाही अटक करण्यात आली. राणाघाटचे पोलिस उपअधीक्षक सोमनाथ झा यांनी सांगितले की, हंसखली पोलिस ठाण्याच्या परिसरातून ही अटक करण्यात आली आहे.

## बारापुला नाल्याचे अतिक्रमण हटवावे

**नवी दिल्ली :** पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचू नये म्हणून बारापुला नाल्याची साफसफाई करणे आवश्यक असल्याचे सांगत दिल्ली उच्च न्यायालयाने १ जूनपासून मद्रासी कॅम्प पाडण्याचे आदेश दिले आहेत. पाडण्याच्या कारवाईबरोबरच विस्थापितांना नरेला येथे स्थलांतरित करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले. ते म्हणाले, 'ही तोडफोड पद्धतशीरपणे व्हायला हवी. बारापुला नाल्याची गळती कमी करण्यासाठी मद्रासी छावणीवासीयांचे पुनर्वसन आवश्यक आहे. पुनर्वसनाच्या अधिकारापलीकडे कोणताही रहिवासी हक्क सांगू शकत नाही, कारण ही जमीन सार्वजनिक जमीन असून त्यावर अतिक्रमण झाले आहे,' असे न्यायमूर्ती प्रतिभा एम. सिंह आणि न्यायमूर्ती मनमीत पीएस अरोरा यांच्या खंडपीठाने ९ मे रोजी स्पष्ट केले.

## श्रीभूमीत २ कोटींच्या ड्रग्जसह दोघांना अटक



**गुवाहाटी :** आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी सोमवारी सांगितले की, आसामच्या श्रीभूमी जिल्ह्यात दोन कोटी रुपयांच्या ड्रग्जसह दोघांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून पोलिसांनी १० हजार याबा च्या गोळ्या जप्त केल्या आहेत. एक्स वर माहिती शेअर करताना शर्मा यांनी संशयित तस्करांना पकडण्यात यश मिळाल्याबद्दल जिल्हा पोलिसांचे अभिनंदन केले.

## आंध्र प्रदेशात २२,००० कोटी रुपयांची गुंतवणूक



**विजयवाडा :** 'रिन्यू पॉवर' ही आघाडीची हरित ऊर्जा कंपनी आंध्र प्रदेशात भारतातील सर्वात मोठे नवीकरणीय ऊर्जा संकुल उभारण्यासाठी २२,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. आंध्र प्रदेशातील अनंतपूर येथे दोन टप्प्यांत १८०० मेगावॅटक्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प आणि आणखी एक हजार मेगावॅटक्षमतेचा पवन प्रकल्प, तसेच दोन गिगावॅट तासाची बॅटरी ऊर्जा साठवण यंत्रणा (बीईएसएस) उभारण्यात येणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. कंपनी स्वच्छ ऊर्जेच्या पारेषणासाठी १०० किलोमीटरची एक्स्ट्रा हाय व्होल्टेज (ईव्हीएच) लाइन ही उभारणार आहे.

Select RURAL
rashtrasanchar.com
मंगळवार, १३ मे २०२५
राष्ट्रसंचार
BREAKING NEWS AND MORE www.rashtrasanchar.com @rashtrasanchar


# श्री छत्रपतीची निवडणूक ही रंगीत तालिम

## जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी जुने गट लागले कामाला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**भवानीनगर :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचा घोळ मिटला असून, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका येणाऱ्या चारच महिन्यात पार पडतील, असे स्पष्ट झाले आहे. तालुक्यातील सात जिल्हा परिषद गटातील नेहमीचेच कलाकार तयारीस लागलेले दिसून येत आहेत, असे असले तरी देखील याच तालुक्यातील छत्रपती सहकारी साखर कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक लागली असल्याने व खुद्द राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्वतः लक्ष देऊन, एक बलदंड पॅनल उभे केले आहे. त्यामुळे या छत्रपती साखर कारखान्याच्या निवडणुकीचा निकाल येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा, ट्रेलर असणार का? अशी चर्चा रंगू लागली आहे.

इंदापूर तालुक्यात कोणत्या निवडणुकीला काय होईल, हे कोणत्याही राजकीय विश्लेषकाला सांगता येत नाही. कारण येथील जनता जनार्दन, अत्यंत संवेदनशील हुशार असल्यामुळे, नुकत्याच झालेल्या लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकांत निकाल समोर आले. या तालुक्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विचाराची मोठी मांड आहे. राज्याच्या सत्तेत उपमुख्यमंत्री अजित पवार असल्याने प्रत्येक गटातील कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या जिद्दीने, राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मार्गदर्शनाखाली विकासकामे करताना दिसत आहेत. छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन अविनाश घोलप यांनी व त्यांच्या सहकार्यांनी छत्रपती कारखान्यात उभे राहिलेले पॅनल यंदा जनतेचा किती आशीर्वाद मिळवते. यावर देखील या भागातील दोन जिल्हा परिषद गटांचा विषय आहे.

त्याचप्रमाणे माजी सहकारमंत्री व शरद पवार गटाचे नेते हर्षवर्धन पाटील यांनी मोठी राजकीय अडचण असताना देखील, नीरा भीमा सहकारी साखर कारखाना बिनविरोध करत आपली सहकार क्षेत्राशी असलेली नाळ पुन्हा सिद्ध केलेली आहे. सत्तेत नसल्यामुळे हर्षवर्धन पाटील यांच्या कामाचा वेग दिसत नसला तरीही, तालुक्यातील सात ही जिल्हा परिषद मतदार संघात कार्यकर्त्यांचे टीमवर्क व जाळे मोठे आहे. सन २०१४ पासून हर्षवर्धन पाटील आमदार नसले तरी देखील त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेवरील आपला करिष्मा अद्यापपर्यंत जाऊ दिला नाही; मात्र काही दिवसातच, जिल्हा परिषद, पंचायत समिती नगरपरिषद, ग्रामपंचायत यांच्या निवडणुका होणार आहेत. यामध्ये हर्षवर्धन पाटील कशी राजकीय खेळी खेळणार याकडे लक्ष लागले आहे. याउलट क्रीडा मंत्री म्हणून अत्यंत चांगली काम करत असणारे मंत्री दत्तात्रय भरणे यांनी गावोगावी विकासकामे करण्याची चळवळ मात्र वेगाने वाढवलेली दिसते आहे. सामान्य जनतेची नाळ कसल्याही परिस्थितीत तुटू नये. राज्याची जबाबदारी असतानाही तसेच वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री पद असतानाही, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे आठवड्यातील काही दिवस, आपले इंदापूर तालुक्यासाठी देत आहेत. आरोग्याच्या विषयावर मोठे काम मोठी मदत क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे करताना दिसत आहेत.

### प्रवीण माने कोणाकडे?

● अपक्ष विधानसभा लढवणारे प्रवीण माने हे भारतीय जनता पार्टी जाणार का? किंवा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका हर्षवर्धन पाटील यांच्या समवेत रणांगणात उडी घेणार, हे आज तरी कोणाला सांगता येणार नाही. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थेत, ज्यांच्याकडे प्रवीण माने त्यांची सरशी होईल, असे बोलले जात आहे.

### नगरपरिषदेसाठी रणनीती

● इंदापूर नगर परिषदेच्या बाबतीत आज बाहेरून हालचाली चाललेल्या दिसत नसतील. तरीदेखील अंतर्गत नगरपालिका निवडणुकीची बांधणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर तसेच कर्मयोगी शंकरराव पाटील सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन भरत शहा यांची चाललेली दिसते. तर नागरी संघर्ष समितीच्या माध्यमातून, जनतेचे प्रश्न या संदर्भात माजी उपनगराध्यक्ष प्राध्यापक कृष्णा ताटे यांनी आपली टीम सक्रिय ठेवली आहे.

### राजकीय गणितांचा कारखान्यांवर परिणाम नाही

● या तालुक्यातील सहकारी तत्त्वावर चालणारे सहकारी साखर कारखाने आहेत. यामधील नीरा भीमा व कर्मयोगी साखर कारखाना माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या नेतृत्वाखाली आहे. तर उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती सहकारी साखर कारखाना आहे. या वीस पंचवीस वर्षात अनेक राजकीय गणिते बदलली, मात्र या तीन कारखान्यांमध्ये कोणताही बदल झालेला अद्यापी दिसला नाही.



## वैद्यकीय मदत प्रमुखपदी सागर आवटे


**इंदापूर :** शिव सेना वैद्यकीय सहाय्यक कक्ष इंदापूर तालुका प्रमुखपदी सागर आवटे यांची निवड करण्यात आली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसेच खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे, उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे तथा शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे कार्याध्यक्ष रामहरी राऊत, पुणे जिल्हा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र जेवरे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे पुणे जिल्हा प्रमुख भूषण सुर्वे, विशाल धुमाळ यांच्या उपस्थितीत मुंबई येथे बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या कार्यालयात इंदापूर तालुक्याची नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. पुरुष कार्यकारिणी: इंदापूर तालुकाप्रमुख म्हणून सागर आवटे, तालुका उपप्रमुख अमित शिंगटे, शहरप्रमुख राजेंद्र गारदी, उपशहरप्रमुख प्रविण सातपुते, लोकमतचे पत्रकार ग्रामीणप्रमुख नानासाहेब लोंढे, ग्रामीण उपप्रमुख नारायण पवार, डॉक्टरसेल ग्रामीण प्रमुख संकेत व्यवहारे, ग्रामीण संघटक रघु मदने व दत्ता बांदल, सुरक्षित गलांडे यांच्या निवडी करण्यात आली आहे. महिला कार्यकारिणी: इंदापूर तालुका प्रमुख म्हणून महिला सुरेखा लोहार, ज्योती गाढवे. यापुढे इंदापूर तालुक्यात विविध ठिकाणी आरोग्यसेवेचे कॅम्प आयोजित केले जातील. तसेच मुख्यमंत्री सहायता निधी महात्मा फुले जन आरोग्य योजना यामध्ये येणाऱ्या अडचणी यामधून गोरगरीब रुग्णांना मदत मिळवून देण्यासाठी ही टीम कार्यरत राहील, असे निवेदनात म्हटले आहे.

## भाजपा जेजुरी शहर अध्यक्षपदी सचिन पेशवे



**पुरंदर :** नवनिर्वाचित जेजुरी शहर मंडल अध्यक्ष म्हणून सचिन पेशवे यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी महसूलमंत्री प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते ही नियुक्ती करण्यात आली. भाजपाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, खासदार आणि केंद्रीय हवाई मंत्री माननीय मुरलीधर मोहोळ, उच्चतंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ आमदार राहुल कुल महामंत्री राजेश पांडे रवी अनासपुरे मकरंद देशपांडे उपस्थित होते. पुणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष वासुदेव काळे, सरचिटणीस शेखर वडणे, गिरीश जगताप, सचिन लंबाते, शैलेश तांदळे, साकेत जगताप, अलका शिंदे, मंगल पवार, विक्रम माळवदकर, शिवाजी बारसुडे, दशरथ उबाळे, प्रसाद अत्रे, हरिश्चंद्र भापकर, विलास राऊत, चंद्रकांत झगडे, पंकज घोणे, गणेश मोरे, रविंद्र कोशे, विजय जाधव या सर्वांनी सचिन पेशवे यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

## सासवड परिसरात चित्रबलाकचे आगमन



**सासवड :** सासवड परिसरातील चांगावटेश्वर मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात चित्रबलाक या पक्षाचे आगमन झाले आहे. या पक्षाचे आगमन झाले की पावसाळा जवळ आला, असे समजले जाते. कारण या पक्षाचे खाद्य मासे, खेकडे, बेडुक असल्याने पाऊस कालावधीत नद्यांना पूर येतो, तेव्हा हे खाद्य या पक्षांना मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. नदीच्या काठावर येऊन मासे वास्तव्य करतात. पाण्याचा प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने मासे जात असतात, या वेळी या पक्षांना सहज खाद्य उपलब्ध होते.

## पारोडीत आढळला दुर्मिळ अल्बिनो डुरक्या घोणस

**तळेगाव ढमढेरे :** पारोडी, ता. शिरुर येथील सातकरवाडी येथे बजरंग सातकर यांना सकाळच्या सुमारास घराच्या समोर एक पांढऱ्या रंगाचा साप दिसून आला, त्यांनी याबाबतची माहिती निसर्ग वन्यजीव सामजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख यांना दिली, त्यांनतर शेरखान शेख, अमोल कुसाळकर यांनी तेथे धाव घेत पाहणी केली असता काही विटांच्या खाली दुर्मिळ असा अल्बिनो प्रजातीचा असा डुरक्या घोणस जातीचा साप असल्याचे दिसून आले, यावेळी सर्पमित्रांनी सदर सापाला ताब्यात घेत, याबाबत बोलताना काही सापांच्या शरीरात रंगद्रव्य नसते त्यामुळे त्यांचा रंग पांढरा असतो आणि क्वचितच असे साप आढळून येत असल्याचे सर्पमित्र शेरखान शेख यांनी सांगत, याबाबतची माहिती शिरुर वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांना देत वनविभागाचे नियतक्षेत्र अधिकारी प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीत नैसर्गिक आदिवासात मुक्त करण्यात आले.

# इंदापुरातील ग्रामपंचायतीच्या निवडणुका कधी?

## इच्छुकांचे गुडघ्याला बाशिंग, सरपंचपदासाठी कसली कंबर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**इंदापूर :** इंदापूर तालुक्यातील मुदत संपलेल्या वीस ग्रामपंचायतीसाठी वॉर्डातील आरक्षणाची सोडत तसेच सरपंच आरक्षण सोडत नुकतीच झाली आहे. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या मतदानासाठी मतदार याद्याही प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत; परंतु निवडणूक कधी लागणार, असा प्रश्न इच्छुक उमेदवारांना पडला आहे.

आरक्षण सोडत झाल्यामुळे व प्रत्येक ग्रामपंचायतीला सरपंच कोण होणार हे सर्व जाहीर झाल्यामुळे ग्रामपंचायतीच्या सदस्य, सरपंच निवडणुकीसाठी अनेकांनी कंबर कसली आहे. काहीजण गुडघ्याला बाशिंग बांधून तयार झाले आहेत. गावातील प्रत्येक वाडी, वस्त्यांवर प्रस्तावित उमेदवारांनी मतदारांच्या भेटीगाठी सुरू केल्या आहेत. ज्या महिलांना सरपंच पदाची संधी आहे त्या महिलांचे पतीराजही आघाडीवर आहेत.

मुदत संपून दीड दोन वर्षे झाली असल्याने ग्रामपंचायतवर सध्या प्रशासक काम पाहत आहेत. त्यामुळे इंदापूर तालुक्यातील वीस ग्रामपंचायतीच्या निवडणुका प्रत्यक्षात कधी पार पडणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. लोकसभा निवडणूक पूर्वी ग्रामपंचायत निवडणूक होईल, अशी अटकळ बांधली जात होती; परंतु लोकसभा निवडणुकीचे कारण देत निवडणुका लांबणीवर गेल्या. त्यामुळे इच्छुकांनी केलेल्या तयारीवर पाणी फिरले.

आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या ग्रामपंचायतीचा पुढारी आपण असलो पाहिजे. ती ग्रामपंचायत आपल्याच गटाच्या ताब्यात पाहिजे अशी राजकीय पुढाऱ्यांची, नेत्यांची, कार्यकर्त्यांची इच्छा असते.

ग्रामपंचायतीचे सरपंच पद कोणत्या घटकासाठी आहे ते आपल्या ताब्यात राहण्यासाठी प्रत्येक पक्ष, प्रत्येक कार्यकर्ते आमदारही अगदी मंत्रीही प्रयत्न करतात.

आपल्या पक्षाच्या ताब्यात अनेक ग्रामपंचायती असल्या पाहिजेत असाही अनेकांचा होरा असतो. त्यामुळे मिनी मंत्रालय म्हणून ओळख असलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीकडे सगळ्यांचे लक्ष असते. गाव पातळीवरील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीला विशेष महत्त्व आले आहे.

ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत लाखो, कोट्यावधी रुपयांची उलाढाल होते. उमेदवारांचा प्रत्यक्ष कागदावरचा खर्च नगण्य असतो परंतु प्रत्यक्षातील पडद्यामागचा खर्च कोट्यावधी रुपयांचाही होतो असे वास्तव आहे. हॉटेल, ढाब्यातील जेवणावळीपासून बाकी सर्व प्रकार भेटवस्तु देणे हे सर्व उमेदवार व प्रमुख करत असतात.

### एकेक मत महत्त्वाचे

● ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत एका मताला ही महत्त्व असते. एका मतानेही उमेदवार विजयी, पराभूत होत असतो. म्हणून एका, एका मतांची आकडेवारी महत्त्वाची असते. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीला विशेष महत्त्व आहे. इंदापूर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंच पद व वार्डातील आरक्षणाची सोडत निघाल्यामुळे गावातील पदाधिकारी, कार्यकर्ते आतापासूनच प्रचार करू लागले आहेत. दिवसा, रात्री मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत. बैठकाही घेत आहे.

# झेंडू उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानकारक वातावरण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी देवकर :** चालू वर्षी बाजारामध्ये झेंडूच्या फुलांना कायमच सरासरी प्रति किलो रु. ४० ते ५० असा समाधानकारक दर राहिला आहे. त्यामुळे इंदापूर तालुक्यात झेंडू उत्पादक शेतकऱ्यांमध्ये उत्साही वातावरण असल्याचे चित्र दिसून येत आहे.

यंदाच्या वर्षी झेंडूचे दर हे दसरा व दिवाळी सणामध्ये तेजीतच राहिले आहेत. त्यावेळी झेंडू उत्पादक शेतकऱ्यांना चांगला आर्थिक आधार मिळाला होता. गेल्या वर्षी बाजारामध्ये झेंडू फुलाची आवक मोठ्या प्रमाणावर वाढल्याने दसरा व दिवाळीसाठी झेंडूच्या फुलांना अल्पसा म्हणजे प्रतिकिलो रु. १० ते १५ पर्यंत कमी भाव मिळाला होता. तेव्हा अनेक शेतकऱ्यांना झेंडूची फुले रस्त्यावर टाकून द्यावी लागली होती; मात्र चालू वर्षी झेंडू फुलांना मिळणाऱ्या चांगल्या दरामुळे चित्र बदलले आहे.

सध्या उन्हाळी हंगाम असूनही झेंडूच्या फुलांचे फुललेले मळे ठीकठिकाणी दिसून येत आहेत. झेंडूची पीक अनेक शेतकऱ्यांनी पेरू, डाळिंब, सीताफळ, केळी आदी फळबागांमध्ये पिकांमध्ये आंतरपीक म्हणून घेतले दिसून येत आहे. चालू वर्षी झेंडूची दर टिकून राहिल्याने झेंडू उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, चालू वर्षी अनेक शेतकऱ्यांनी झेंडू पिकाला चांगला दर मिळणार, अशी अपेक्षा धरून व अभ्यास करून झेंडूचे पिक घेतलेले दिसून येत आहे.

## घोडेगाव लोकन्यायालयामध्ये प्रकरणे निकाली



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अवसरी :** घोडेगाव न्यायालयात आयोजित लोकन्यायालयामध्ये ४९ दिवाणी आणि फौजदारी प्रकरणे निकाली काढण्यात आली. विविध प्रकरणांमध्ये ७२ लाख १९ हजार ६०५ रुपयांची वसुली झाली आहे. अशी माहिती वकील संघाचे अध्यक्ष ॲड. समीर निघोट यांनी दिली. घोडेगाव न्यायालयात लोकन्यायालय आयोजित करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन न्यायाधीश एस. एस. पुळुजकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी फौजदारी आणि दिवाणी स्वरूपाची अनेक प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात आली. ४९ दिवाणी आणि फौजदारी प्रकरणे निकाली काढण्यात आली. अनेक पतसंस्था, बँका यांनी लोकन्यायालयात सहभाग घेतला.७२ लाख १९ हजार ६०५ रुपयांची वसुली झाली. यावेळी घोडेगाव वकील संघाचे अध्यक्ष ॲड. समीर निघोट,उपाध्यक्ष अनिता पाटील, बाळासाहेब पोखरकर, मुकुंद वळसे पाटील, नवनाथ निघोट, सागर गावडे, दीपक लोहटे, चेतन उदावंत, इरफान शेख, अर्चना काळे, अश्विनी दगडे व इतर सर्व वकील वर्ग उपस्थित होते.



**जेजुरी**

रविवारी वैशाख पौर्णिमेनिमित्त महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या श्री खंडोबा मंदिरात देवाचे गुरव, कोळी, वीर, घडशी, पुजारी, सेवेकरी वर्ग व श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी तसेच श्री खंडोबा देवाचे भक्त खंडू नाना जाधव यांच्या सहकार्यातून १ हजार किलो डाळिंबे वापरून आकर्षक सजावट करण्यात आली.

# केंदूरच्या शेतकरी पुत्राची पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** केंदूर ता. शिरुर येथील बाबासाहेब भोसुरे यांचे संपूर्ण आयुष्य शेती आणि कुटुंब संभाळण्यातच गेले, मात्र त्यांचा एकुलता एक मुलगा किरण भोसुरे याने कष्टकरी कुटुंबाचा पुढील प्रवास प्रशासकीय सेवेच्या दिशेने नेत पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घालत आपल्या आई वडिलांच्या कष्टाचे सोने केल्याचे बोलले जाऊ लागले आहे.

केंदूर, ता. शिरुर हे शिरुर तालुक्यातील दुष्काळी समजले जाणारे आणि डोंगर गळ्याला असलेले गाव येथील भोसुरे स्थळ वस्तीला जाण्यासाठी कित्येक वर्षे रस्ताचा नव्हता, अशा परिस्थितीत किरण भोसुरे याने वाट तुडवत चार किलोमिटर दूर असलेल्या गावातील प्राथमिक व माध्यमिक शाळेत आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. दहावी नंतर पुण्यात विज्ञान शाखेतून बारावी पूर्ण करत नंतर वाडीया कॉलेजमध्ये उच्च शिक्षण घेत थेट स्पर्धा परीक्षेच्या तयारीला सुरूवात केली. यापूर्वी सलग चार प्रयत्नात त्याने मागील वर्षी नगर परिषद लेखा परीक्षक म्हणून यश मिळविले असले. तरी अजूनही मोठा अधिकारी होण्याचे स्वप्न पाहत नोकरी स्विकारली नाही. त्यानंतर पुन्हा स्पर्धा परीक्षेची परीक्षा देत यावर्षी त्याने पोलिस उपनिरीक्षक पदाला गवसणी घालत गावासह आपल्या शेतकरी कुटुंबाला अनोख्या आनंदाची भेट दिली.

किरण पोलीस उपनिरीक्षक झाल्याचे जाहीर होताच किरणची आई जिजाबाई, वडील बाबासाहेब आणि त्याच्या दोन विवाहीत बहिणींनी पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. तर याबाबत बोलताना माझ्या यशात मामेभाऊ असलेला आयटी अभियंता कुलदीप बोत्रे याने विशेष पाठबळ दिल्याचे सांगत माझ्या कठीण काळात वैभव थोरात, सुरज फडतरे, आशिष कुंभार, देवेंद्र पचंगे या शालेय मित्रांचे मोठे योगदान असल्याचे किरण भोसुरे याने सांगितले.

**लोकसेवा आयोगाचीही तयारी :** किरण भोसुरे याने त्याचा यशानंतर बोलताना आपण येत्या सप्टेंबरमध्ये होणारी राज्य सेवेची परीक्षा आपण देत असून मे मध्ये होणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची देखील तयारी करत असल्याचे पोलीस उपनिरीक्षक किरण भोसुरे याने आवर्जून सांगितले.



## भाजपच्या 'छत्रपती बचाव' पॅनलला पुन्हा एकदा खिंडार

**बारामती :** छत्रपती कारखान्याची निवडणूक मध्यावर असतानाच भाजपच्या नेतृत्वाखालील 'छत्रपती बचाव' पॅनलला पुन्हा एकदा खिंडार पडली आहे. इंदापूरचे पंचायत समितीचे माजी सभापती तुकाराम काळे यांनी पॅनल मधून माघार घेत थेट 'जय भवानी माता' पॅन ला पाठिंबा दिला आहे. आपण जय भवानी माता पॅनलचा प्रचार करणार असून माझ्या नावापुढे शिक्क्यावर मतदान करू नये असे आवाहन त्यांनी केले आहे. शनिवारी बारामतीतील नटराज नाट्य कला मंदिरात येऊन तुकाराम काळे यांनी आपला पाठिंबा जाहीर केला. यावेळी पॅनलचे प्रमुख व कारखान्याचे माजी अध्यक्ष पृथ्वीराज जाचक, पॅनलचे समन्वयक किरण गुजर यांच्यासह सणसरचे माजी सरपंच राहुल काळे, अशोक काळे, विक्रांत सरक, वकील प्रदीप थोरात, विलास खटके यांच्यासह इतर उपस्थित होते. यावेळी जाचक यांनी तुकाराम काळे यांच्या पाठिंब्यमुळे आमचा पॅनल आणखी भक्कम झाला असून, आमचे आठ उमेदवार निवडून आलेच आहेत. इतरही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजय होतील. असा आपल्याला विश्वास असल्याचे मत पृथ्वीराज जाचक यांनी व्यक्त केले. तुकाराम काळे यांनी बोलताना मी दादांचा माणूस आहे, छत्रपती कारखाना अत्यंत अडचणीतून जात आहे. अशा वेळी आपण वेगळे काही करायला नको, त्यामुळे अजित पवार, भरणेमामा आणि पृथ्वीराज जाचक यांच्या नेतृत्वाखालील पॅनलची कारखान्याला आवश्यकता आहे म्हणूनच आपण माघार घेत हा निर्णय घेतला. मी आता आजपासूनच या पॅनेलचा प्रचार करणार आहे असे त्यांनी सांगितले. छत्रपती कारखान्याची निवडणूक तशी काहीशी एकतर्फी झाली असून, छत्रपती बचाव पॅनलला पूर्ण ठिकाणी उमेदवार ही मिळालेले नाहीत. तर आता हळूहळू एक एक उमेदवार या पॅनलची साथ सोडत आहेत.

## पाकिस्तान विरोधात लढण्यासाठी परवानगी द्या



**बारामती :** पाकिस्तान विरोधात लढण्यासाठी एक भारतीय नागरिक व भारत मातेचा पुत्र या नात्याने मला सीमेवर लढण्याची संधी द्यावी या मागणीचे पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवण्यात आले आहे. शिवधर्म फाउंडेशन चे संस्थापक दीपक काटे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्राद्वारे पाकिस्तान विरोधात भारतीय सैन्या बरोबर लढण्याची परवानगी मागितली आहे. याबाबत नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून विनंती करण्यात आली आहे. शिवधर्म फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष दीपक अण्णा काटे यांनी बारामती येथील कृष्णसागर हॉटेल येथे पत्रकारांशी बोलताना माहिती दिली यावेळी बारामती इंदापूर तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. याबाबतचे पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शिवधर्म फाउंडेशन च्या वतीने बारामती तसेच इंदापूर येथील तरुणांनी पाठवले आहे.

## विद्युत पुरवठा खंडित, नागरिकांचे अतोनात हाल

**सासवड :** गोटीमाळ येथे मेन स्ट्रिट लाईटच्या खांबाला धडकल्याने चार तास विद्युत पुरवठा खंडित झाला होता यामुळे नागरिकांचे अतोनात हाल झाले. रात्री सुमारे चार तास नागरिकांचे अतोनात हाल झाले. प्रचंड उकाडा आणि डासांच्या त्रासामुळे नागरिकांच्या झोपा उडाल्या. सासवड येथे वारंवार विजपुरवठा खंडीत होतो. गुरुवार तर नित्य नियमाने विजपुरवठा सुमारे आठ ते दहा तास खंडीत असतोच. सध्या प्रचंड प्रमाणात उकाडा असल्याने नागरिकांचे अतोनात हाल होत आहेत. थोडे वादळ आले की विजपुरवठा खंडीत केला जातो. अधिकारी या वेळी फोन केला तर ऊचलत नाहीत, अशा प्रकारे वारंवार विजपुरवठा खंडीत होत असल्याने नागरिकांना नाहक वेठीस धरले जात आहे.

# आळंदी मंदिरात नृसिंह अवतार चंदनउटी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**आळंदी :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधीवर चंदन उटी तून 'श्रीं'चे भव्य नृसिंव्ह अवतारातील वैभवी रूप सेवकांनी परिश्रम पूर्वक साकारले. श्रीचे वैभवी रूप पाहण्यास आळंदी मंदिरात भाविकांनी गर्दी केली. यासह देवस्थानने भाविकांसाठी सोशल मिडीयाचा वापर करून श्रींचे चंदन उटी रूपदर्शन उपलब्ध करून दिल्याने भाविकांतुन समाधान व्यक्त करण्यात आले.

आळंदीत नृसिव्ह जन्मोत्सवा निमित्त श्री नृसिव्ह सरस्वती स्वामी महाराज मठ येथे परंपरेने विविध धार्मिक कार्यक्रम, पूजा झाली. येथे सुधीर गांधी, सुरेश गांधी बंधू परिवाराचे वतीने परिश्रम पूर्वक श्रींची चंदन उटी साकारण्यात आली. श्री संत गोरोबा काका समाधी मंदिर या ठिकाणी लक्षवेधी चंदन उटी साकारण्यात आली. यावेळी भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली.

आळंदीत विविध मंदिरांत चंदन उटी लेप लावण्यास चैत्रात सुरुवात होते. नृसिंह जयंती निमित्त श्रीचे संजीवन समाधीवर विविध लक्षवेधी वस्त्रालंकार वापरून चंदन उटी लावण्यात आली. चंदन उटी तील वैभवी रूप साकारत पूजा बांधली. विविध वस्त्रालंकार, आभूषणे आणि पुष्प सजावट करीत श्रीचे रूप लक्षवेधी सजले.

व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी संस्थांनच्या प्रथा प्रमाणे मंदिरात नृसिंह जयंतीचे धार्मिक महत्व ओळखून नियोजन केले. नृसिंव्ह जयंती निमित्त माऊली मंदिरात प्रथा परंपरांचे पालन करीत जन्मोत्सव उत्साहात करण्यात आली. यावेळी वारकरी शिक्षण संस्थेचे वतीने जन्मोत्सवावर आधारित कीर्तन सेवा झाली. यावेळी मंदिरात पुष्पवर्षाव करण्यात आला. यावेळी आळंदी देवस्थांनचे पदाधिकारी उपस्थित होते.

परंपरेने मंदिरात प्रथम घंटानाद, काकडा, श्रींना पवमान अभिषेक, दुधारती झाली. श्रीनृसिंव्ह जन्मोत्सवा निमित्त श्रीना वैभवी पोशाख करण्यात आला. जन्मोत्सव कीर्तन, आरती, महानैवेद्य, प्रसाद वाटप, मानकरी यांना नारळ प्रसाद वाटप करण्यात आला. चैत्र शुद्ध पाडव्यापासून मृग नक्षत्रा पर्यंत माऊलींच्या संजीवन समाधीस नियमित चंदन उटी लेप लावण्यात येतो.

गुढीपाडवा, रामनवमी, अक्षय तृतीया, नरसिंह जयंती निमित्त श्रींचे संजीवन समाधीस चंदन लेपात विविध विष्णू अवतार रूपातील पूजा बांधण्यात येते. यासाठी आळंदी देवस्थान, स्वकाम सेवा कार्यकारी मंडळ अध्यक्ष सुनील तापकीर , महिलाध्यक्षा अशा तापकीर आणि सेवक देखील या उपक्रमात सहभागी होऊन सेवा रुजू करतात.

या निमित्त माऊली मंदिरात श्रीचे दर्शनास भाविकांची गर्दी झाली होती. श्रींना धुपारती झाल्या नंतर मानकरी संतोष मोझे यांचे वतीने हरीजागर होतो. येथील श्री संत गोरोबा काका समाधी मंदिरात चंदन उटी साकारण्यात आली. यासाठी संत गोरोबा काकांचे वंशपरंपरागत पुजारी किशोर दाते, किरण दाते, बल्लाळेश्वर वाघमारे आणि सहकारी यांनी वैभवी अवतार परिश्रम साकारला. विविध मंदिरांत भाविकांनी दर्शनास गर्दी केली.

# शेतकऱ्यांच्या थाळीला वाढती लोकप्रियता




खेड बाजार समितीच्या राजगुरुनगर आवारात भोजनाचा आस्वाद घेण्यासाठी उपस्थित शेतकरी, कष्टकरी.

## सभापती विजयसिंह शिंदे पाटील यांचे खेडमध्ये कौतुक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण आणि राजगुरुनगर आवारात शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या शेतकरी थाळी या अत्यल्प दरात मिळणाऱ्या भोजन योजनेने शेतकरी आणि कष्टकऱ्यांमध्ये समाधानाची लाट पसरली आहे. सभापती विजयसिंह शिंदे पाटील आणि संचालक मंडळाच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना स्वस्त दरात पोटभर जेवण मिळत असून, याबद्दल त्यांच्याकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

खेड बाजार समितीने शेतकरी आणि मजुरांच्या गरजा लक्षात घेऊन परवडणाऱ्या दरात पौष्टिक भोजन उपलब्ध करून दिले आहे. चाकण येथे काही महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या भोजन थाळीला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. शुक्रवारी ( दि ९) बाजार समितीच्या राजगुरुनगर आवारातील भाजी बाजारात भोजन थाळी सुरू करण्यात आली आहे.जुन्नरचे आमदार शरद सोनवणे, खेड आळंदीचे आमदार बाबाजी काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरू झालेल्या या उपक्रमाला बाजारात येणाऱ्या शेतकरी, व्यापारी, हमाल, मापाडी अशा सर्वांनी प्रतिसाद दिला असल्याचे अगदी रविवारी (दि ११) अनुभवायला मिळाले.

> "शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे. त्यांच्या मेहनतीमुळे आपण अन्नधान्य मिळवतो. त्यांना पोटभर जेवण मिळावे, ही आमची जबाबदारी आहे. संचालक मंडळाच्या सहकार्याने हा उपक्रम आणखी विस्तारण्याचा आमचा मानस आहे." संचालक मंडळाने या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी विशेष प्रयत्न केले आहेत. स्वच्छता, दर्जा आणि वेळेवर जेवण पुरवठा यावर विशेष लक्ष देण्यात येत आहे. स्थानिक शेतकऱ्यांकडूनच धान्य आणि भाजीपाला घेऊन या थाळीची निर्मिती केली जाते, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळत आहे.
> - **विजयसिंह शिंदे पाटील,** सभापती खेड बाजार समिती.

सकाळी लवकर बाजारात येणाऱ्या शेतकऱ्यांना आता भुकेमुळे त्रास सहन करावा लागणार नाही. चाकण येथील भोजन थाळी केंद्राला मिळालेल्या उदंड प्रतिसादानंतर आता राजगुरुनगर येथेही हा उपक्रम यशस्वीपणे सुरू झाला आहे. स्वच्छ, दर्जेदार आणि स्थानिक पदार्थांनी युक्त अशी ही थाळी शेतकऱ्यांचे पोट आणि मन दोन्ही भरत असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.या भोजन थाळी योजनेमुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. चाकण आणि राजगुरुनगर येथील बाजार समितीच्या आवारात दररोज शेकडो शेतकरी आणि कष्टकरी या थाळीचा आस्वाद घेत आहेत. ही योजना केवळ शेतकऱ्यांचे पोटच भरत नाही, तर बाजार समिती आणि शेतकऱ्यांमधील बंध आणखी दृढ करत आहे.खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचा हा उपक्रम शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी एक पथदर्शी पाऊल ठरला असून, सभापती विजयसिंह शिंदे पाटील आणि संचालक मंडळाच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### मेहनतीला आधार

● "आम्ही पहाटेपासून बाजारात येतो. पूर्वी जेवणाची सोय नव्हती, पण आता सभापती विजयसिंह शिंदे पाटील यांनी सुरू केलेल्या या थाळीमुळे आम्हाला स्वस्तात चांगले जेवण मिळते. ही थाळी आमच्या मेहनतीला आधार आहे."असे गुळाणी येथील महिला शेतकरी मंदा बबन रोडे यांनी सांगितले. संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे अधिकारी रोहिदास राक्षे यांनी आनंद व्यक्त करत सांगितले की , "या थाळीत आमच्या घरच्या जेवणासारखी चव आहे. सभापती आणि संचालक मंडळाने आमच्यासाठी इतकी चांगली सोय केली, याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत."

## खटले सामोपचाराने मिटवण्याचे आवाहन



राजगुरुनगर येथील न्यायालयात लोक अदालत मध्ये एका तडजोडीवर चर्चा करताना अध्यक्ष अॅड वैभव कर्वे व इतर.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** वैचारिक देवाणघेवाण करून पक्षकारांनी न्यायालयात प्रलंबित असलेले खटले सामोपचाराने मिटवावेत, असे आवाहन राजगुरूनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश एस पी पोळ यांनी केले.

राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात शनिवारी (दि.१०) राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली होती. त्याचे उदघाटन अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश एस पी पोळ यांच्या हस्ते झाले यावेळी ते पक्षकारांना मार्गदर्शन करताना बोलत होते. याप्रसंगी वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश पी एस इंगळे, सह दिवाणी न्यायाधीश एस बी पवार, न्यायाधीश सरिता विश्वभरन, एस बी नाईकनवरे यांच्यासह वकील बार असोशिएशन चे अध्यक्ष अॅड वैभव कर्वे, उपाध्यक्ष अॅड कोंडीभाऊ कोंबल, सचिव अॅड नवनाथ कड, खजिनदार अॅड शारदा राक्षे, अॅड सिद्धीका लांडगे, अॅड केदार गुरव, अॅड दीपक थिगळे, जेष्ठ विधितज्ञ अॅड सुभाष कड, अॅड अरुण मुळूक, अॅड देविदास शिंदे, अॅड संजय साकोरे, अॅड बिभिषन पडवळ, अॅड दत्तात्रय लिंभोरे, अॅड दीपक गावडे, अॅड महेंद्र सातकर, उपकार्यकारी अभियंता उत्तम मंचरे, एस आर आरुडे यांच्यासह वकील, पक्षकार बँका, महावितरण, पंचायत समितीचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी न्यायाधीश एस पी पोळ म्हणाले, कोर्टात प्रलंबित खटल्याची संख्या जास्त आहे. त्याचा वेळेत निपटारा झाला तर पक्षकारांचा वेळ आणि पैसा वाचतो. लोक अदालत मध्ये जास्तीत जास्त खटले तडजोडीतून निकाली काढण्याचा पक्षकार-वकील यांनी प्रयत्न करावेत. लोकन्यायालय मध्ये पक्षकार न घाबरता चर्चा करतात. आपण आपआपसात तडाडजोड करीत असल्याने आपणच आपल्या खटल्याचे शिल्पकार होतो. तडजोडीला कायदेशीर स्वरूप असते.

त्यासाठी वेगळे शुल्क नसते. लोक अदालत मध्ये जास्तीत जास्त खटले तडजोडीने सोडवण्यात यावेत असे आवाहन न्यायाधीश पोळ यांनी यावेळी केले लोक अदालत मध्ये वकील सदस्य म्हणून अॅड अलोक शिंदे, अॅड. विशाल नेटके, अॅड. प्रगती मोहिते, अॅड. रश्मी वाघोले यांनी काम पहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वकील बार असोशिएशन चे अध्यक्ष अॅड वैभव कर्वे यांनी केले. सूत्रसंचालन अॅड नवनाथ कड,अॅड शारदा राक्षे यांनी केले. आभार केदार गुरव यांनी मानले.

### तडजोडीतून २ कोटी ३६ लाखांची वसुली

● राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात आयोजित लोक अदालत मध्ये ३२६८ प्रलंबित प्रकरणे तडजोडीची ठेवण्यात आली होती. त्यापैकी १५४ प्रकरणे तडजोडीने मिटवण्यात आली. तडजोडीतून २ कोटी ६८ लाख ३७ हजार ४२९ रुपये वसुली झाली. दाखलपूर्व १८१७ प्रकरणांपैकी २२८ प्रकरणात तडजोड झाली असून १६ लाख ९८ हजार ४७५ रुपयांची वसुली झाली.

# पिराण टेकडीवर निर्मितीची कोवळी स्पंदने श्वास घेतील



(सर्व छायाचित्रे : विशाल लोकरे)

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** उजनी धरण व पाणलोट क्षेत्रातील पाण्याची पातळी कमी होत असल्यामुळे पावसाळ्यापर्यंत निभाव कसा लागणार ही चिंता या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या समस्त मानवांना लागून रहाते. मात्र पाणलोट क्षेत्रातील शहा (ता. इंदापूर) गावात असणाऱ्या पिराण टेकडीवर मात्र परदेशी, स्वदेशी पक्षांच्या उत्साही किलबिलाटाला एक स्वच्छंदी उधाण आलेले असते. भवताल कोरडे पडत असताना तेथे नवजीवांच्या निर्मितीची कोवळी स्पंदने येत्या काही कालावधीत पृथ्वीवर श्वास घेणार आहेत.

इंदापूर शहराच्या पूर्वेला साधारणतः आठ किलोमीटर अंतरावर उजनी पाणलोट क्षेत्रालगत असणारे शहा हे छोटेसे गाव आहे. गावाच्या दक्षीणेला पाणलोटाच्या प्रवाहात उंच टेकडीवर पीर साहेबांची मझार होती. पिराची टेकडी असे संबोधल्या जाणाऱ्या या टेकडीचा कालांतराडने पिराण टेकडी असा कायमचा अपभ्रंश झाला. समुद्रसपाटीपासून सुमारे ४९० मीटर उंचीवर असणारी अंदाजे १० ते १५ हेक्टर असू शकणारी ही टेकडी पाणी साठल्यावर पूर्णतः जलमय होते. उन्हाळ्यात पाणी घटल्यानंतर ती उघडी पडते. तेथे नानाविध छटांच्या फुलांची चिमुकली झाडे उगवतात. भोवताली दलदलसदृश, उथळ पाणी, कीटक, जलचर व झुडपांची वाढ यामुळे स्थलांतरित पक्ष्यांना अन्न, सुरक्षित अधिवास व प्रजननासाठी उपयुक्त सुयोग्य अशी जैवविविधता निर्माण होते.



साधारणतः पंचवीस ते तीस वर्षांपूर्वी याचा सुगावा परदेशी व स्वदेशी पक्षाना लागला. दरवर्षी ऑक्टोबर महिन्यापासून स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन सुरू होते. युरोप, रशिया, मंगोलिया, आफ्रिका व मध्य आशियातून हजारो किलोमीटरचा प्रवास करून हे पक्षी येथे पोहोचतात. ही प्रवासयात्रा केवळ त्यांच्या नैसर्गिक प्रेरणेचा भाग नाही तर त्यांच्या प्रजातींच्या जतनासाठी निसर्गाने घडवलेला एक अद्भुत चमत्कार आहे.

रिव्हर टर्न असे इंग्लिश नाव असणारा नदी खंड्या, स्मॉल प्रॅटिनकोल म्हणजे छोटा जलवक,ब्लॅक विंगेड स्टिल्ट म्हणजे काळ्या पंखांची टिटवी,नॉर्दर्न शॉव्हलर म्हणजे मराठी भाषेतील चमचा बदक, पेंटेड स्टॉर्क अर्थात चित्रबलाक, युरोप, नेदरलँडमधला ब्लॅक-टेल्ड गॉडविट म्हणजे काळ्या शेपटीचा खंड्या, कॉमन टील म्हणजे छोटा चक्रवाक, युरोपातील ऑस्प्रे अर्थात मासोळी गरुड,मध्य आशियातील व्हाइट वॅगटेल म्हणजे पांढरा धोबी, स्थानिक इंडियन स्पॉट बिल्ड डक म्हणजे ठिपक्यांचा बदक, बार-हेडेड गूज अर्थात डोक्यावर पट्टे असलेला हंस,युरेशियातील कॉमन टील म्हणजे लहान पाणचिखल्या, असे अनेक पक्षी सध्या येथे वास्तव्याला आले आहेत.यातील नदी खंड्या या पक्षाचा प्रजनन कालावधी सुरु आहे.त्यामुळे पुणे, सोलापूर,अहिल्यानगरसह राज्यातील पक्षी प्रेमींना पक्षी निरीक्षणासाठी व पर्यटनासाठी आनंदाची पर्वणी निर्माण झाली आहे.

### पक्षी निरीक्षकांचे ठिकाण

● अनेक पक्षीप्रेमी, छायाचित्रकार, संशोधक दरवर्षी पिराण टेकटीस भेट देतात. हे निरीक्षण केवळ एक छंद नसून, निसर्गाची समज, सहअस्तित्वाची जाणीव व पर्यावरण संवर्धनाची प्रेरणा देणारे माध्यम ठरते. स्थानिक विद्यार्थ्यांपासून ते आंतरराष्ट्रीय अभ्यासकांपर्यंत अनेक जण येथे पक्ष्यांचा अभ्यास करताना दिसतात. पक्ष्यांचे आगमन, त्यांचे वर्तन, प्रजनन, नंतर नव्या पिढीसह परत निघणे या सर्व प्रक्रियेने पिराण टेकडी ही 'निसर्ग शिक्षणाची खुली प्रयोगशाळा' बनली आहे.या ठिकाणी भेट देणाऱ्या प्रत्येकाने निसर्गाशी असलेले नाते अधिक घट्ट करावे, त्याचे जतन करावे. पुढील पिढ्यांपर्यंत ही समृध्द जैवविविधता पोहोचवावी, हीच खरी प्रेरणा आहे. अशी प्रतिक्रिया बीबीसी अर्थ, नॅशनल जिओग्राफिक, ॲनिमल प्लॅनेट यासह युनायटेड किंगडममधील तीन प्रमुख वर्तमानपत्रांनी ज्यांच्या पक्षांविषयक कामांची व छायाचित्रांची दखल घेतली आहे, असे शिराळ (सोलापूर) येथील पक्षी निरीक्षक विशाल लोकरे यांनी सांगितले.

# मनगटावर धागा कशासाठी?



हिंदू धर्मात हातावर धागा बांधण्याला बरंच महत्त्व आहे. मंदिरात गेल्यावर किंवा इतर धार्मिक कार्यात मनगटावर धागा बांधून घेणं शुभ मानलं जातं. मनगटावर धागा बांधण्यामागे धार्मिक कारणं आहेतच शिवाय या कृतीचं वैज्ञानिक महत्त्वही आहे. याविषयी जाणून घेऊ या...

जाणून घ्या

* मनगटावर धागा बांधल्याने ब्रह्मा, विष्णू, महेश या त्रिदेवांची कृपा प्राप्त होते. यामुळे जीवनातली संकटं दूर होतात, असं मानलं जातं.
* हा धागा कच्च्या सूतापासून तयार केला जातो. लाल, पिवळ्या, केशरी अशा विविध रंगांमध्ये तो उपलब्ध असतो. यामुळे शरीरात सकारात्मक ऊर्जेचा संचार राहतो.
* मनगटावर बांधल्या जाणाऱ्या धाग्यामुळे शरीरातला रक्तप्रवाह सुधारतो. यामुळे रक्तवाहिन्यांवर दाब पडतो आणि शरीरातल्या विविध भागांना होणाऱ्या रक्तपुरवठ्यात सुधारणा होते.
* मनगटावर बांधलेल्या धाग्यामुळे रक्तवाहिन्या तंदुरूस्त राहतात आणि उच्च रक्तदाब, मधुमेहासारख्या विकारांपासून बचाव होतो.

# अहिंसेचा उपासक

**जगभर हिंसाचाराने थैमान घातलेलं असताना समस्त मानवजातीला उपकारक ठरेल असा शांततेचा आणि अहिंसेचा मंत्र देणाऱ्या गौतम बुद्धाची विचारधारा नव्याने अभ्यासण्याची आज गरज आहे. बुद्धपौर्णिमेचं औचित्य साधत प्रत्येकाने हा प्रयत्न करायला हवा. जवळपास अडीच हजार वर्षांपूर्वी भगवान गौतम बुद्धांनी मांडलेले विचार आजच्या काळातही तर्कसंगत ठरणारे आहेत जे प्रत्येकाने आत्मसात करावेत.**

हिंसा, अशांतता, अस्थिरता, सुखलोलुपता आदींचं प्राबल्य वाढत असण्याच्या या काळात शांततेचा संदेश देणाऱ्या महात्म्याचा आठवही समजूत आणि शहाणपणाचा सांगावा देणारा ठरतो. म्हणूनच अशा औचित्यपूर्ण दिनांची पर्वणी साधत अहिंसा, शांतता, समाधानाचा मंत्र नव्याने जपण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. बुद्धपौर्णिमेच्या निमित्ताने ही सुवर्णसंधी साधता येणार असून गौतम बुद्धाच्या विचारांची उजळणी केल्यास मोठं विचारधन हाती लाभेल यात शंका नाही.

सध्याचा फोफावता हिंसाचार दाहक, भेदक आणि कमालीचा उग्र असून हिंसक विचारांच्या जाळ्यात सर्वसामान्यांनी सहजतेनं अडकत जाणं, या उग्र आणि विघातक विचारांकडे खेचलं जाणं, हिंसेचा मार्ग अवलंबणं हे सर्वच चिंताजनक आहे. जगभर विघातक प्रवृत्ती हात-पाय पसरत असून त्यांना सर्वतोपरी मदत करणारेही सहज उपलब्ध होणं ही चिंतेत भर घालणारी बाब आहे. याउलट शांततामय मार्गाने प्रश्न सोडवू पाहणाऱ्याचं प्रमाण घटताना दिसत आहे. निरिच्छ भावनेने, निष्काम हेतूने समाजाचं भलं करण्यासाठी पुढे येणारी माणसं हाताच्या बोटावर मोजता येतील इतकी अल्प आहेत. बुद्धपौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर या विरोधाभासाकडे लक्ष वेधायला हवं. १९७४ मध्ये भारताने अणुचाचणी केली आणि ती यशस्वी झाल्याची खूण म्हणून तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी 'आणि बुद्ध हसला' असा संदेश दिला. भारताने नेहमीच शांततेची कास धरली आहे. पण ही शांतता दुबळेपणाचं प्रतीक व्हायला नको म्हणूनच आपण अणुचाचण्या केल्या



आणि चाचणी यशस्वी झाल्यानंतर 'आणि बुद्ध हसला' हा सांकेतिक संदेश दिला. संकेतात बुद्धाचा नामनिर्देश करण्याचं कारण म्हणजे मानवतेच्या इतिहासामध्ये भगवान गौतम बुद्ध हे नाव नेहमीच शांतता आणि अहिंसेशी जोडलं गेले आहे. गौतम बुद्धांनी दिलेला शांतीचा संदेश आजही म्हणजे २५ शतकं संपल्यानंतरही उचित वाटावा असाच आहे. गौतम बुद्धांचे विचार कालातीत आहेत.

मानवी जीवनामध्ये सतत सुख आणि दु:ख यांचा लपंडाव सुरू असतो. सुखाच्या आणि दु:खाच्या प्रसंगांमुळे मानवी मनाची मशागत होत असते. मात्र तत्त्वज्ञान सुखापेक्षा दु:खातून अधिक प्रभावीपणे निर्माण होतं. किंबहुना, जगातल्या सर्व तत्त्वज्ञानाच्या मुळाशी दु:खच आधारभूत राहिलेलं आहे. सुखाच्या संवेदना माणसाला परमेश्वराची आठवण करून देत नाहीत मात्र माणूस दु:खामध्ये अंतर्मुख होतो आणि जीवनाकडे तात्त्विक दृष्टीने पहायला लागतो. त्यातूनच नवं तंत्र, नवं तत्त्वज्ञान, धर्म आणि पंथ निर्माण झाले आहेत. भगवान गौतम बुद्धांनी वयाच्या २९ व्या वर्षी गृहत्याग केला. यामागेही दु:ख हेच कारण होतं. त्या दु:खाची कारणं शोधत-शोधत बुद्धांनी पायी प्रदीर्घ वाटचाल केली, ही कथा सर्वांना माहीत आहे. सहा वर्षं परिभ्रमण केल्यानंतर त्यांना बौद्धगयेतील पिंपळाच्या झाडाखाली साक्षात्कार झाला आणि आशा हे सर्व दु:खाचं मूळ असल्याचं ज्ञान प्राप्त झालं. तसं पाहिलं तर भगवान गौतम बुद्धांनी स्थापन केलेला बौद्धधर्म काही वर्षं उपेक्षित राहिला होता; परंतु गौतम बुद्धाच्या निर्वाणानंतर ७०० वर्षांनी सम्राट अशोकांनी या धर्माचा स्वीकार केला. सम्राट अशोकाच्या राजाश्रयामुळे बौद्धधर्म जगभर फोफावला.

भक्ती विशेष

त्या काळामध्ये हिंदुंनी बौद्ध धर्म स्वीकारणं ही सामान्य घटना समजली जात असे. अनेक हिंदू बौद्धधर्म स्वीकारत आणि अनेक बौद्ध नंतर हिंदू धर्मात परत येत असत. बौद्ध धर्मातून हिंदू धर्मात आणि हिंदू धर्मातून बौद्ध धर्मात होणारी ही आवक-जावक मोठ्या प्रमाणावर सुरू होती. त्यामुळे बौद्धधर्माचा हिंदू जीवनपद्धतीवर मोठा पगडा आहे. सम्राट अशोकांच्या प्रोत्साहनामुळे बौद्धांनी भारतवर्षामध्ये चांगलाच जोर धरला. भारताबरोबरच चीन, जपान, इंडोनेशिया, मलेशिया आदी आशियाई देशांमध्ये या धर्माचा प्रसार झाला. ५४ वर्षांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या हजारो अनुयायांसह हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्मात प्रवेश केला. त्यामुळे बौद्धधर्माचा प्रभाव थोडा वाढला. बौद्धधर्माच्या प्रभावामध्ये असे चढ-उतार झाले असले तरी भगवान गौतम बुद्धाने मांडलेलं तत्त्वज्ञान जगातील अनेक धर्मांनी स्वागतार्ह मानलं आहे.


एकूणच भारतीय जीवनपद्धतीवर बौद्ध विचारांची अमीट छाप आहे. सम्राट अशोकाच्या काळामध्ये बौद्धधर्म स्वीकारणाऱ्यांमध्ये शेतकऱ्यांची संख्या मोठी होती. बुद्धांच्या विचारांमध्ये अहिंसेला परमस्थान होतं. त्यामुळे त्या काळच्या शेतकरी जीवनामध्ये अहिंसेचा विचार एक जीवनपद्धती म्हणून स्वीकारला गेला होता. त्यातूनच गायीची हत्या करण्याचा निषेध उदयाला आला असावा, असा तर्क आहे. आज संपूर्ण जग हिंसेच्या खाईत लोटलं जाऊ लागलं आहे. किंबहुना, दहशतवाद आणि हिंसाचार हा आजच्या मानवी जीवनाचा स्थायीभाव होऊ पहात आहे. या अध:पातापासून मानवी जातीची सुटका करायची असेल तर भगवान गौतम बुद्धांचा अडीच सहस्त्रकापूर्वी मांडलेला अहिंसेचा शाश्वत विचारच उपयुक्त ठरणार आहे.

गौतम बुद्धांनी दिलेल्या शिकवणुकीतील अनासक्त जीवन जगण्याचा उपदेशही आजच्या मानवतेला उपयुक्त ठरणारा आहे. आज संपूर्ण मानवजात उपभोगवादाच्या गर्तेत सापडली आहे आणि या उपभागवादातूनच मानवी जीवनासमोरील अनेक प्रश्न गंभीर झाले आहेत. देशा-देशातील तणाव, वाढतं शस्त्रसामर्थ्य, युद्ध आणि संघर्ष हे सर्व मानवी जीवनाच्या उद्दिष्टांशी विसंगत आहे. बुद्धविचारांची कास धरल्यास ही विसंगती दूर होईल आणि माणसातील संवेदनशील मन जागृत राहील अशी आशा वाटते.

# कशाला उद्याची बात?

सध्या प्रत्येकावरच प्रचंड ताण असतो. प्रत्येकाला पुढे जायचंय. अशा परिस्थितीत ताणात भर घालण्याची काहीही गरज नाही. जीवनातल्या काही गोष्टींचा आपण नाहक ताण घेत असतो. या गोष्टींचा आपल्या आयुष्याशी तीळमात्र संबंध नसतो. या बाबींकडे दुर्लक्ष करूनच आपण पुढे जायला हवं.

* इतर लोक आपल्याबद्दल काय विचार करतात, याचा आपण नाहक ताण घेतो. या विचारांच्या पिंजऱ्यात आपण नाहक बंदिस्त होतो. इतर लोक आपल्याबद्दल काय विचार करतात यापेक्षा आपल्याला स्वत:बद्दल काय वाटतं हे महत्त्वाचं आहे. आपला आत्मविश्वास, स्वत:विषयी वाटणारं प्रेम महत्त्वाचं असतं. आपल्या अडचणी कोणीही दूर करू शकत नाही. त्यामुळे आधी स्वत:वर प्रेम करायला शिका. स्वत:वरच्या प्रेमाचं रोपटं रूजवलं की इतरांच्या बोलण्याचा फार परिणाम होत नाही.
* ज्यांना तुम्ही आवडत नाही ते लोक तुमच्या आयुष्यातून बाहेर पडायला मोकळे असतात. पण तुम्ही स्वत:पासून दूर जाऊ शकत नाही. त्यामुळे स्वत:ची काळजी घ्यायला शिका.
* पैसा आनंद आणू शकत नाही. त्यामुळे बँक बॅलन्सकडे पाहून निराश होऊ नका. फार ताण घेऊ नका. वर्तमानात जगा. आज आपल्याकडे काय आहे याचा विचार करा. समाधान माना. छोट्या छोट्या गोष्टींमधून आनंद मिळवण्याचा



प्रयत्न करा.

* भूतकाळात घडलेल्या चुकांबद्दल स्वत:ला दोष देत बसू नका. यामुळे भूतकाळ बदलणार नाही हे लक्षात घ्या. प्रत्येक चुकीतून तुम्ही शिकू शकता ही बाब ध्यानात ठेवा. चुकांनी तुम्हाला पुढे जाण्याची संधी दिलेली असते ही बाब दृष्टीआड करू नका. चुकांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून बघा.

सेल्फ हेल्प


* लोक काय करतात याचा विचार करू नका. गर्दीचा भाग बनू नका. भपकेबाजीच्या नादात वाहवत जाऊ नका. तुम्हाला काय हवंय, या जगात तुम्ही कशाला आला आहात याचा विचार करा. तुम्हाला आनंद देणाऱ्या गोष्टी करा.
* आपण जाड आहोत की बारीक; काळे आहोत की गोरे याचा ताण घेऊ नका. या जगात कोणीही सुयोग्य नसतं. प्रत्येकाची शरीर रचना वेगळी असते. तुम्ही आहात तसंच स्वत:ला स्वीकारा. शरीरस्वाथ्यासाठी व्यायाम करा. तंदुरूस्ती राखा. लोकांना हवंय तसं बनण्याचा प्रयत्न करू नका.
* प्रत्येकाला खूश करण्याचा प्रयत्न करु नका. लोकांना खूश केल्यामुळे तुमच्याभोवती नाचणाऱ्यांची संख्या वाढेल. पण हे खूशमस्करे असतील हे ध्यानात घ्या. इतरांना खूश करण्याऐवजी स्वत:चा विचार करा.
* तुम्हाला दुखावलेली व्यक्ती आयुष्यातून निघून गेली तर वाईट वाटून घेऊ नका. आपल्या आयुष्यात लोक येतात आणि निघून जातात. याचा फार ताण घेऊ नका.

# इथे मिळतो शाप!

मंदिर हे श्रद्धा आणि आस्थेचं स्थान मानलं जातं. मंदिरात गेल्यावर भक्तांना समाधान लाभतं. परमेश्वराची पूजा केल्यावर मनोकामना पूर्ण होते हा विश्वास भाविकांच्या मनात असतो. पूजा केल्याने भगवंत प्रसन्न होतो. पण पूजा केल्यानंतर देव शाप देत असेल तर? उत्तराखंडमधल्या पिथौरागडमधल्या बल्तिर नावाच्या गावात भगवान शिवाचं एक मंदिर आहे. या मंदिरातल्या शंकराच्या पिंडीची पूजा कधीच झालेली नाही. या मंदिरात पूजा केल्यास देव शाप देतो, अशी भीती भाविकांमध्ये आहे. हथिया देवाल या नावाने हे मंदिर ओळखलं जातं. हथिया देवाल देवस्थान स्थापत्यकलेचा उत्तम नमुना आहे. या मंदिरात भाविक येतात, शिवाचं दर्शन करतात आणि निघून जातात. पूजेचे सोपस्कार पार पाडले जात नाहीत.

तीर्थक्षेत्र

या मंदिरात शंकराची पूजा का होत नाही याबाबत एक कथा सांगितली जाते. एकेकाळी या ठिकाणी राजा कत्युरी याची सत्ता होती. हा राजा स्थापत्य कलेचा चाहता होता. एके दिवशी राजाने मंदिर उभारायचं ठरवलं. कुशल कारागिराने मंदिराची निर्मिती करायला सुरूवात केली. या कारागिराला एक हात नव्हता. मंदिर उभारत असताना लोक त्याची मस्करी करायचे. यामुळे कारागीर वैतागायचा पण त्याने मंदिर उभारण्याचा प्रयत्न सोडला नाही. भलामोठा दगड त्याने एका रात्रीत कापून काढला आणि मंदिराची उभारणी केली. या मंदिरात शिवलिंगही घडवण्यात आलं पण या शिवलिंगाची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली नाही.



त्यामुळे त्याची पूजा करण्यात आली नाही. कालौघात ही परंपरा बनून गेली. या मंदिरात पूजा केल्यास भगवान शंकर शाप देतात असा समज पसरला. यामुळे इथे कोणीही पूजा करत नाही.

# घरात कोणती चित्रं नसावी?

घर सजवायला कोणाला आवडत नाही? महागड्या फर्निचरसोबत घरात छानशी चित्रं लावली जातात. वेगवेगळ्या चित्रांनी भिंती सजवल्या जातात. आपल्या आसपासची प्रत्येक वस्तू आणि व्यक्ती ब्रह्मांडातल्या शक्तींना आकर्षित करत असते. आपल्या आसपास



नकारात्मक ऊर्जा असेल तर विपरित परिस्थितीचा सामना करावा लागतो. म्हणूनच सकारात्मक विचार असणाऱ्या व्यक्ती आणि सकारात्मकता निर्माण करणाऱ्या वस्तूंना जवळ करणं गरजेचं ठरतं. वास्तूशास्त्राच्या दृष्टीने ठराविक प्रकारची चित्रं अयोग्य मानली जातात. अनावधानाने किंवा पुरेशा माहितीअभावी अशी चित्रं आपण घरात लावतो आणि नकारात्मक ऊर्जेला आकर्षित करतो. घरात कोणती चित्रं लावणं योग्य ठरत नाही, याविषयी जाणून घेऊ या...

* नृत्यकलेत निपुण असणारे अनेक जण घरात नटराजाची मूर्ती ठेवतात. नटराजाचं चित्र आणि फोटोही त्यांच्या घरात असतो. पण प्रत्यक्षात नटराजाचं नृत्य हे संहाराचं प्रतीक मानलं जातं. त्यामुळे नटराजाचं चित्र किंवा मूर्ती घरात ठेवणं अशुभ मानलं जातं.

वास्तू

* घरात किंवा कार्यालयात बुडणाऱ्या जहाजाचं चित्र लावू नये. अशा प्रकारच्या चित्रांमुळे नकारात्मक तरंग उमटू लागतात आणि सकारात्मक ऊर्जा तुमच्यापासून दूर जाते. अशा चित्रांमुळे भाग्योदय होत नाही.
* वाहत्या पाण्याचं चित्र किंवा कृत्रीम धबधबा घरात ठेऊ नये. वाहतं पाणी अस्थिरतेचं प्रतीक समजलं जातं. वाहतं पाणी, धबधबा किंवा नदीचं चित्र घरात असेल तर संपत्ती आणि प्रगतीवर परिणाम होऊ शकतो. अशा चित्रांमुळे पैसा हाती रहात नाही. खर्च वाढतात आणि बचत होत नाही.
* घरात हिंस्त्र प्राण्यांची चित्र लावू नये. यामुळे घरात कलह संभवतो. पती-पत्नीच्या नात्यात दुरावा येऊ शकतो. नाहक वाद होतात.
* ताजमहाल हे प्रेमाचं प्रतीक मानलं जातं. अनेकांच्या घरात ताजमहालाचं चित्र असतं. पण ताजमहाल ही मुमताजची कबर आहे हे आपण विसरतो. घरात कबरीचं चित्र असू नये. यामुळे मृत्यू किंवा विनाश संभवतो.
* घरात महाभारतातील प्रसंगांची चित्रं लावू नयेत. महाभारत हे महाकाव्य असलं तरी यात एकमेकांविरूद्धचा द्वेष, राग, लोभ दिसून येतो. अशा चित्रांमुळे ताण, नैराश्य, दु:ख अशा भावना वाढीस लागतात. तसंच घरात कलह संभवतो.
* घरात दु:खी, कष्टी लोकांची चित्रं लावू नयेत. अशी चित्रं अशुभ असतात.
* युद्ध, हिंसा दाखवणारी चित्रं घरात नसावी. ही चित्रं नकारात्मक ऊर्जा घेऊन येतात. यामुळे माणसं दुरावतात.

# 'यांच्यावर' नका ठेऊ विश्वास

आदिशक्तीवर आधारित अनेक पौराणिक ग्रंथ आहेत. त्यात देवी भागवत महापुराणाचं महत्त्व वादातीत आहे. या ग्रंथात देवीच्या प्रत्येक अवताराबद्दल आणि तिने केलेल्या चमत्काराबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली आहे. आपण काही माणसांवर अंधविश्वास ठेवतो. पण याचे दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागतात. देवी भागवतात अशा लोकांचं वर्णन करण्यात आलं आहे. या स्वभावाची माणसं दु:ख वाढवण्यास कारणीभूत ठरू शकतात.



* इतरांना दु:खी किंवा कष्टी झाल्याचं बघून आनंदी होणारे लोक दुष्ट मानले जातात. अशी माणसं इतरांना त्रास देतात. इतरांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करतात.
* परस्त्रीवर वाईट नजर ठेवणारा मनुष्य दुष्ट असतो. अशा माणसाच्या मनात चुकीच्या भावना उत्पन्न होतात. आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी असा मनुष्य कोणत्याही थराला जाऊ शकतो. अशा लोकांवर विश्वास ठेऊ नये.
* लोभी माणसावर विश्वास ठेऊ नये. असे लोक स्वत:च्या फायद्यासाठी काहीही करू शकतात. कोणालाही अडचणीत आणू शकतात. असे लोक फक्त स्वत:चा फायदा बघतात.
* इतरांबाबत मनात ईर्ष्या असणारी माणसं विश्वासाला पात्र नसतात. अशा लोकांवर कधीही विश्वास ठेऊ नये. अशी माणसं कोणाचंही भलं करू शकत नाही. इतरांबाबत ती वाईट विचार करतात. त्यामुळे अशा लोकांपासून चार हात लांबच रहायला हवं.
* धर्मावर आणि देवावर विश्वास नसणारा माणूस धर्माचरण करत नाही. अशा माणसांना देवाची भीती नसते. हे लोक कसेही वागू शकतात. त्यामुळे त्यांच्यावर फार विश्वास ठेवू नये.
* कपटी मनुष्य आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी कोणत्याही थराला जातो. अशा लोकांच्या मनात कोणाबद्दल आपुलकी आणि प्रेमाची भावना नसते. त्यांच्या मनात कायमच स्वार्थी भाव असतो. स्वत:चा विचार केला जातो. त्यामुळे अशा लोकांना लांबच ठेवलं पाहिजे.


धर्मग्रंथातून

* अहंकारी माणूस चांगल्या आणि वाईटाचा विचार करत नाही. असे लोक स्वत:ला सर्वोत्तम समजतात. त्यामुळे अहंकारी माणसांवर फार विश्वास ठेवल्याने आपलं नुकसान होऊ शकतं.

# होता परमेश्वरी कृपा

या सृष्टीवर परमेश्वराची सत्ता आहे. परमेश्वरी सत्तेपुढे कुणाचं काही चालत नाही. परमेश्वर सर्वोच्च स्थानी आहे. परमेश्वराने या सृष्टीची रचना अनोख्या पद्धतीने केली आहे. प्रत्येक सजीवाच्या गरजेकडे लक्ष दिलं आहे. कोणावरही अन्याय केलेला नाही. सगळं कसं नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध आहे. दररोज सकाळी सूर्य उगवतो. संध्याकाळी मावळतो. ही पृथ्वी अविरतपणे फिरत आहे. समुद्रात लाटांचा खेळ सुरू आहे. नदीला उसंत नाही. वेळेवर पाऊस पडतो. तापलेल्या धरणीला दिलासा मिळतो. जलधारांनी सगळी सृष्टी कशी चिंब होऊन जाते. परमेश्वरी कृपेशिवाय माणसाला काहीही मिळत नाही. मनुष्यजन्म नशीबाने मिळतो. या जन्मात माणूस सगळ्या इच्छा, आकांक्षा पूर्ण करण्यासाठी धडपडतो. पण परमेश्वराला, त्याच्या शक्तीला विसरतो. पैसे कमवायच्या धावपळीत त्याच्यापुढे काही क्षण नतमस्तक व्हायलाही त्याच्याकडे वेळ नसतो.

गतजन्मातल्या पुण्याईने मनुष्यजन्म प्राप्त होतो. माणसाला सगळ्या गोष्टींवर स्वत:चं नियंत्रण हवं असतं. प्रत्येक गोष्ट आपल्या मर्जीनुसार घडायला हवी असते. पण प्रत्यक्षात असं होत नाही. कारण या जगातल्या प्रत्येक गोष्टीवर परमेश्वरी अंमल असतो. सगळं काही त्याच्या मर्जीने घडत असतं. देवाच्या मनात असेल तरच आयुष्यात यश मिळतं. आयुष्यात



यश मिळवण्यासाठी दोन नियमांचं पालन करायला हवं. आपल्या प्रयत्नांमध्ये कधीही कसूर करू नये. तसंच परमेश्वराची कृपा प्राप्त करण्यासाठी कायम प्रयत्नशील असलं पाहिजे. या जगातला प्रत्येक मनुष्य आयुष्याची लढाई लढतोय. जीवनात संघर्ष करतोय. पण क्षमता असूनही प्रत्येकाच्या पदरी यश पडत नाही. याचं कारण म्हणजे परमेश्वरी कृपेचा अभाव. परमेश्वराची कृपा झाली की अशक्य गोष्टीही साध्य होतात. आयुष्यात सगळी सुखं प्राप्त होतात. यश मिळतं.

बोध

माणसाच्या हातात काहीही नसतं. मनुष्य स्वत:ला सर्वसत्ताधीश समजत असला तरी प्रत्यक्षात सगळं काही त्या विधात्याच्या हातात आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत सगळं काही परमेश्वराच्या हाती असतं. म्हणूनच सगळं काही असूनही माणूस कधीही सुखी नसतो. देवाच्या कृपेशिवाय माणूस आयुष्यात पुढे जाऊ शकत नाही. भरारी घेऊ शकत नाही. जीवनात मिळालेली प्रत्येक गोष्ट ही देवाची कृपा समजली पाहिजे. मानमरातब, पैसा, संपत्ती, पद हे सगळं क्षणभंगूर आहे. परमेश्वर एका क्षणात तुम्हाला खाली खेचू शकतो. राजाचा रंक करू शकतो. त्यामुळे प्रत्येकाने देवाची करूणा भाकली पाहिजे. अहंभाव ठेऊ नये. आपणच सर्वज्ञ अशा आविर्भावात वावरू नये. देवाची कृपा प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्नशील असावं.




# विराटची कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती

## 'ते तुझ्या रेकॉर्डबद्दल बोलतील, पण मी.... ' विराटच्या निवृत्तीवर अनुष्का झाली भावूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताचा माजी कर्णधार आणि स्टार फलंदाज विराट कोहली याने अखेर कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. सोशल मीडियावर त्याने पोस्ट शेअर करत त्याने आपल्या १४ वर्षांच्या कसोटी कारकिर्दीला अलविदा म्हटलं आहे. कोहलीने १२३ कसोटी सामन्यांत ३० शतकं व ३१ अर्धशतकं झळकावली आहेत आणि त्याने ९२३० धावा केल्या आहेत. त्याच्या नेतृत्वात भारताने ऑस्ट्रेलियाला त्यांच्याच भूमीवर हरवले होते आणि टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीतही पोहोचला होता.



तो म्हणाला," १४ वर्षांपूर्वी मी कसोटी क्रिकेटमध्ये पहिल्यांदा बॅगी ब्लू रंगाचा पोशाख घातला होता. खरं सांगायचं तर, या फॉरमॅटमध्ये मला असा प्रवास करावा लागेल याची मी कधीच कल्पना केली नव्हती. या फॉरमॅटने माझी परीक्षा घेतली, मला घडवले आणि आयुष्यभर उपयोगी येतील असे धडे शिकवले."

"कसोटी फॉरमॅटमध्ये खेळण्यात वैयक्तिक गुणांची कसोटी लागते. या फॉरमॅटमध्ये स्वतःला शांत ठेवून कसे खेळायचे हे मी शिकलो, पाच दिवसांच्या खेळात प्रत्येक दिवस आपली परिक्षा घेतो, छोटे क्षण जे कोणीही पाहत नाही, पण ते कायम तुमच्यासोबत राहतात,"असेही विराटने लिहिले आहे.

"मी या फॉरमॅटमधून निवृत्ती घेणे सोपे नाही, पण ही योग्य वेळ आहे. मी माझ्याकडे जे काही होते ते सर्व दिले आहे आणि त्याने मला माझ्या अपेक्षेपेक्षा खूप जास्त परत दिले आहे. मी कृतज्ञतेने भरलेल्या मनाने निवृत्त होत आहे. या खेळासाठी, मी ज्या लोकांसोबत मैदान शेअर केले त्यांच्यासाठी आणि वाटेत मला दिसणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी, मी कृतज्ञता व्यक्त करतो. मी माझ्या कसोटी कारकिर्दीकडे नेहमी हसतमुखाने पाहतो."असेही तो म्हणाला.

रोहित शर्माच्या निवृत्तीनंतर विराटनेही कसोटी खेळणार नसल्याचे स्पष्ट केले होते. पण बीसीसीआयने त्याची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी भारतीय क्रिकेटमध्ये प्रभाव असलेल्या व्यक्तीलाही पुढे केले, पण विराट आपल्या मतावर ठाम राहिला आणि आज अखेर त्याने निवृत्ती जाहीर केली.

● अनुष्काने विराटच्या मनात कसोटीबद्दल किती प्रेम आहे, हे तिच्या पोस्टमधून व्यक्त केले आहे. तिने लिहिले, 'ते तुझ्या रेकॉर्ड्स आणि यशाच्या टप्प्यांबद्दल बोलतील, पण मला आठवडतात ते तू न दाखवलेले अश्रु, तुझी लढाई जी कोणी पाहिली नाही आणि तू या खेळाच्या प्रकारावर अतिशय प्रेम केलं आहे. मला माहित आहे, तूझ्यापासून हे सगळं कसं आता दूर झालं आहे. या प्रत्येक कसोटी मालिकेनंतर तू अधिक शहाणा आणि नम्र होऊन यायचा. तुला या सर्वांमधून विकसित होताना पाहणे, ही भाग्याची गोष्ट आहे.' 'तथापि, मी नेहमीच तू कसोटीतून निवृत्त होण्याची कल्पना केली होती. पण तू नेहमीच तुझ्या मनाचं ऐकलंस. त्यामुळे मला तुला इतकंच सांगायचं आहे की तुझ्या या निरोपाचा प्रत्येक क्षण कमावला आहे.' अनुष्काच्या या पोस्टवर विराटने कमेंट्समध्ये हार्टचे इमोजीही शेअर केले आहे.

## मधुरा अन् ओजसने घेतला दोन सुवर्णपदकांचा वेध



**सातारा :** चीनमधील शांघाय येथे झालेल्या जागतिक तिरंदाजी फेज-२ स्पर्धेत ५० मीटर कंपाउंड राउंड या प्रकारात छत्रपती शिवाजी कॉलेजची खेळाडू मधुरा धामणगावकर हिने वैयक्तिक प्रकारात एक सुवर्णपदक, सांघिक माहिला गटात एक रौप्य, तर महिला मिश्र गटात एक कांस्यपदक भारतासाठी पटकावत आंतरराष्ट्रीय कारकिर्दीची यशस्वीपणे सुरुवात केली. याच महाविद्यालयाचा खेळाडू ओजस देवतळे (अर्जुन पुरस्कार विजेता) याने पुरुष सांघिक प्रकारात भारतास एक सुवर्णपदक मिळवले. गत एप्रिल महिन्यात अमेरिकेत झालेल्या जागतिक तिरंदाजी फेज-१ स्पर्धेत पुरुष सांघिक प्रकारात कांस्यपदक मिळवले होते, तर मधुरास मात्र या स्पर्धेसाठी पात्र असूनसुद्धा पासपोर्ट व्हिसा वेळेत न मिळाल्याने स्पर्धेस मुकावे लागले होते. याची भरपाई तिने या स्पर्धेत केली. येत्या जुलै महिन्यात जर्मनीत होणाऱ्या जागतिक विद्यापीठ स्पर्धेसाठी भारतीय तिरंदाजी संघात मधुराचा समावेश आहे. मधुरा आणि ओजस हे साताऱ्यातील दृष्टी ॲकॅडमीचे प्रवीण सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात. रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष चंद्रकांत दळवी, संघटक डॉ. अनिल पाटील, संस्थेचे सचिव विकास देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, संस्थेच्या ऑडिट विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, जिमखाना विभागाचे प्रा. डॉ. धनंजय नलवडे, प्रा. विक्रमसिंह ननावरे आदींनी यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

## अफगाणिस्तानातील लोक आता बुद्धिबळ खेळू शकणार नाहीत



**नवी दिल्ली :** अफगाणिस्तानातील तालिबान सरकारने पुढील सूचना मिळेपर्यंत बुद्धिबळ खेळावर बंदी घातली आहे. तालिबानला भीती आहे की हा खेळ जुगाराचे साधन बनला आहे. एका इंग्रजी वृत्तवाहिनीच्या वृत्तानुसार, अधिकाऱ्यांनी सांगितले की, बुद्धिबळ खेळावर अनिश्चित काळासाठी बंदी घालण्यात आली आहे. प्रथम इस्लामिक कायद्यानुसार ते खेळणे योग्य आहे की नाही याची चौकशी केली जाईल, त्या आधारावर त्यावर कायमची बंदी घातली जाईल किंवा बंदी उठवली जाईल. अफगाणिस्तानातील तालिबानने बंदी घातलेला हा पहिलाच खेळ नाही. सर्वात वाईट परिस्थिती तिथल्या महिलांची आहे. त्यांना कोणत्याही प्रकारच्या खेळात भाग घेण्याची परवानगी नाही, त्यांच्यासाठी प्रत्येक खेळावर बंदी आहे. तालिबानने २०२१ मध्ये सत्ता काबीज केल्यापासून, तालिबान सरकारने इस्लामिक कायद्याकडे त्यांचा अतिरेकी दृष्टिकोन प्रतिबिंबित करणारे कायदे आणि नियम सातत्याने लादले आहेत. "शरिया (इस्लामिक कायदा) मध्ये बुद्धिबळ हा जुगाराचा एक प्रकार मानला जातो," असे क्रीडा संचालनालयाचे प्रवक्ते अटल माशवानी म्हणाले, गेल्या वर्षी लागू केलेल्या कायद्यानुसार बुद्धिबळावर बंदी घातल्याचे वृत्त वृत्तसंस्था एएफपीने आहे. त्यांनी सांगितले की, "बुद्धिबळाच्या खेळाबाबत धार्मिक मते आहेत. जोपर्यंत या मतांना विचारात केले जात नाही तोपर्यंत अफगाणिस्तानात बुद्धिबळाच्या खेळावर बंदी आहे... अफगाणिस्तानच्या राष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाने जवळजवळ दोन वर्षांपासून कोणतेही अधिकृत कार्यक्रम आयोजित केलेले नाहीत."

वॉरीयर्स क्रिकेट ॲकॅडमी, पीडीसीए ॲकॅडमी,

## ज्युनिअर चॅम्प्स्, एसपीएम ॲकॅडमी संघ उपांत्य फेरीत

**पुणे :** 'वॉरीयर्स करंडक' १५ वर्षाखालील मुलींच्या आंतरक्लब क्रिकेट दिवस-रात्र स्पर्धेत वॉरीयर्स क्रिकेट ॲकॅडमी, पीडीसीए ॲकॅडमी, ज्युनिअर चॅम्प्स् आणि एसपीएम ॲकॅडमी या संघांनी आपापल्या गटामध्ये अव्वल गुण मिळवून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

फुरसुंगी येथील वॉरीयर्स क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत शरयु गायकवाड हिने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर वॉरीयर्स क्रिकेट ॲकॅडमीने डिलीजंट क्रिकेट क्लबचा ९ गडी राखून सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना डिलीजंट क्रिकेट क्लबने १३९ धावांचे लक्ष्य उभे केले. मैथीली चौधरी हिने ४९ धावांची आणि सई वाळुंज हिने ३४ धावांची खेळी केली. शरयु गायकवाड हिने १७ धावांमध्ये पाच गडी बाद करून निम्मा संघ तंबुत पाठवला. हे लक्ष्य वॉरीयर्स क्रिकेट ॲकॅडमीने



३०.२ षटकात पूर्ण केले. आर्या शेवाळे हिने नाबाद ५१ धावांची आणि गायत्री एस. हिने नाबाद ५२ धावांची खेळी करून संघाचा विजय निश्‍चित केला.

वैष्णवी सिंग हिने केलेल्या धावांच्या जोरावर पीडीसीए ॲकॅडमीने ज्युनिअर चॅम्प्स् संघाचा ४ गडी राखून पराभव केला आणि उपांत्य फेरी गाठली. स्पर्धेच्या अ गटातून वॉरीयर्स ॲकॅडमी आणि एसपीएम ॲकॅडमीने तर, ब गटातून सरस धावगतीच्या आधारे ज्युनिअर चॅम्प्स्ने आणि पीडीसीए ॲकॅडमीने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

## बुद्धीबळ स्पर्धेत खुल्या गटात निहांश खोडे याने, तर मुलींच्या गटात प्रितिका यांना विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या वतीने आयोजित व एमसीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एच2इ पॉवर सिस्टीम महाराष्ट्र राज्य 7 वर्षाखालील खुल्या व मुलींच्या गटात निवड बुद्धीबळ स्पर्धेत खुल्या गटात निहांश खोडे याने, तर मुलींच्या गटात प्रितिका नंदी यांनी आपापल्या गटात विजेतेपद संपादन केले.

कर्वे रोड येथील अश्वमेध हॉल या ठिकाणी पार पडलेल्या या स्पर्धेत खुल्या गटात नवव्या फेरीत पहिल्या पटावरील लढतीत नागपूरच्या निहांश खोडेने पुण्याच्या रियांश पितळेचा पराभव करून 8.5 गुणांसह व 50 बुकोल्स कट गुण सरासरीच्या जोरावर विजेतेपद पटकावले. निहांश याने फ्रेंच एकसेंच पद्धतीने आपल्या डावास सुरुवात करत 55चालीमध्ये रियांशवर विजय मिळवला. निहांश हा नागपूर येथील भवन्स त्रिमूर्ती नगर स्कूलमध्ये दुसरी इयत्तेत शिकत



असून येथे गुरप्रीत सिंग, सुरप्रीत सिंग, गुरमित सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते.दुसऱ्या पटावर लढतीत पुण्याच्या कविश भट्टडने मुंबई शहराच्या इवान दुबेचा पराभव करून 8.5गुण(48.5बुकोल्स कट) दुसरा क्रमांक पटकावला. पुण्याच्या निश्‍वंत रामकुमार याने आपला शहर सहकारी मिहिर देवळेकरचा पराभव करून 7गुणांसह तिसरा क्रमांक पटकावला.

मुलींच्या गटात आठव्या फेरीत पुण्याच्या प्रितिका नंदी हिने छत्रपती संभाजीनगरच्या प्रियल शिखरेचा पराभव करून 7 गुणांसह विजेतेपदाचा मान पटकावला. प्रितिकाने फ्रेंच ओपनिंग पद्धतीने डावास सुरुवात करत 65 चालीमध्ये मात केली. प्रितिका ही मेंटॉर इंटरनेशनल स्कूल मध्ये ग्रेड 2 मध्ये शिकत असून जॉन निकोलस यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. पुण्याच्या समायरा थोरातने वेदिका कुलकर्णीला बरोबरीत रोखले व 6.5(39.5बुकोल्स कट) गुणांसह दुसरे स्थान मिळवले. तिसऱ्या पटावरील लढतीत छत्रपती संभाजीनगरच्या श्रेया शेळकेने मनस्वी आड्डेचा 6.5गुण(36.5बुकोल्स कट) गुणांसह तिसरे स्थान पटकावले.

स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूला करंडक व रोख रकमेची पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण एमसीएचे मानद सचिव निरंजन गोडबोले, माजी बुद्धिबळ पटू अ‍ॅड.गौरव कोंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

## परदेशी खेळाडूंशिवाय होणार आयपीएलचे उर्वरित १६ सामने?

**नवी दिल्ली :** भारत-पाकिस्तान यांच्यातलं युद्ध थांबलं असलं तरी मागील ४-५ दिवसांत जे घडलं ते पाहून इंडियन प्रीमिअर लीग २०२५ मध्ये सहभागी झालेल्या परदेशी खेळाडूंमध्ये आजही भीती कायम आहे. बीसीसीआयने येत्या १-२ दिवसांत सुधारित वेळापत्रक जाहीर करण्याची शक्यता आहे, परंतु त्यात परदेशी खेळाडूंच्या सहभागावर अजूनही प्रश्न आहेच. युद्धामुळे बरेच परदेशी खेळाडू व भारतीय खेळाडूही आपापल्या घरी परतले. त्यांना पुन्हा बोलवण्यापासून ते वेळापत्रकाचे पुढील नियोजन व ठिकाण इथपर्यंतची तयारी बीसीसीआयला करायची आहे. रविवारी रात्रीपर्यंत आयपीएल फ्रँचायझींना स्पर्धा पुन्हा सुरू होणार की नाही, याबाबत कोणतेच अपडेट्स मिळालेले नसल्याचे सांगितले आहे. बीसीसीआयकडूनही फ्रँचायझीशी औपचारिक चर्चाही झालेली नाही. शुक्रवारी बीसीसीआयने आयपीएल २०२५ आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर इंडीया विरुद्ध पाकिस्तानला युद्धविराम मिळाला आणि आयपीएलच्या उर्वरित सामन्यांच्या नियोजानाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. 'आम्हाला अजूनही बीसीसीआयकडून कोणतीच अधिकृत माहिती मिळालेली नसल्या,' एका फ्रँचायझीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने सांगितले. ते म्हणाले,'आमच्या संघातील भारतीय व परदेशी खेळाडू आपापल्या घरी परतले आहेत. त्यांच्याशी अजून आम्ही संपर्क साधलेला नाही, कारण बीसीसीआयनेच आम्हाला अद्याप तरी काही सांगितलेलं नाही.

## वेटलिफ्टिंगमध्ये आकांक्षाला सुवर्ण – वेदिकाला कांस्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नाशिकच्या मनमाडमधील व्यवहारे कुटुंबियांनी खेलो इंडिया युवा स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकण्याची परंपरा बिहारमध्येही कायम राखली. ७ व्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत आकांक्षा व्यवहारेने ४५ किलो गटात सुवर्ण, तर ठाणेच्या वेदिका टोळेने कांस्य यशाला गवसणी घातली.

राजगीर क्रीडा विद्यापीठाच्या परिसरात सुरू असलेल्या वेटलिफ्टिंग खेळातही पहिल्या दिवसापासून महाराष्ट्राचा डंका पहाण्यास मिळाला. ४५ किलो गटात ९ पैकी ३ स्पर्धेक महाराष्ट्राचे होते. अपेक्षेप्रमाणे आकांक्षाने एकूण १४८ किलो वजन उचलून सोनेरी यश पटकावले. १२७ किलो वजनाची कामगिरी करीत वेदिका टोळेने तिसरे स्थान प्राप्त केले.



आकांक्षाचे हे खेलो इंडिया स्पर्धेतील दुसरे पदक आहे. मध्यप्रदेशमधील २०२३ स्पर्धेत तीने सुवर्णपदक जिंकले होते. गत स्पर्धेत दुखापतीमुळे चौथ्या स्थानावर तीची कामगिरी होती. बिहार स्पर्धेत दुखापतीवर मात करून तीने पदकाचा करिश्मा घडविला

स्नॅच प्रकारात अपेक्षेप्रमाणे आकांक्षाने दमदार सुरूवात केली. तिसऱ्या प्रयत्नात सर्वाधिक ६८ किलो वजन उचलून आकांक्षाने आपले वर्चस्व गाजवले. पाठोपाठ क्लिन अँन्ड जर्क प्रकारातही सर्वाधिक ८० किलो वजन उचलून आकांक्षाने सुवर्णपदकावर नाव कोरले. वेदिकाने स्नॅच प्रकारात ६० किलोची कामगिरी करीत दुसरे स्थान मिळवले होते. क्लिन अँन्ड जर्क प्रकारात ७० गुणांसह ती मागे पडली. केवळ १ गुणांनी तिचे रौप्य पदक हुकले. पंजाबच्या लव्हजोत कौरने १२८ गुण संपादून रौप्यपदकाचे यश संपादन केले.

नाशिकच्या जय भवानी व्यायाम शाळेत सराव करणाऱ्या आकांक्षा ५ आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळल्या आहे. तीने १९ वर्षांखालील गटात राष्ट्रकुल स्पर्धेत पदक जिंकले आहे. प्रविण व्यवहारे यांच्या मार्गदर्शनाखाली ती सराव करते. खेलो इंडिया स्पर्धेतील ४५ किलो गटातच मला ऑलिम्पिक पदक जिंकायचे असल्याचे आकांक्षाने सांगितले. मनमाडमधील व्यवहारे कुटुंबियांनी सलग तिसऱ्या स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकण्याची किमया घडविली आहे. गतवर्षी आकांक्षाचा भाऊ कृष्णाने सुवर्णपदक पटकावले होते.

## आरसीबीला बसणार मोठा धक्का!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्धजनक परिस्थितीमुळे आयपीएल २०२५ स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्यात आली होती. पण आता दोन्ही देशात शस्त्रसंधी झाली आहे, तसेच तणाव निवळण्याचीही शक्यता आहे.

अशात बीसीसीआय आता आयपीएल २०२५ पुन्हा सुरू करण्याचा विचार करत आहे. पण ही स्पर्धा बीसीसीआयला लवकर घ्यावी लागेल, अन्यथा जूनमध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा हंगाम पुन्हा जोमाने सुरू होणार असून परदेशी खेळाडू आयपीएलमध्ये परतण्याची शक्यता कमी आहे.

त्यामुळे सध्यातरी १६ मे पासून आयपीएल पुन्हा सुरू करण्याचा विचार बीसीसीआय करत आहे. याचदरम्यान, आता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला मोठा धक्का बसला आहे.

बंगळुरूच्या संघातील प्रमुख गोलंदाज असलेल जोश हेजलवूड आयपीएल स्थगितीनंतर मायदेशी परतला असून तो परत येण्याची शक्यता कमी आहे. यामागे त्याच्या खांद्याची दुखापत आहे. चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या सामन्यात त्याला ही दुखापत झाली, त्यानंतर आयपीएल स्थगित होण्यापूर्वी तो बंगळुरूच्या लखनौ सुपर जायंट्स विरूद्धच्या सामन्यालाही मुकणार होता. आयपीएल २०२५मध्येही हेजलवूड दुखापतीनंतरच परतला होता.

## स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट, स्पेशलाईज्ड क्रिकेट, आर्यन्स् क्रिकेट संघांची विजयी कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चौथ्या 'स्पोटर्सफिल्ड करंडक' अजिंक्यपद १२ वर्षाखालील २५-२५ षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट ॲकॅडमी, स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लिनिक आणि आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

सातारा रस्त्यावरील टेंभेकर फार्म्स ॲकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत आर्यश तिवारी याने केलेल्या कामगिरीच्या जोरावर स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट ॲकॅडमीने क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीचा ७ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना क्रिकेट नेक्स्ट



ॲकॅडमी ब संघाने २५ षटकात १६९ धावा धावफलकावर लावल्या. अमिताश मोझे (३९ धावा) आणि नमन खातेर (३८ धावा) यांनी धावा जमवुन संघाचा डाव उभा केला. हे लक्ष्य स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट ॲकॅडमीने २४.३ षटकात व ३ गडी गमावून पूर्ण केले. आर्यन जोग याने नाबाद ४४ धावा, आर्यश तिवारी याने नाबाद ३९ धावांची आणि श्रीयांश एस. याने २८ धावांची खेळी करून संघाचा विजय निश्‍चित केला.

इशान माळी याने केलेल्या कामगिरीमुळे स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लिनिकने आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमीचा २ गडी राखून पराभव केला. आर्यनस् संघाने ११३ धावांचे लक्ष्य उभे केले होते. हे लक्ष्य स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लिनिकने १७.५ षटकात पूर्ण केले. इशान माळी (२७ धावा), कौस्तुभ सुतार (२२ धावा) आणि अविष्कार पाटोळे (१५ धावा) यांनी संघाचा विजय निश्‍चित केला. आराध्य सोनुने याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमीने स्पार्क क्रिकेट ॲकॅडमीचा ३ गडी राखून विजय मिळवत आगेकूच केली.

ईगल एफसी, सिटी एफसी पुणे, उत्कर्ष क्रिडा मंच,, एफसी शिवनेरी,

## पुणे शहर पोलिस, रेंजहिल्स् यंग बॉईज संघ विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा फुटबॉल संघटने तर्फे आयोजित 'पीडीएफए लीग २०२५' फुटबॉल स्पर्धेच्या प्रथम आणि व्दितीय श्रेणी गटाच्या सामन्यात ईगल एफसी, सिटी एफसी पुणे, उत्कर्ष क्रिडा मंच कोथरूड एफसी, एफसी शिवनेरी, पुणे शहर पोलिस आणि रेंजहिल्स् यंग बॉईज फुटबॉल क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

कात्रज येथील भारती विद्यापीठ मैदानावर सुरू असलेल्या या



स्पर्धेच्या व्दितीय श्रेणी गटाच्या झालेल्या सामन्यामध्ये विपुका येपथोमी, नालो कोमुत आणि गौरव कुमार यांनी केलेल्या गोलांच्या जोरावर ईगल एफसी संघाने एफसी जोसेफ संघाचा ३-१ असा पराभव केला. रीथम मलविया याने केलेल्या एकमेव गोलमुळे सिटी एफसी पुणे संघाने लिजंड्स फुटबॉल ॲकॅडमीचा १-० असा पराभव केला. उत्कर्ष क्रिडा मंच कोथरूड एफसी ब संघाने युनिक वानवडी एफसीचा १०-० असा एकतर्फी पराभव केला. सामन्यात विरेन भोसले याने तीन गोल तर, हेमंत रावत याने एक गोल केला. हरीकृष्णा अदीगंटाला, आदित्य सिंग आणि देवांश मिश्रा यांनी प्रत्येकी दोन गोल केले. राजेश पवार याने केलेल्या दोन गोलांच्या जोरावर एफसी शिवनेरी संघाने पुना सोशल स्पोटर्स क्लबचा २-० असा पराभव केला.

प्रथम श्रेणी गटाच्या सामन्यात पुणे शहर पोलिस संघाने जाएंट्स एफसी अ संघाचा २-१ असा पराभव केला. पुणे शहर पोलिस संघाकडून स्वप्निल चव्हाण आणि मयुरसिंग अधिकारी यांनी गोल नोंदविले. जाएंट्स एफसी अ संघाकडून अन्शुल शर्मा याने गोल केला. दुसऱ्या सामन्यामध्ये रेंजहिल्स् यंग बॉईज फुटबॉल क्लबने रूपाली स्पोटर्स क्लबचा ५-० असा धुव्वा उडविला. निशित हेडगे याने तीन गोल केले. तनिष्क ददलानी आणि आशिष तिडवे यांनी प्रत्येकी एकेक गोल केले.

#रा